# तृतीय वर्ष कला

## सत्र - V (CBCS)

## ग्रामीण विकास अभ्यासपत्रिका क्र. IX

# ग्रामीण विकासासाठी समाजकार्य

## विषय कोड : 97194

© UNIVERSITY OF MUMBAI


**प्राध्यापक सुहास पेडणेकर**
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक रविंद्र द. कुलकर्णी**
प्र-कुलगुरु,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक प्रकाश महानवार**
संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई



| | | |
|---|---|---|
| प्रकल्प समन्वयक | : | **प्रा. अनिल आर. बनकर**<br>सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग व<br>प्रमुख, मानव्यविद्याशाखा,<br>दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई |
| अभ्यास समन्वयक | : | **प्रो. सुब्रत कुमार साहू**<br>सहाय्यक प्राध्यापक ग्रामीण विकास,<br>मुंबई विद्यापीठ, मुंबई |
| संपादक व लेखक | : | **डॉ. दिलीप पाटील**<br>प्राध्यापक आणि संचालक,(डी.एल.एल.इ),<br>मुंबई विद्यापीठ, मुंबई |
| लेखक : | : | **डॉ.अनिल पाटील**<br>ग्रामीण विकास विभाग प्रमुख,<br>जवाहर महाविद्यालय, जव्हार, जि.पालघर |
| | : | **डॉ. डी.व्ही,पवार**<br>उप प्राचार्य, किर्ती महाविद्यालय, दादर, मुंबई |
| | : | **श्रीमती. अंजली पाटील**<br>अ-५०१, साई आशादीप, एस.एल.रोड,<br>मुलुंड (प.) मुंबई |
| | : | **प्रा. खरात नितीन**<br>गोगटे महाविद्यालय, रत्नागिरी |
| पुर्नसंपादक व लेखक | : | **डॉ.बारी भुवनेश एच.**<br>श्रॉफ महाविद्यालय, ता. डहाणू, जि. पालघर |



**मार्च २०२२, मुद्रण - १**

**प्रकाशक** : संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई -४०० ०९८.

**अक्षर जुळणी व मुद्रण** : मुंबई विद्यापीठ मुद्रणालय,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०००९८

# अनुक्रमणिका


| क्रमांक | अध्याय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १) | स्वयंसेवी संस्था | ०१ |
| २) | स्वयंसेवी संस्थांचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये | १० |
| ३) | स्वयंसेवी संस्था, उगम आणि विकास | १८ |
| ४) | स्वयंसेवी संस्थांची ग्रामीण विकासातील भूमिका आणि महत्त्व | ३२ |
| ५) | स्वयंसेवी संस्थांच्या व्यवस्थापनाची तत्त्वे | ४१ |
| ६) | स्वयंसेवी संस्थांचे उपक्रम | ५० |
| ७) | स्वयंसेवी संस्था व लोकसहभाग | ६० |
| ८) | स्वयंसेवी संस्था नोंदणी | ६५ |
| ९) | स्वयंसेवी संस्थांचे व्यवहार | ८६ |


❖❖❖❖

# तृतीय वर्ष कला

## सत्र – V

## ग्रामीण विकास पेपर क्रमांक ९

## ग्रामीण विकासासाठी समाजकार्य

## Subject Code: UARD- 506

**(Revised Semester system Implemented from June 2022)**

### अभ्यासक्रम

**घटक- १. स्वयंसेवी क्षेत्र**

अ) स्वयंसेवी कार्याची संकल्पना, स्वयंसेवक, स्वयंसेवी संस्था आणि त्याचे विविध प्रकार

ब) स्वयंसेवी संस्थांचे स्वरूप

क) स्वयंसेवी संस्थांची वैशिष्ट्ये

**घटक-२. स्वयंसेवी क्षेत्राचा उदय**

अ) भारतातील स्वयंसेवी क्षेत्राचा उगम आणि विकास – विशेष संदर्भ महाराष्ट्र .

ब) स्वयंसेवी संस्थांची भूमिका आणि महत्त्व.

क) स्वयंसेवी संस्थांच्या व्यवस्थापनाची तत्वे.

**घटक-३.स्वयंसेवी क्षेत्राचे उपक्रम**

अ) स्वयंसेवी संघटनेची तत्वे

ब) स्वयंसेवी संस्थांपुढील प्रमुख समस्या

क) स्वयंसेवी संस्था आणि लोकसहभाग

**घटक-४. स्वयंसेवी संस्थांची नोंदणी प्रक्रिया**

अ) स्वयंसेवी संस्था नोंदणीचे कायदे

ब) स्वयंसेवी संस्था नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे

क) स्वयंसेवी संस्थाच्या उत्पन्नाच्या व खर्चाच्या बाबी

❖❖❖❖

# १

# स्वयंसेवी संस्था

**घटक रचना**


१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ स्वयंसेवी कार्याची संकल्पना, स्वयंसेवक

१.३ स्वयंसेवी संस्थां आणि त्याचे विविध प्रकार

१.४ सारांश

१.५ परिभाषिक शब्द

१.६ अधिक माहितीकरता

१.७ प्रश्नसंच


## १.० उद्दिष्टे

प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण स्वयंसेवी कार्याची संकल्पना, स्वयंसेवकाची संकल्पना, स्वयंसेवी संस्थां व त्यांच्या विविध प्रकरणांचा अभ्यास करणार आहोत.

- स्वयंसेवी कार्याची संकल्पना, स्वयंसेवक ह्या संकल्पना अभ्यासणे.
- स्वयंसेवी सस्थांच्या व्याख्येसह विविध प्रकार अभ्यासणे.

## १.१ प्रस्तावना

स्वातंत्र्यपूर्व काळापासून संतांनी लोकांना जागृत करण्याचे कार्य केले. संत महात्म्यांनी 'जनसेवा ही ईश्वर सेवा आहे' अशी शिकवण दिली. मानवतेची सेवा या भूमिकेतून रोगी, व्याधीग्रस्तांना औषधे, भुकेलेल्यांना अन्न, तहानलेल्यांना पाणी, निरक्षरांना शिक्षण, अपगांना संरक्षण इत्यादी कार्ये विविध व्यक्तींनी आणि सेवाभावी संस्थांनी केली आहेत. वैयक्तिक पातळीवर महात्मा ज्योतीराव फुले, महात्मा गांधी, कर्मवीर भाऊराव पाटील इत्यादी अनेक समाजधुरिणांनी समाज विकासाची कामे केली. तर रामकृष्ण मिशन, ख्रिश्चन मिशनरी, इस्लामी- असोसिएशन, थिऑसॉफिकल सोसायटी इत्यादी सेवाभावी संस्थांनी ग्रामीण भागात सेवेचे कार्य केले आहे. महात्मा गाधींनी १९४१ साली समाजसेवा कार्यक्रम कार्यकर्त्यांना दिला. यामध्ये ग्रामस्वच्छता, ग्रामोद्योग, खादी निर्मिती, प्रौढ शिक्षण, स्त्रियांच्या दर्जात सुधारणा, मूलभूत शिक्षण, अस्पृश्यता निवारण, नशाबंदी, सत्य अहिंसेवर

आधारित कामगार संघटना, शेतकरी हक्क संघटना, प्रादेशिक भाषा विस्तार, आदिवासी सुधारणा, विद्यार्थी कल्याण इत्यादी चौदा कार्यक्रम त्यात होते. महात्मा गांधीजींचा रचनात्मक कार्यक्रम हा राष्ट्रीय पातळीवरील ग्रामविकासाचा पहिला कार्यक्रम होता. सत्य, अहिंसा, श्रमप्रतिष्ठा, समता, सेवाभाव या मुद्यावर आधारलेली शोषणमुक्त समाजव्यवस्था ही त्यांची आदर्श समाजाची संकल्पना होती. महात्मा गांधीकडून प्रेरणा व स्फूर्ती घेऊन असंख्य कार्यकर्ते व सेवाभावी संस्थां ग्रामीण भागात कार्य करू लागल्या.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाच्या विकासाची जबाबदारी शासकीय यंत्रणेवर येऊन पडली. ग्रामीण विकासासाठी समाज विकास प्रकल्प, पंचायती राज, सहकारी संस्थां अशा स्वरूपाचे प्रयोग सुरू केले. मात्र शासन व्यवस्थेला म्हणावे तसे यश प्राप्त होईना. यातूनच पुढे विकासाच्या कार्यात स्वयंसेवी सस्थांनी सहभाग घेतला. शासनाबरोबरच आज स्वयंसेवी संस्थां विकास कार्यात सहभागी होऊन कार्य करीत आहेत.

बाबा आमटे यांचे आनंदवन, श्रीमती गोदूताई परुळेकर यांचे आदिवासी कल्याण कार्यक्रम, श्रीमती ताराबाई मोडक व श्रीमती अनुताई वाघ यांचे आदिवासी शिक्षण प्रकल्प, डॉ. रजनीकांत आणि मॅखेल आरोळे यांचे ग्रामीण आरोग्य प्रकल्प (जामखेड, जि. अहमदनगर) श्री. अण्णा हजारे यांचा ग्रामविकासाचा प्रकल्प (राळेगणसिद्धी, जि. अहमदनगर), इसामुद्दिन बायदानी यांच्या मागासवर्गीय व आदिवासी कल्याण आश्रम (वर्धा), कर्मवीर भाऊराव पाटील यांचे वंचित वर्गासाठीचे शैक्षणिक कार्य, डॉ. पंजाबराव देशमुख, भाऊसाहेब हिरे यांनी ग्रामीण शिक्षणात केलेले कार्य नोंद घेण्यासारखे आहे.

महाराष्ट्र राज्य स्वयंसेवी कार्यकर्त्यांची मांदियाळीच आहे. महाराष्ट्र राज्यातून शिक्षण, समाजपरिवर्तन, ग्रामोद्योग, उद्योग विकास, अस्पृश्यता निर्मुलनासारख्या समाज परिवर्तनाच्या कार्याला सुरुवात झाली आणि या कार्याचा प्रसार संपूर्ण देशभर झाला अशा प्रकारे सामाजिक कार्यकर्त्यांनी स्वयंस्फूर्तीने समाजकार्याला स्वत:ला वाहून देऊन नवसमाज निर्मिती करण्याचा प्रयत्न सुरू केला. आजही हे कार्य संपूर्ण देशभर चालू आहे.

## १.२ स्वयंसेवी कार्याची संकल्पना

'स्वयंसेवी कार्य ही मानवाच्या ह्रदयातून येणारी स्फूर्तिदायी घटना आहे. अनेक व्यक्ती आपले जीवन जगत असताना समाजातील विविध समस्या सोडवण्यासाठी एखाद्या अनुभवातून, स्वयंस्फूर्तीने किंवा एखाद्या व्यक्तीच्या प्रेरणेने मानव कल्याणासाठी स्वत:चे आयुष्य समर्पित करतात. आपल्या जीवन जगण्याचे ध्येय मानतात आणि कार्य करीत राहतात. वंचित मानवाच्या चेहर्यावरील हास्य, आनंद, समाधान यातच आपल्या जीवनाचा आनंद मानून जी माणसे अथवा ज्या व्यक्ती किंवा व्यक्तींचे गट कार्य करतात या कार्याला स्वयंसेवी कार्य असे म्हणतात.'

स्वयंसेवी कार्यात मोबदल्याची अपेक्षा नसते. ज्या व्यक्तींसाठी अथवा गटासाठी स्वयंसेवी कार्यकर्ते कार्य करतात त्याच्या जीवनातील 'आनंद' हीच स्वयंसेवी कार्यकर्त्याच्या जीवनातील कमाई असते असे ते मानतात.

भारतात अनेक कारणांमुळे ग्रामीण समाजामध्ये विकासाचे आणि जगण्याचे असंख्य प्रश्न होते. या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी देशात असंख्य कार्यकर्त्यांनी स्वयंसेवी वृत्तीने आणि विशेषत: प्रामाणिकपणे कार्य केले आहे. अशा कार्यामुळे आज भारतीय समाजात बदल दिसून येत आहे.

### १.२.१ स्वयंसेवक :

स्वयंसेवक हा शब्द अमेरिकेत सैन्यात स्वत:हून भरती होणाऱ्या सैनिकांसाठी वापरण्यात आला. त्याचबरोबर १९३० साली सैन्या व्यतिरिक्त स्वयंसेवा करणाऱ्या व्यक्तीसाठी स्वयंसेवक ही संज्ञा वापरण्यात आली. पुढे हा शब्द सैनिकांसाठी वगळण्यात आला. कारण सैनिक पगार घेऊन काम करू लागले. ज्या व्यक्ती स्वयंस्फूर्त आणि मोफत सेवा देऊ लागल्या त्यांच्यासाठी पुढे कार्यकर्ता हा शब्द दृढ झाला. पुढे विद्यार्थी वर्ग त्यांच्या शिक्षण घेण्याच्या काळात समाजासाठी मोफत काम करू लागले त्यांच्यासाठी स्वयंसेवक हा शब्द वापरण्यात येऊ लागला.

### १.२.२ स्वयंसेवकाची वैशिष्ट्ये :

१) पूर्णपणे सेवा हा विचार धरून काम करणे.

२) स्वत:च्या कुटुंबाबरोबर समाजाची बांधिलकी मान्य करून आपल्या दैनंदिन वेळेतील काही वेळ देणे.

३) विद्यार्थिदशेत असताना केले जाणारे स्वयंसेवी कार्य उदा. राष्ट्रीय सेवा योजना, एन.सी.सी.

४) देश कार्यासाठी स्वयंस्फूर्तीने आपल्या व्यस्त कामामधून काही वेळ देणे.

५) गावच्या मंडळाच्या कार्यासाठी काही वेळ खर्च करणे.

६) स्वत:कडील ज्ञान इतरांपर्यंत पोहचवण्यासाठी स्वयंस्फूर्तीने प्रयत्न करणे.

### १.२.३ स्वयंसेवी कार्याचे स्वरूप :

#### १) पर्यावरण :

आपल्या कार्यालयातील आणि निवास परिसरातील नागरिकांना पर्यावरणाच्या संवर्धनासाठी जागृत करणे. वनसंवर्धनाचे महत्त्व पटवून देणे, परसबाग निर्मितीचा विचार नागरिकांना सांगणे.

#### २) शिक्षण :

वंचितांच्या व मुलींच्या शिक्षणासाठी प्रयत्न करणे, शाळा सुरू करणे, शैक्षणिक साहित्याचे वाटप, ग्रामीण दुर्गम भागात शिक्षणाची व्यवस्था सुरू करणे.

**३) आरोग्य :**

आरोग्यासंबंधी नागरिकांचे प्रबोधन, गरिबांना मोफत आरोग्य सेवा, आरोग्य शिबिरे आयोजित करणे.

**४) तंत्रज्ञानाच्या प्रसारासाठी मदत :**

सध्या माहिती तंत्रज्ञानाच्या वापरावर सर्वच पातळीवर जास्त भर दिला जात आहे. या क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळी स्वयंसेवी वृत्तीने अशा स्वरूपाच्या ज्ञानाचा विविध क्षेत्रातील वापरासाठी मार्गदर्शन करू शकतात.

**आपली प्रगती तपासा :**

१) स्वयंसेवी कार्याची संकल्पना लिहा.

२) स्वयंसेवक : संकल्पना व व्याखा.

स्वयंसेवक स्वत:च्या आत्मप्रेरणेने समाज उपयोगी कार्य करणारा असतो अशा स्वयंसेवकावर कार्यासाठी कोणतेही बंधन नसते. कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करणारा हा स्वयंसेवक असतो. धर्म, जात इ. कोणताही भेदभाव त्याच्या मनामध्ये नसतो. स्वयंसेवक स्वत:च्या कार्यामध्ये झोकून देणारा असतो. समाजाच्या कल्याणाचा विचार करत असतो. कोणत्याही कार्याच्या मोबदल्यात कोणत्याही फायद्याचा विचार न करणारा स्वयंसेवक असतो. समाजाची सेवा हेच त्याचे उद्दिष्ट असते. अशा स्वयंसेवकांना त्याच्या उदरनिर्वाहासाठी काही ठिकाणी मानधन दिले जाते. हे मानधन त्याचा उदरनिर्वाह व्हावा हाच विचार करून तो स्वीकारत असतो. अशा प्रकारे कुठल्याही प्रकारची अपेक्षा न बाळगता समाजउपयोगी कार्य करणाऱ्या व्यक्तीस स्वयंसेवक असे म्हणतात.

१८५१ साली यंग मॅन ख्रिाश्चन असोसिएशनचे कार्य अमेरिकेच्या काही राज्यात सुरू झाले. या कार्यात असंख्य तरुण स्वयंस्फूर्तीने स्वयंसेवक झाले आणि समाजासाठी विविध स्वरूपाची कार्ये करायला लागते. या कार्यात त्यांनी स्वत:ला झोकून दिले होते. कालांतराने वाय.एम.सी.चे काम भारतात 'निलोखेरी' या खेड्यात सुरू झाले. या कार्यात असंख्य युवक स्वयंसेवेने काम करण्यास पुढे आले.

भारतात विशेषत: संत कालावधी, स्वातंत्र्यपूर्व काळातील सामाजिक बदलाच्या चळवळी 'स्वयंसेवक' या संज्ञेची साक्ष देतात. देशातील अनेक संतमंडळींनी समाजात सुसंस्कृतता नांदावी याकरिता स्वयंस्फूर्तीने नागरिकांचे प्रबोधन केले. स्वयंसेवी कार्यकर्त्यांनी आपले आयुष्य समाजाच्या सेवेसाठी स्वयंस्फूर्तीने समर्पित केले.

**स्वयंसेवकाची संकल्पना :**

१) जी व्यक्ती समाजाच्या विविध कार्यासाठी वेळेचे दान देते. ज्या व्यक्तीच्या ज्ञानाचा समाजाच्या विविध समस्या सोडविण्यासाठी उपयोग होतो. हा उपयोग होत असताना सदर व्यक्ती कोणत्याही मानधनाची अपेक्षा न करता स्वयंस्फूर्तीने कार्य करते या संकल्पनेला स्वयंसेवक असे म्हणतात.

२) आपले वैयक्तिक, व्यावसायिक जीवन जगत असताना आपल्या ज्ञानाचा, वेळेचा उपयोग समाजाच्या विविध कार्यासाठी करणाऱ्या व्यक्तीला व हे कार्य करताना कोणत्याही मानधनाची अपेक्षा न करणाऱ्या व्यक्तीला स्वयंसेवक म्हटले जाते.

३) कागदपत्रे तयार करण्यासाठी मदत -

काही संस्थांना विविध प्रकल्पाकरिता कागदपत्रे तयार करण्यासाठी मोफत मार्गदर्शन करणे, आर्थिकदृष्ट्या कमकुवत संस्थांना या माध्यमातून उभे करण्यास सहकार्य करणे.

**आपली प्रगती तपासा :**

१) स्वयंसेवकाची संकल्पना स्पष्ट करा.

## १.३ स्वयंसेवी संस्थां आणि त्याचे विविध प्रकार

स्वयंसेवी संस्थांना भारतात ऐतिहासिक संदर्भ आहे. स्वयंसेवी संस्थांना सेवाभावी संस्थां असेही म्हणतात. स्वयंसेवक जेव्हा वैयक्तिक पातळीवर समाजाचे कार्य करतो. त्यावेळी त्याला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यामुळे विकास कार्यात अनेक अडचणी निर्माण होतात. हे लक्षात आल्यानेच अधिक प्रभावीरीत्या सामाजिक कार्य करणाऱ्या अशा कार्यकर्त्यांनी एकत्रित येऊन स्थापन केलेल्या संस्थेस स्वयंसेवी संघटना असे म्हणतात.

YUVA VIKAS FOUNDATION

https://www.facebook.com

स्वयंसेवी संस्थां आपले कार्य स्वतंत्र पद्धतीने करत आहेत. त्यांनी स्वायत्तता स्वीकारलेली आहे. स्वयंसेवी सस्थांना बिगर शासकीय संस्थां असेही म्हणतात. ह्या संस्थां आपल्या कार्यपद्धतीने व आवश्यक असेल तेथे बदल करण्याची शासनाने त्यांना दिली आहे. मात्र त्यांनीसुद्धा योग्य पद्धतीने कार्य करावे यासाठी काही नियंत्रणे आहेत. या नियंत्रणामुळे विकासाला अडचणीचे असते.

अलीकडच्या काळात विकास कार्य व संशोधन कार्यामध्ये (Non Profit Sector) हा शब्दप्रयोग वापरला जात आहे. कारण स्वयंसेवी संस्थां ह्या समाजाला सेवा देणाऱ्या संस्थां म्हणून ओळखल्या जातात. त्यामुळे त्यांनी त्या सेवांच्या मोबदल्यात कोणताही मोबदला स्वीकारावा हे अपेक्षित नाही.

स्वयंसेवी संस्थांना Non Political Party Formation म्हणजेच बिगर पक्षीय कृतिशील गट असेही संबोधतात. कारण अशा संस्थां किंवा संघटना बिगर राजकीय स्वरूपाच्या असतात. त्या कोणत्याही राजकीय प्रश्नांशी संबंधित नसतात किंवा त्यांनी कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित राहू नये हे स्वयंसेवी क्षेत्राचे तत्त्व आहे.

समाजाकरिता सेवेच्या भावनेने काम करणे. समस्याग्रस्त अथवा अडचणीतील समाजाच्या समस्यांचे निराकरण करून त्या समाजाला आनंदी बनवण्याचा प्रयत्न करणे म्हणजे स्वयंसेवी कार्य होय.

**स्वयंसेवी संस्थांची संकल्पना :**

१) दु:खी किंवा असहाय्य लोकांना साह्य व संरक्षण करण्याच्या उद्देशाने लोकांच्या पुढाकाराने काम करणारी व त्यांच्या नियंत्रणाखाली असलेली संस्थां म्हणजे संस्थां होय.

२) तळागाळातील लोकांना साहाय्य करण्यासाठी किंवा स्वावलंबी बनविण्यासाठी नि:स्वार्थ बुद्धीने काम करणाऱ्या लोकांकडून चालणारी संस्थां म्हणजे सेवाभावी संस्थां होय.

३) प्रा. स. ह. देशपांडे - सर्वसामान्य जनतेचे विशेषत: अति गरिब, गरजू आणि मागासलेल्या वर्गाचे निकडीचे प्रश्न हातात घेऊन ते सोडविण्याचा प्रयत्न करणाऱ्या शासकीय किंवा निमशासकीय क्षेत्राबाहेरच्या नफा हेतू नसणाऱ्या म्हणजेच समाजसेवा हा प्रधानहेतू असलेल्या बाह्य नियमावलीच्या अधीन नसलेल्या संस्थां म्हणजे स्वयंसेवी संस्थां होय.

४) वसंत देसाई - स्वयंसेवी संस्थां ही अशी एक व्यापक संकल्पना आहे की ह्या संस्थां धर्मादाय कायद्याखाली नोंदल्या गेलेल्या असतात अथवा बिगर नोंदणीकृतही असू शकतात. या संस्थां अथवा गट शासनाकडून मदत न घेता ग्रामीण विकासाचे काम करतात. यामध्ये युवा संघटना, महिला मंडळ नागरिकांच्या संस्थां, लाभार्थ्यांच्या संस्थां, कामगारांच्या संस्थां, कामगार संघटना, धार्मिक संस्थां, व्यावसायिक संघटना सहभागी होतात. या संघटनांची नोंदणी झालेली असते. अगर त्या अनौपचारिक कार्य करत असतात.

५) लॉर्ड बेव्हरिज - स्वयंसेवी संस्थां म्हणजे अशी संस्थां की जिचे कार्यकर्ते मोबदला घेता अथवा न घेता सक्रिय करतात. जी संस्थां तिच्या सभासदामार्फत चालवली जाते. जिच्यावर बाहेरील कोणाचा दबाव अथवा हक्क नसतो. अशा संस्थेला स्वयंसेवी संस्थां म्हणतात.

वरील संकल्पना व व्याख्यांचा अभ्यास करता असे लक्षात येते की, स्वयंसेवी संस्थां स्वायत्त आहेत. त्या स्वत:चा निर्णय स्वत: घेऊ शकतात. स्वत:च्या कार्यपद्धतीचे कार्य करू शकतात. म्हणूनच विकासाला चालना मिळाली आहे. शासनाने स्वयंसेवी संस्थांची विविध विकास कामात मदत घेतलेली दिसून येते.

**आपली प्रगती तपासा :**

१) स्वयंसेवी संस्थांची संकल्पना स्पष्ट करा.

### १.३.१ स्वयंसेवी संस्थांचे विविध प्रकार :

#### १) ना नफा क्षेत्र (Non Profut Sector) :

सामाजिक कार्यात नि:स्वार्थ सेवा ही भारतीय संस्कृतीची प्रेरणा मानली जाते. भारतीय संस्कृतीने नि:स्वार्थ सेवेला ईश्वराची सेवा मानली आहे. या संदर्भानुसार ग्रामीण आणि शहरी भागात अनेक मंडळी वैयक्तिक पातळीवर अथवा आपले संघटन निर्माण करून समाजाची सेवा करण्याचा प्रयत्न करतात.

ना नफा संघटन म्हणजे कोणत्याही फायद्याची अपेक्षा न करता किंवा कोणत्याही लाभाची अपेक्षा न धरता केलेले सामाजिक कार्य.

ग्रामीण आणि शहरी भागात वंचित गट मोठ्या प्रमाणात असतो. या वर्गाला निवारा नसतो. दोन वेळेचे पुरेसे अन्नही मिळत नाही. साहजिकच रोजगाराचा अभाव असतो जर निवारा असेल तर परिसर अस्वच्छ असतो. अथवा निवारा पुरेसा नसतो. अशा व्यक्तींसाठी काही व्यक्ती आणि संघटना कोणत्याही लाभाची अपेक्षा न धरता या मंडळींचे जीवन आनंदी बनविण्याचा प्रयत्न करतात. याकरिता काही सामाजिक संस्थां अथवा धर्मादाय ट्रस्ट अल्प किमतीत कायम स्वरूपाचे अन्नछत्र चालवीतात. या अन्नासाठी जो प्रत्यक्ष खर्च येतो तेवढाच खर्च घेतला जातो. मोफत अन्नछत्र चालविण्यासाठी काही सामाजिक संस्थां आहेत. यात काही उद्योगांचे मालकसुद्धा अशा स्वरूपाचे काम करतात. उदा. जैन समाजाच्या संस्थां, तीर्थस्थान असणारी धार्मिक संस्थांने अशा स्वरूपाचे काम करतात.

काही सामाजिक संस्थां आरोग्य सेवेचे काम करतात. ह्या संस्थां रुग्णालये चालवतात. सर्वसामान्य लोकांकडून नपांयाची अपेक्षा न धरता फक्त जो खर्च येतो तेवढाच खर्च घेतला जातो किंवा धर्मादाय संस्थांकडून आर्थिक मदत घेऊन गरिबांना आरोग्य सुविधा पुरवतात. अशा प्रकारे कोणत्याही नपांयाची अपेक्षा न धरता केवळ सामाजिक भावनेने या संघटना काम करतात.

#### २) अशासकीय संस्थां अथवा स्वयंसेवी संस्थां (Non Governmental Organisation – N.G.O.) :

स्वयंसेवी संस्थां अशासकीय संस्थां म्हणून देखील ओळखल्या जातात. कारण या संस्थां आणि कार्यकर्ते शासकीय यंत्रणेचा भाग नसतात. या संस्थां वेगळया असतात. त्या आपली स्वायत्तता जोपासण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या कोणत्याही कामात शासन हस्तक्षेप करू शकत नाही. अलीकडच्या काळात शासन आपले विविध कार्यक्रम स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमाने राबवीत आहे.

युरोपमध्ये चर्चेच्या माध्यमातून ख्रिास्ती धर्माचा प्रचार करण्यासाठी मानवतावादी कार्य करणाऱ्या संस्थां होत्या. त्या स्वयंसेवी संस्थांच होत्या. त्यांना लागणारे पैसे धर्मसंस्थेमार्फत दिले जात

स्वयंसेवी संस्थां शासकीय नियमांच्या चौकटीत राहून काम करत असते. यामध्ये संस्थेची नोंदणी, आर्थिक व्यवहार, परकीय अर्थसाहाय्य, अनुदान यांसारख्या बाबी आहेत. भारतातील अशासकीय संस्थांची पूर्वीची भूमिका आता बदलत चाललेल्या दिसून येत आहेत.

**३) समुदाय विकास संस्थां (Community Development Organisation) :**

स्वयंसेवी संस्थां भारतातील ग्रामीण भागात विकासाच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर काम करीत आहेत. ग्रामीण समुदायाच्या कार्यक्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थां म्हणून समाज विकास संस्थां असे म्हटले जाते. ह्या संस्थां गाव, तालुका, जिल्ह्यामध्ये कार्य करीत आहेत. ग्रामीण भागातील दारिद्र्य, अंधश्रद्धा, शेती, शिक्षण, पाणी, आरोग्य, स्त्रियांचे प्रश्न इत्यादी अनेक प्रश्न आहेत. हे विविध प्रश्न सोडविण्यासाठी स्वयंसेवी संस्थां शासकीय यंत्रणेबरोबर विकासाचे कार्यक्रम राबवीत आहेत. यामागचा उद्देश असा की, समाजाचा विकास आणि ग्रामीण भागाचा विकास हा होय.

यासाठी शासनयंत्रणा अपुरी पडू लागली आहे. शासनव्यवस्था लोकांपर्यंत पोहचू शकत नाही. लोकसंघटनसुद्धा योग्य पद्धतीने शासन करू शकत नाही. यासाठी स्वयंसेवी संस्थांना विविध प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी कामे करावे लागत आहे. यासाठी शासनाचे अनुदानसुद्धा उपलब्ध होत आहे. स्वयंसेवी संस्थां विकास प्रक्रियेतील सर्व घटकांवर कार्यक्रम राबविण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.

**४) पक्षविरहित राजकीय संघटन (Non Parti Political Formation) :**

ग्रामीण विकासाची प्रक्रिया सर्वसमावेशक असली पाहिजे. याबाबत सर्वांचे एकमत आहे, ग्रामीण विकासाचा विचार करत असताना राजकीय पक्षांनी आपली राजकारणाची भूमिका सोडून पक्षविरहित विकासाची प्रक्रिया विशेषत: गावपातळीवर राबविणे आवश्यक असते. गावपातळीवर पक्षीय राजकारण आल्यास वेगवेगळया पक्षांच्या, राजकारणामुळे विकासाला खीळ बसते. हे आजपर्यंतच्या विकासाच्या प्रक्रियेत दिसून आले आहे.

स्वयंसेवी संस्थांना प्रा. रजनी कोठारी यांनी बिगर राजकीय पक्ष संघटना असा उल्लेख केला आहे. स्वयंसेवी संस्थांनी राजकीय पक्षाशी संबंधित राहू नयेत. किंबहुना राजकीय पक्षाशी संबंधित व्यक्ती ही संघटनेमध्ये नसावी त्यामुळे संघटनेची स्वायत्तता अबाधित राहते. अन्यथा राजकीय लोक आपल्या स्वार्थासाठी आपल्या मनाप्रमाणे या स्वयंसेवी संस्थांवर बंधने टाकतात.

स्वयंसेवी संस्थां कोणत्याही राजकीय पक्ष किंवा संघटनेशी संलग्न नसतात. मात्र काही स्वयंसेवी संघटनांची निष्ठा विशिष्ट राजकीय विचारसरणी साम्यवाद, समाजवाद, गांधीवाद किंवा हिंदुत्व यांच्याशी असते; ह्या विचारसरणीच्या लोकांनी आपली विचारधारा समाजामध्ये रुजविण्यासाठी अनेक स्वयंसेवी संस्थां स्थापन केल्या आहेत.

स्वयंसेवी संस्थां राजकारणापासून तटस्थ असल्या पाहिजेत. स्वयंसेवी संस्थांनी विकासाचे काम करत असताना सर्व पक्षाच्या प्रमुखांना आपल्या कामात सहभागी करून घेतले पाहिजे. पक्षीय भेद स्वयंसेवी संस्थांच्या कार्यात असता कामा नये. असा विचार प्रत्यक्ष

कृतीत आल्यास सर्व पक्षाची मंडळी अशा कामांना सहकार्य करतात असे आढळून आले आहे. बऱ्याच वेळा स्वयंसेवी संस्थांच्या कामात मतलबी राजकीय पुढार्यांची मक्तेदारी वाढते हे पुढारी इतर पक्षाच्या व्यक्तींना स्वयंसेवी कार्यात सहभागी करून घेत नाहीत त्यामुळे त्या संस्थेच्या कामावर अत्यंत विपरीत परिणाम होतो.

स्वयंसेवी संघटन हे पक्षविरहित असायला हवे. पक्षविरहित स्वयंसेवी संघटनेमुळेच विकासाचे काम उत्तम प्रकारे करता येते.

**आपली प्रगती तपासा :**

१) स्वयंसेवी संस्थेचे विविध प्रकार सांगा.

## १.४ सारांश

कल्याणकारी व्यवस्थेत लोकांच्या कल्याणाची सर्व जबाबदारी ही राज्यसंस्थां आणि तिच्या विविध संस्थांवर असते. नवीन आर्थिक धोरणाच्या काळात राज्यसंस्थां कल्याणकारी भूमिकेतून आणि कार्यक्षेत्रातून बाहेर पडत असली तरी तिथे निर्वात पोकळी निर्माण झाली नाही. राज्यसंस्थेची कल्याणकारी भूमिका बिगर शासकीय किंवा स्वयंसेवी संस्थांनी (NGO's) जबाबदारी घेतलेली दिसते. स्वयंसेवी संस्थांची बांधिलकी, विश्वासार्हता, व्यापकता आणि गुणवत्ता याबाबत बरीच वेगवेगळी आणि विरोधी मत-मतांतरे असली तरी कल्याणकारी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत स्वयंसेवी संस्थांचे स्थान महत्त्वाचे आहे.

## १.५ पारिभाषिक शब्द आणि अर्थ

१) Non Profit Sector (NPS) : 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर कार्यरत असणारे क्षेत्र

२) Non Political Party Formation (NPPF) : बिगर राजकीय पक्ष संघटन म्हणजेच कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित नसलेली संस्थां अथवा गट.

३) Company Development Organization (SDO) : समुदाय विकास संस्थां म्हणजे समाजातील दुर्बल व दुर्लक्षित घटकांसाठी कार्यरत संस्थां.

## १.६ अधिक माहितीकरिता संदर्भ

१) पानसे रमेश, सेवाभावी संघटना आणि ग्रामीण विकास, मराठी अर्थशास्त्र परिषद.

२) मानवी हक्क, तुकाराम जाधव, महेश शिरापुरकर, युनिक प्रकाशन.

## १.७ स्वाध्याय

१) स्वयंसेवी कार्याची संकल्पना स्पष्ट करून स्वयंसेवी कार्याचे स्वरूप सांगा.

२) स्वयंसेवकाची संकल्पना विशद करून स्वयंसेवकाकडे आवश्यक असणाऱ्या गुणांची चर्चा करा.

३) स्वयंसेवी संस्थांची संकल्पना स्पष्ट करून त्याचे विविध प्रकार सांगा.

❖❖❖❖

# २

# स्वयंसेवी संस्थांचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये

**घटक रचना :**


२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ स्वयंसेवी संस्थांचे स्वरूप

२.३ स्वयंसेवी संस्थांची वैशिष्ट्ये

२.४ सारांश

२.५ स्वाध्याय

२.६ संदर्भग्रंथ


## २.० उद्दिष्टे

स्वयंसेवी संस्थांचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये या प्रकरणाच्या अभ्यासातून पुढील बाबी समजतील.

- स्वयंसेवी क्षेत्राचे स्वरूप अभ्यासणे.
- स्वयंसेवी संस्थांची विविध वैशिष्ट्ये अभ्यासणे.

## २.१ प्रस्तावना

स्वयंसेवी क्षेत्र विविध विचारांनी आणि क्षेत्राने व्यापलेले आहे. संस्थांच्या कार्यात विविधता आलेली आहे. स्वातंत्र्योत्तर काळात महत्त्वपूर्ण बदल घडून आले. विविध विचारांची कार्यकर्ती मंडळी आपल्या वैचारिकतेच्या स्वरूपावरून मानव कल्याणाचे कार्य करत असतात. विचार आणि क्षेत्रे जरी अनेक असली तरी अंतिमत: समस्याग्रस्त मानवाच्या समस्या सोडविणे व त्याचे जीवन अधिक आनंदी करण्याचा प्रयत्न करणे हा यामागचा महत्त्वाचा विचार असतो.

भारतातील बहुसंख्य यशस्वी स्वयंसेवी किंवा बिगरशासकीय संस्थां ग्रामीण विकासाच्या क्षेत्रात कार्यरत आहेत. गांधीजींच्या रचनात्मक कार्यक्रमाचे उद्दिष्ट ग्रामीण विकास हे होते. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात असंख्य गांधीवादी कार्यकर्त्यांनी ग्रामीण भागात रचनात्मक म्हणजेच विकासाचे अनेक उपक्रम राबविले. याचाच अर्थ ग्रामीण विकास हा भारतातील विकास प्रक्रियेचा वैचारिक आणि कार्यात्मक केंद्रबिंदू आहे.

## २.२ स्वयंसेवी संस्थांचे स्वरूप

### २.२.१ विविध विचारांची बांधिलकी स्वीकारून स्वयंसेवी कार्य -

मानवी समाज विविध विचारांच्या माध्यमातून प्रेरित असतो. ही विचारांची शृखंला जागतिक पातळीवर मान्यताप्राप्त असते. सदर विचारांना योग्य अशी सैद्धांतिक बैठक असते. सदर विचार प्रवाहातील तात्त्विक बैठक स्पष्ट असते. त्यानुसार मानव आपले अस्तित्व मानवी समाजात सिद्ध करत असतो.

जागतिक पातळीवर समाजवाद, मार्क्सवाद, गांधीवाद, मिशनरी विचार, हिंदूवाद, आंबेडकर वाद अथवा परिवर्तनवादी विचार, मदरसे आणि विद्रोही विचार अशा स्वरूपाच्या विचारांनी संपूर्ण जगामध्ये स्वयंसेवी कार्य करत असत. भारतात या सर्वच विचारांनी स्वयंसेवी कार्य केले जाते. स्वयंसेवी चळवळीत जास्त प्रभाव गांधीवादी विचार, समाजवादी, मार्क्सवादी, हिंदुत्ववादी आणि मिशनरी विचारांचा आहे. गांधीवादी, समाजवादी मिशनरी आणि हिंदुत्ववादी विचारांची मंडळी प्रामुख्याने रचनात्मक कार्यावर जास्त भर देतात. प्रसंगी समाजवादी मंडळी संघर्षही प्रयत्न करतात.

मार्क्सवादी, आंबेडकरवादी आणि विद्रोही विचारांची मंडळी संघर्षाशिवाय प्रस्थापित व्यवस्था बदलता येणार नाही. या विचारांवर ठाम राहतात आणि अन्यायाविरुद्ध सातत्याने रस्त्यावर उतरून संघर्ष करत राहतात. अशा प्रकारे वरीलप्रमाणे विविध विचारांनी स्वयंसेवी कार्यात कार्यकर्ते अथवा संस्थां सहभागी होतात.

### २.२.२ स्वयंसेवी कार्याला विशिष्ट सीमारेषा असते :

स्वयंसेवी कार्य कायदेशीर आधार घेऊन करायचे असेल तर या कार्याच्या क्षेत्राची निश्चिती करावी लागते. समाजकार्य करण्यासाठी जो गट अथवा संस्थां स्वयंसेवी कार्य करण्यासाठी स्थापन होते. असे लोक आपले कार्यक्षेत्र पहिल्यांदा सभेत निश्चित करतात. १९५० च्या मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्थां नोंदणी कायद्यानुसार संस्थेचे कार्यक्षेत्र गाव, तालुका, जिल्हा, राज्य, देश असे असू शकते. संबंधित गट असे क्षेत्र स्वयंस्फूर्तीने निश्चित करत असतो. एकदा निश्चित झालेले कार्यक्षेत्र बदलता येते. त्यासाठी संस्थेच्या घटनेत दुरुस्ती करावी लागते.

काही संस्थांचा आकार लहान असतो अशा संस्थां स्थानिक पातळीवर काम करतात तर काही संस्थांकडे कार्यकर्ते आणि आर्थिक पाठबळ पुरेसे असते. या संस्थां अनेक राज्ये आणि देशभर काम करू शकतात.

### २.२.३ स्वयंसेवी कार्याचे स्वरूप तिहेरी असते :

**अ) रचनात्मक :**

रचनात्मक कार्यात समाजाच्या प्रश्नांचा शोध घेऊन ते प्रश्न लोकसहभागाच्या माध्यमातून सोडविण्याचा प्रयत्न केला जातो. या प्रक्रियेत समस्याग्रस्त नागरिकांच्या समस्यांचा अभ्यास करून मानसिकता बदलणे आणि प्रत्यक्ष कार्यक्रमाची अंमलबजावणी, मूल्यमापन करून पुढे त्रुटींची दुरुस्ती असे स्वरूप असते.

शासनाचे विविध विकासाचे कार्यक्रम अधिक कार्यक्षमपणे राबवून संबंधित लाभार्थ्यांना कार्यक्रमाचा लाभ उपलब्ध करून दिला जातो.

**ब) संघर्षात्मक :**

संघर्षात्मक कार्यात अन्यायग्रस्त समाजाला समस्या सोडविण्यासाठी संघर्ष करण्यास स्वयंसेवी संस्थां प्रवृत्त करतात. या विचारात कोणतीही समस्या संघर्षाशिवाय सोडविता येत नाही, असा कार्यकर्त्यांचा विचार असतो. त्या दृष्टीने ते संघर्ष स्वत: करतात.

काही प्रसंगात रचनात्मक विचारांचा उपयोग होत नाही. अशा वेळी संघर्ष हाच पर्याय असतो. उदा. विविध प्रकल्पांसाठी भूसंपादन करतात. यामध्ये नागरिकांच्या योग्य पुनर्वसनाचा प्रयत्न सरकारकडून होत नाही. काही वेळा सबळ समाज गटाकडून दुर्बल समाजगटावर अन्याय आणि अत्याचार होतो. प्रदूषणकारी विकास प्रकल्पामुळे पर्यावरण आणि मानवी समाजावरील वाईट परिणामांच्या विरुद्ध समाजाला संघर्ष करावा लागतो. अनेक सामाजिक प्रश्नांची तड लावण्यासाठी संघर्ष करावा लागतो.

**क) न्यायालयीन लढाई :**

बऱ्याच वेळा संघर्षात्मक कार्य सातत्याने सुरू ठेवणे शक्य नसते. शासन संघर्ष करणाऱ्या कार्यकर्त्यांना कोणत्या ना कोणत्या कारणाने त्रास देऊन नामोहरम करण्याचा प्रयत्न करते. कार्यकर्त्यावर खोट्या तक्रारी पोलिसांमध्ये दाखल करून त्यांना सातत्याने न्यायालयाच्या पायर्या झिजवायला लागतात. त्यामुळे चळवळीवर याचा अतिशय विपरीत परिणाम होते. कधी कधी चळवळ मोडून टाकली जाते.

संघर्षात्मक कार्याला न्यायालयीन प्रक्रियेची मदत घेतल्यास संघर्षाची चळवळ कायदेशीरदृष्ट्या यशस्वी करता येणे शक्य होते. यामुळे शासनालाही नरमाईची भूमिका घ्यावी लागते म्हणून संघर्ष आणि न्यायालयीन लढाई या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. केवळ संघर्षातून कधीच यश मिळत नाही. त्यासाठी न्यायालयीन लढाईचाही उपयोग करावा लागतो. संघर्षात्मक कार्यात अनेक वेळा कार्यकर्त्यांचे मानसिक खच्चीकरण होऊ शकते. कार्यकर्त्याला शारीरिक इजाही पोहचविली जाऊ शकते. या सर्व प्रकारात चळवळीची हानी होऊ शकते. अनेक वेळा चळवळी संपतात. कार्यकर्ते परागंदा होतात. यासाठी न्यायालयीन लढाई महत्त्वाची ठरते.

**२.२.४ काही संस्थां धर्मादाय कार्य करतात :**

काही संस्थां धर्मादाय स्वरूपाचे काम करतात. यातून केवळ मानसिक समाधान मिळणे एवढीच अपेक्षा असते. उदा. अनाथ मुलांचे पुनर्वसन, व्याधिग्रस्त व्यक्ती अथवा गट दत्तक घेणे, गरिबी निर्मुलनासाठी कार्य, अन्नछत्र चालविणे इत्यादी. अशा स्वरूपाच्या कार्यामुळे कुटुंबात समाजात ज्यांची टेहाळणी होते. त्यांना माणसाचे जीवन देण्याचे काम स्वयंसेवी संस्थां करतात.

काही स्वयंसेवी संस्थां आरोग्याचे काम करतात. अगदी अल्प खर्चात दवाखाने, रुग्णालये चालवीतात किंवा पीडितांसाठी रुग्णालये चालवीतात. वृद्धांसाठी वृद्धाश्रम सुरू करतात.

**२.२.५ प्रबोधन आणि प्रशिक्षणाचे कार्य :**

समाजाच्या बदलासाठी प्रबोधन आणि प्रशिक्षण होणे गरजेचे असते. अनेक संस्थां अशा स्वरूपाचे काम सातत्याने करत असतात. या संस्थां गरज भासली तर संघर्षाचे कामही करतात. प्रशिक्षणाच्या कार्यामुळे असंख्य अल्पशिक्षितांना कौशल्याचे शिक्षण मिळते त्यामुळे ते रोजगार, व्यवसाय करून त्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होते. प्रबोधनामुळे समाजात बदल व्हायला चालना मिळते. उदा. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समिती समाजातील अंधश्रद्धेच्या विषयी सातत्याने समाज प्रबोधन करत असते. निसर्गात

घडणाऱ्या प्रत्येक घटनेला कार्यकारणभाव असतो. याची जाणीव समाजाला सातत्याने करून देण्याचा प्रयत्न केला जातो. यामुळे विशेषत: ग्रामीण गरिब समाजामध्ये ज्या अंधश्रद्धा आहेत त्या नष्ट करता येतात.

### २.२.६ शासनाचे विकास कार्यक्रम गुणात्मक पद्धतीने राबविण्यासाठी सहकार्य :

शासन अनेक स्वरूपाचे विकास कार्यक्रम सातत्याने राबवत असते. हे कार्यक्रम शासकीय यंत्रणा गुणात्मक पद्धतीने समाजापर्यंत पोहचवू शकत नाहीत. त्यांच्या खूप मर्यादा असतात. याकरिता सातव्या पंचवार्षिक योजनेपासून स्वयंसेवी संस्थांची मदत घ्यायला सुरूवात झाली. यामुळे अनेक गरिबांसाठीच्या कार्यक्रमाचा बर्यापैकी लाभ लाभार्थ्यांना मिळण्याची संधी प्राप्त झाली. उदा. सुवर्णजयंती ग्रामस्वरोजगार योजनेच्या अधिक गतिशील अंमलबजावणीसाठी स्वयंसेवी संस्थां शासनाला चांगले सहकार्य करतात.

**आपली प्रगती तपासा :**

१) स्वयंसेवी संस्थांचे स्वरूप विशद करा.

## २.३ स्वयंसेवी संस्थांची वैशिष्ट्ये

### २.३.१ प्रस्थापितांच्या परिवर्तनवादी संस्थां :

बहुसंख्य स्वयंसेवी संस्थां प्रस्थापितांच्या असतात, तर फारच थोड्या संस्थां परिवर्तनवादी असतात. प्रस्थापितांच्या संस्थां शिक्षणप्रसार, अपंग संगोपन, धर्मादाय स्वरूपाचे कार्य करतात. अशा प्रकारच्या बहुसंख्य संस्थांचे कार्य व अस्तित्व शासकीय अनुदानावर अवलंबून असते किंवा परकीय मदतीवर त्या चालतात. अशा प्रकारच्या संस्थांकडून समाज प्रबोधन किंवा परिवर्तनाची अपेक्षा बाळगता येत नाही. परिवर्तनवादी स्वयंसेवी संस्था या कृतिशील आणि ध्येयवादी कार्यकर्त्यांची संघटना असते. त्यांचे कार्य आंदोलनाच्या, लोकशिक्षण किंवा लोकजागृतीच्या पातळीवर चालते. समाज प्रबोधन आणि समाज परिवर्तन हे त्यांचे प्रमुख ध्येय असते. सरकारी अनुदान किंवा परकीय मदतीऐवजी लोकांना सामोरे जाऊन त्यांना आपल्या कार्याचे महत्त्व पटवून देऊन जमा झालेल्या लोक वर्गणीवर त्यांचे कार्य चालते. प्रस्थापित राजकीय हितसंबंधांना लोकचळवळीच्या प्रत्यक्ष कृतीद्वारा आव्हान देऊन परिवर्तन घडवून आणण्याचे त्यांचे उद्दिष्ट असते.

### २.३.२ मर्यादित कार्यक्षेत्र :

उपेक्षित आणि शोषित समाजात काम करणाऱ्या अनेक स्वयंसेवी संस्थां आहेत. यातील बऱ्याच स्वयंसेवी संस्थां एका विशिष्ट कार्यक्रमावर सर्व लक्ष केंद्रित करतात. आणि परिवर्तनाच्या इतर बाजूंकडे दुर्लक्ष करतात.

### २.३.३ नेतृत्व :

स्वयंसेवी संस्थांचे नेतृत्व बहुतांशी बाहेरचे असल्याचे दिसून येते. स्थानिक नेतृत्वापेक्षा शहरी भागातून आलेले नेतृत्व अधिक अनुभव संपन्न असते. प्रतिकूल परिस्थिती लढताना या अनुभवाचा फायदा होतो. शासनाशी प्रस्थापित व संघटित यंत्रणांशी संघर्ष करताना हे

नेतृत्व दबून जात नाही व या गुणांचा जनमानसावर भार मोठा प्रभाव पडतो. संस्थेच्या निर्णयप्रक्रियेवर प्रभाव टाकणारे बहुतांशी प्रमुख कार्यकर्ते बाहेरून आलेले असतात. त्यांच्यामध्ये लोकांना आकर्षून घेण्याची शक्ती असते व लोकांना संघटित करण्यासाठी त्यांचा फार मोठा उपयोग होतो.

### २.३.४ कार्यपद्धती :

स्वयंसेवी संस्थांच्या कार्यपद्धतीमुळे काही व्यक्तींना अधिक वाव मिळतो. यशाचे अधिक श्रेय मिळते. एकदा यशाची विभागणी झाल्यानंतर श्रमाची विभागणी ज्येष्ठ-कनिष्ठ असे संबंध, ज्येष्ठांची अधिक सोय हे आपोआपच घडते. या विभागणीला या बदलांना संस्थेतील काही व्यक्ती विरोध करतात. पण तो विरोध संस्थेवर एकाधिकारशाही निर्माण करणाऱ्या गटाशी असतो व त्या विरोधाने संस्थेच्या कार्यपद्धतीत काही फार मोठे बदल घडत नाही. परंतु कार्यकर्त्यांच्या संदर्भात मात्र कटुता येते. विरोध करणाऱ्या व्यक्ती हळूहळू संस्थेपासून दूर होऊ लागतात व हे संस्थेवर नियंत्रण मिळवलेल्या व्यक्तींच्या दृष्टीने अतिशय सोईस्कर असते. संस्थेमध्ये वेळोवेळी अनेक कार्यकर्ते यांच्यात ज्येष्ठ-कनिष्ठ असे संबंध निर्माण होतात. संस्थेवर नियंत्रण असलेले कार्यकर्ते व नवे कार्यकर्ते यांच्यात ज्येष्ठ-कनिष्ठच नाही तर अनेक वेळा मालक-नोकर असे संबंध असल्याचा आभास निर्माण होतो.

### २.३.५ लोकसहभाग :

सामाजिक कार्ये सुरू करताना आपण लोकांबरोबर काम करावे. परिवर्तनासाठी होणाऱ्या संघर्षाच्या प्रक्रियेतून स्थानिक नेतृत्व उभे राहील व परिवर्तनाची लढाई पुढे घेऊन जाईल. असा एक आशावाद मनात असतो. या प्रक्रियेतून स्थानिक नेतृत्व उभे राहत असते. एखादे काम हाती घेण्याच्या निर्णय प्रक्रियेपासून त्या कामाची अंमलबजावणी व कामाच्या पूर्णावस्थेपर्यंत अनेक टप्पे.

प्रत्येक टप्प्यात लोकांना विश्वासात घेतले. त्यांचा उस्फूर्त सहभाग मिळवला तर फार वेगाने कामे पूर्ण होतात. यावर स्वयंसेवी संघटनांचा विश्वास असतो.

### २.३.६ ध्येयवादी कार्यकर्त्यांची अत्यल्प उपलब्धता :

धर्म आणि जाती व्यवस्थेच्या श्रेणीबंध परंपरागत निष्ठा आणि त्यामुळे निर्माण होणारी संकुचित मानसिकता यामुळे निखळ मानवतावादी दृष्टिकोन असलेले कार्यकर्ते मिळणे दुरापास्त झाले आहे. परिवर्तनाच्या आणि कल्पनांचा विचारदेखील जातीनिष्ठ आणि धर्मनिष्ठ भूमिकेतून केला जातो. जातीनिष्ठ व धर्मनिष्ठ मानसिकता आणि असंतुलितपणे होत गेलेला भांडवली विकास याच्या परिणामातून घडवले जाणारे व्यक्तीमत्त्व याचे परिणाम कार्यकर्त्यांच्या निष्ठावर होतात. परिणामी परिवर्तनाचा विचार मांडणारे आणि व्यवस्थेला धक्का देणारे स्वयंसेवी संस्थांचे कार्य परिणामकारकरीत्या उभे राहू शकत नाही.

### २.३.७ निधी संकलनाचा आकृतिबंध :

ज्याप्रमाणे स्वयंसेवी संस्थांच्या कार्यात विविधता असते. त्याचप्रमाणे त्यांच्या निधी संकलनाचे स्रोतदेखील विभिन्न असतात. संस्थेचे कार्य जसेजसे वाढू लागते. तसेतसे

संस्थांना अधिक निधीची गरज भासू शकते. अधिक निधीची गरज पूर्ण करण्याकरिता ज्या लोकांबरोबर काम करीत असतो. त्या जनसमूहातून निधी उभा करणे आणि देशी-परदेशी संस्थांकडून निधी मिळविणे हे दोन पर्याय असतात. जनसामान्यांकडून निधी उभारणे दुरापास्त असल्याने बहुसंख्य संस्थां शासकीय अनुदान किंवा परदेशी संस्थांकडून निधी मिळवण्याचा मार्ग स्वीकारतात. जन जागरणाच्या कामासाठी निधी देणाऱ्या देशी-परदेशी संस्थां भारतात काम करतात. सर्वच स्वयंसेवी संस्थांचे एक समान वैशिष्ट्य म्हणजे त्या सर्वांनाच उपलब्ध असणारा निधी अपुरा असतो कदाचित हाच त्यांच्या कार्यक्षम कार्यप्रणालीतील महत्त्वाचा अर्थ आहे. स्वयंसेवी संस्थांना प्राप्ती आणि खर्चाचे सविस्तर विवरण शासनाला निधी धारकांना सादर करावा लागतो.

### २.३.८ स्वायत्तता :

अशासकीय संस्थां काही विशिष्ट बाबतीत स्वायत्त असतात. जसे कार्यक्षेत्राची निवड, कार्यपद्धती आणि अंमलबजावणी इत्यादी. मात्र याचा अर्थ असा नव्हे की त्यांच्यावर कोणतीही बंधने नसतात, त्यांचे कोणत्याही प्रकारे नियमन केले जात नाही. सेवाभावी संस्थांसाठीही नोंदणी कायदा विश्वस्त आणि धर्मादायी संस्थां संबंधीचे कायदे आणि नियम आहेत. त्यांचे पालन करणे या संघटनांसाठी बंधनकारक असते. मात्र या औपचारिकतेखेरीज अशासकीय संघटनांना आर्थिक प्रशासकीय स्वायत्तता आणि कार्य पद्धती आपल्या इच्छेनुसार ठरविण्याचे स्वातंत्र्य असते.

### २.३.९ लवचिकता :

बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता म्हणजे लवचिकता होय. परिस्थिती नेहमी बदलती असते. बदलत्या परिस्थितीनुसार कार्यक्रमाच्या आखणीत आणि अंमलबजावणीत या संघटना बदल करू शकतात. आपल्या कार्यक्रमाची कार्यक्षमता आणि उपयुक्तता वाढवू शकतात.

उदा. पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्याचा प्रश्न हा स्थानिक गरज भागविण्याचा प्रश्न आहे. मूळ योजनेनुसार गावाच्या मध्यवर्ती ठिकाणी हातपंप बसवायचे होते. जवळपास एका मोठ्या धरणाचे काम पूर्ण होते त्यामुळे संपूर्ण गावाला नळाद्वारे घरोघर पाणी पुरविणे शक्य आहे. अशासकीय संघटना तात्काळ हात पंपाची योजना रद्द करून नळ योजना हाती घेते. यालाच आपण लवचिकता म्हणतो. जर अशासकीय संस्थां आपल्या धोरणात अशी लवचिकता आणू शकल्या तर ग्रामीण विकासाची कामे जलद आणि प्रभावीपणे पूर्ण होतील.

### २.३.१० आदर्श आणि उद्दिष्टांशी बांधिलकी :

अशासकीय संघटना आपले स्वतंत्र अस्तित्व जपण्याचा प्रयत्न करतात. प्रत्येक संस्थेचे आपले स्वत:चे आदर्श, उद्दिष्टे असतात. हे आदर्श आणि उद्दिष्टे अशासकीय संघटनांचे खरे सामर्थ्य असते. सामान्यपणे त्यांचे आदर्श आणि उद्दिष्ट राष्ट्रीय आदर्श आणि उद्दिष्टांशी सुसंगत असतात. उद्दिष्टांची क्रमवारीदेखील राष्ट्रीय क्रमवारीनुसार असते. ग्रामीण विकासाच्या संदर्भात बेकारी आणि दारिद्र्य निर्मुलन यासारख्या कार्यक्रमांना अर्थातच अग्रक्रम असतो.

ढोबळ समस्यांचा येथे उल्लेख केला आहे. अनंत समस्या आहेत आणि त्या सर्वच्या सर्व सोडविणे अत्यंत गरजेचे आहे. परंतु यासाठी हाती असलेली साधनसंपत्तीदेखील अमर्याद हवी पण भारतासारख्या विकसनशील देशात ती मर्यादित आहे. म्हणून विकासाची उद्दिष्टे प्रथम निश्चित करावी लागतात. नंतर त्याच्या महत्त्वानुसार क्रमवारी लावावी लागते. मर्यादित साधनसंपत्तीत उच्च क्रमांकाची उद्दिष्टे साध्य केली जातात. पुढे जशीजशी साधनसंपत्ती उपलब्ध होईल. तशी तशी खालच्या क्रमवारीची उद्दिष्टे साधली जातात. वरील आकृतीमधील समस्यांचीदेखील आपण क्रमवारी लावू शकतो. केवळ साधनांच्या मर्यादेमुळे विकासाचे सर्व प्रश्न एकाच वेळी सोडवता येत नाही. हे शासन आणि अशासकीय संघटना या दोहोंच्या बाबतीत खरी असते. अशासकीय संघटनांनी आपली लक्ष गटासाठी एकदा उद्दिष्टे स्वीकारली की ती पूर्ण करणे त्या आपली बांधिलकी मानतात.

### २.३.११ अर्थकारण :

स्वयंसेवी संस्थेच्या सुरूवातीच्या काळात कामाचे स्वरूप व भौगोलिक क्षेत्र लहान असते. त्याचप्रमाणे आर्थिक गरजादेखील कमी असतात. संस्थेचे कार्य वाढू लागल्यावर अधिकाधिक निधीची गरज भासू लागते. काही संघटना सदस्य वर्गणी सेवाखर्च लोक वर्गणीद्वारे जमा होणारा निधी उद्योगपती व व्यावसायिकांकडून मिळणाऱ्या देणग्या, केंद्र किंवा राज्य सरकारचे अनुदान, विदेशी दानशूर व्यक्ती व संस्थांकडून प्राप्त होणारी मदत इत्यादी साधनांद्वारे निधी उभारतात. भारतात निधी देणाऱ्या देशी-परदेशी संस्थां काम करताहेत. या संस्थांना त्यांची स्वत:ची ध्येय धोरणे व कार्यपद्धती आहे. या संस्थां कालबद्ध कार्यक्रमासाठी वेगवेगळया प्रकल्पासाठी निधी देतात. अशा प्रकारचे प्रकल्प मिळविणे हे संस्थेचे मुख्य काम होते.

### २.३.१२ लोकांचा ऐच्छिक सहभाग :

अशासकीय संघटनांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्या ज्या लोकांसाठी विकासाचे कार्यक्रम राबवायचे असतात. त्या लोकांचा अंमलबजावणीत सक्रिय सहभाग असला पाहिजे. याबाबत आग्रही असतात. शासकीय कार्यक्रमांसारखे एखाद्या विकासाचे काम लाभार्थी वर लादून त्यांचा सहभाग गृहीत धरून त्या कार्य करीत नाहीत. एखादे काम हाती घेण्याच्या निर्णय प्रक्रियेपासून ते पूर्ण अवस्थेपर्यंत लोकांना विश्वासात घेतात. लोकांचा ऐच्छिक सहभाग मिळविला तर कामे चांगली होतात. यावर अशासकीय संघटनांचा विश्वास असतो. अशासकीय संघटना या विश्वासानुसार वागतात. म्हणून कोणत्याही प्रकारच्या कार्यक्रमात लोकांचा अधिक प्रतिसाद मिळवू शकतात.

**आपली प्रगती तपासा :**

१) स्वयंसेवी संस्थांची विविध वैशिष्ट्यांवर चर्चा करा.

## २.४ सारांश

गतकाळामध्ये अनेक सेवाभावी संस्थांनी धार्मिक अभिमुखता स्वीकारून अनौपचारिक वातावरणामध्ये शिक्षण, औषधे (आरोग्य) आणि सामाजिक सुधारणा याबाबतच्या कृती कार्यक्रमावर भर दिला. या संस्थांच्या सदस्यांकडून लाभार्थ्यांना सन्मानपूर्वक आणि

विनामूल्य सेवा पुरविल्या जायची. आता या संस्थांनी राष्ट्रवादाभिमुख समूह दृष्टिकोनाचा औपचारिक वातावरणामध्ये स्वीकार केला आहे. वेतनावर, पूर्णवेळ आणि चाकरीबद्ध औपचारिक शिक्षण घेतलेल्या प्रशिक्षित कर्मचार्यांद्वारे समस्या बाधितांच्या सामाजिक आणि आर्थिक विकासाचे उद्दिष्ट अलीकडील स्वयंसेवी संस्थांनी स्वीकारलेले आहे. जनतेसाठी कार्यरत असणाऱ्या सेवाभावी संस्थां जनतेमार्फत आपला निधी उभा करतात. अनेक संस्थां या शासकीय व आंतरराष्ट्रीय संस्थांकडून मदत स्वीकारतात.

१९७० च्या दशकात एकात्मिक ग्रामीण विकासाच्या कार्यक्रमांच्या अंतर्गत अनेक विकास प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यासाठी अनेक स्वयंसेवी संस्थां स्थापन झाल्या. बिगरशासकीय संस्थांच्या माध्यमातून सुशिक्षित युवकांनी ग्रामीण आणि आदिवासी क्षेत्रातील लोकांना संघटित करायला सुरूवात केली आहे. सामाजिक कल्याण, पाणलोट क्षेत्र विकास, ग्रामीण विकास, आरोग्य, शिक्षण यांसारख्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या स्वयंसेवी संस्थां (NGO's) अनेक अशा वैशिष्ट्यांनी युक्त आहेत.

## २.५ स्वाधाय

१) स्वयंसेवी संस्थांचे स्वरूप स्पष्ट करा.

२) स्वयंसेवी संस्थांची विविध वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

## २.६ संदर्भग्रंथ


- नंदा पांगुळ - बारहाते - समुदाय संघटन.
- भारती शहा - समाजकार्य परिचय.
- स. मा. गर्गे - भारतीय समाजविज्ञान कोश, समाजविज्ञान मंडळ पुणे.
- प्राजक्ता टांकसाळे - एकात्मिक समाजकार्य.
- नीलप्रभा लक्कावार (केळकर) - समाजकार्याची रूपरेखा.
- डॉ. डोळे, वा.म., डॉ. कुलकर्णी न. - ग्रामीण विकासासंबंधी बिनसरकारी सेवाभावी संस्थांचा दृष्टिकोन, नाशिक, य.च.म.मु.वि.
- पानसे रमेश, सेवाभावी संघटना आणि ग्रामीण विकास, मराठी अर्थशास्त्र परिषद.
- डॉ. दिलीप पाटील, रवींद्र घागस, सुभाष सावंत, क्लेमिटाईन ज्यु. टिबेले स्वयंसेवी संघटना व त्याचे व्यवस्थापन.


❖❖❖❖

# ३

# स्वयंसेवी संस्था, उगम आणि विकास

**घटक रचना :**

३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ भारतातील स्वयंसेवी संस्था उगम आणि विकास

३.३ स्वयंसेवी संस्थांचा उगम आणि विकास महाराष्ट्राच्या संदर्भात

३.४ सारांश

३.५ स्वाध्याय

३.६ अधिक माहितीकरता

## ३.० उद्दिष्टे

स्वयंसेवी संस्था, उगम आणि विकास या प्रकरणाच्या अभ्यासाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

- स्वयंसेवी संस्थांचा उगम अभ्यासणे.
- भारतातील स्वयंसेवी संस्थांचा विकास अभ्यासणे.
- महाराष्ट्रातील स्वयंसेवी संस्थांचा उगम आणि विकास यांची माहिती मिळविणे.

## ३.१ प्रस्तावना

भारतावर अनेक आक्रमणे झाली. अनेक छोटी छोटी राज्ये या आक्रमणामुळे बदलली गेली. भारतात अनेक धर्म असूनही समाजात समाजसेवा सुरू राहिली. भारतीय समाज हा भारतीय संस्कृती, धर्म, परंपरा याने जखडला होता. भारतीय समाज वेगवेगळया जाती वर्गात विभागला गेलेला असला तरी एकीची, परस्पर प्रेमाची पूरकतेची सहअस्तित्वाची भावना प्रबळ होती. हडप्पा संस्कृतीपासून ते मुघल काळापर्यंत समाजसेवेचे अस्तित्व समाजात होते. समाज कल्याणाची बीजे भारतीय समाजातील धार्मिक सेवेत व परंपरागत सेवेत आहेत.

एकोणिसाव्या शतकापूर्वी समाजाची सेवा व प्रबोधन करण्याचे काम संतांनी केलेले दिसून येते. संत रामदास, तुकाराम, एकनाथ, सावता माळी, ज्ञानेश्वर या संतांना समाजाला मानवी स्वभावाचा अभ्यास करून जीवनाचा मार्ग सांगितला.

एकोणिसाव्या शतकात समाज सुधारणा करण्यासाठी चळवळी घडून आल्या. यातून समाजाच्या बदलत्या गरजा पूर्ण करण्याच्या उद्देशाने प्रयत्न केले गेले. समाजातील परिस्थिती बदलण्यासाठी, समाजातील शोषित-उपेक्षित लोकांना त्यांचे संरक्षण करण्यास, विविध रूढी व परंपरांना दूर करण्यास व समाजाचा विकास घडवण्यास विविध चळवळींनी योगदान दिले. यातून शिक्षण प्रसार, विधवा विवाहांना संमती, बाल विवाहास व सतीच्या प्रथेला प्रतिबंध, दलितांची प्रगती ही कार्ये झाली.

अनेक ऐच्छिक संस्थांची निर्मिती भारतात झाली. या संस्थांनी समाजाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले. यामध्ये विविध दानशूर समाजसेवी व्यक्ती व संस्थांनी फार मोठे काम केले आहे.

भारतात समाजसेवेची एक उज्ज्वल परंपरा आहे. समाजसेवेबरोबरच दान-धर्माला नेहमीच अनन्यसाधारण महत्त्व दिले आहे. दानामुळे पुढील जन्मात चांगले जीवन मिळेल. ही धर्मभावनादेखील समाजाला जातक होती. त्यामुळे समाजात बंधुभावशांतता व सुव्यवस्था नांदत आहे.

भारतातील हिंदू धर्मामध्ये दान करणारा मनुष्य श्रेष्ठ समजला जात होता. ही भावना सर्वच धर्मामध्ये आढळून येते. दानामध्ये विद्यादान, अभयदान, धनदान असे तीन दान समजले जात असत. धर्मशाळा मंदिर या सर्व कार्य करणाऱ्या प्रमुख संस्थां होत्या. भिकार्यांना भीक, भुकेलेल्यांना अन्न आणि निराश्रित लोकांना आश्रय हे त्या काळी समाज कार्याचे स्वरूप होते. देशातील राजे जमीनदार यांच्यावर समाज कार्याची जबाबदारी होती. मंदिराची स्थापना करणे, रस्ते बांधणे, तलाव बांधणे, विहिरी खोदणे, धर्मशाळा बांधणे अशा स्वरूपाचे काम विविध राजे करत असत. त्याशिवाय कुटुंब संस्थां, जातीसंस्थां, ग्रामपंचायत या समाजकार्य करणाऱ्या संस्थां होत्या.

प्राचीन काळी बौद्ध धर्मदेखील मोठा धर्म होता. या धर्मानुसार वैयक्तिक मदतीवर भर दिला जात असे. बौद्ध धर्मानुसार भिक्षूक मठाद्वारे समाजकार्य करीत असे.

मुस्लिम धर्मानुसार असाहाय्य आणि निर्धन लोकांना मदत करणे हे धर्माचे मूलभूत अंग समजले जात असे. रोग्यांना मदत करणे, शाळा, दवाखाने, मशिदी तयार करणे हे धर्मकार्य समजले जात असे. या काळातील समाज कार्य हे धर्म आणि शिक्षण या क्षेत्रात झाले.

पारशी धर्माप्रमाणेदेखील धर्मशाळा बांधणे, तलाव बांधणे, विहिरी बांधणे, गरिबांच्या शिक्षणाची सोय करणे अशा स्वरूपाचे समाजकार्य केले जात असे.

ख्रिश्चन धर्मामध्येदेखील ह्या दया आणि धर्म या दोन भावनांच्या आधारे समाजकार्य केले जात असे.

प्राचीन काळात समाजकार्य हे दानावर आधारित केले जात होते. तर आधुनिक काळातील समाज कार्यामध्ये गरजूंच्या गरजांचा विचार केला जात आहे.

## ३.२ भारतातील स्वयंसेवी संस्थां उगम आणि विकास

भारत देशात स्वयंसेवी संस्थांच्या कार्याला निश्चित स्वरूपाचा इतिहास आहे. देशातील सर्वच धर्मांनी अडचणीतील व्यक्तीची सेवा ही ईश्वराची सेवा मानली होती. हिंदू धर्माच्या तत्त्वज्ञानात समाजकार्याला दैवी कार्य मानण्यात आले.

देशात वैयक्तिक आणि सार्वजनिक अशा दोन्ही स्वरूपात सामाजिक कार्याची सुरूवात झालेली दिसते. पश्चिम बंगालमध्ये राजा राममोहन रॉय यांनी सती प्रथेच्या निर्मूलनासाठी विशेष प्रयत्न करून १८२९ साली सती प्रथा प्रतिबंधक कायदा इंग्रज सरकारने पारित लावला. ईश्वरचंद विद्यासागर यांनी विधवा पूनर्विवाहाचा पुरस्कार करून महिलांच्या शिक्षणाची चळवळ उभी केली. बहुपत्नीत्व पद्धतीचा कडाडून विरोध केला.

ब्रिटिश काळात खेड्यांच्या झालेल्या दुरवस्थेतून खेड्यांना बाहेर काढण्यासाठी चळवळ उभी केली. आर्थिक दुरवस्थेमुळे खेड्यात दारिद्र्य आणि आर्थिक विषमता तीव्र झाली. अशा प्रकारे देशात ख्रिाश्चन मिशनर्यांनी विषमता कमी करण्यासाठी आणि समता प्रस्थापित करण्यासाठी शिक्षणाची सुरूवात केली. भारतात काही मंडळी शिकून इंग्लंड, अमेरिकेत पुढील शिक्षण घेण्यासाठी गेले. तेथील समता पाहून आपल्या देशात अशा स्वरूपाची समानता निर्माण व्हावी, असा विचार निर्माण झाला.

भारतात व्यावसायिक समाजकार्याला साधारण १९ व्या शतकात सुरूवात झाली. मुंबईमध्ये सोशल सर्व्हिस लिगने अल्प कालावधीचे समाजकार्याचे शिक्षण देणारे प्रशिक्षण वर्ग सुरू केले. १९३६ साली क्विफोर्ड मार्शल यांनी स्कूल ऑफ सोशलवर्कची नागपाडा येथे स्थापना केली. तो भारतात १९२५ साली आला. त्यात भारत समाजकार्याला शास्त्रीय रूप यावे असे वाटले. त्यानंतर दिल्ली, कलकत्ता, हेरनो, वरनसई, बडोदा, आग्रा, अदलापूर या ठिकाणी व्यावसायिक समाजकार्याचे शिक्षण देणाऱ्या शाळांची सुरूवात झाली.

स्वातंत्र्यानंतर भारताच्या संविधानाने समाजकल्याणाची संकल्पना स्वीकारली त्यानुसार केंद्र आणि राज्य सरकार राज्यस्तरावर समाजकल्याण बोर्डाची निर्मिती करण्यात आली.

भारतात स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या समाजकार्याचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे.

### ३.२.१ गांधीजींच्या ग्रामपुनर्रचनेचा कार्यक्रम :

१९३८ साली वर्धा येथील सेवाग्राम आश्रमात या कार्यक्रमाची गांधीजींनी सुरूवात केली. हा गांधीजींचा १८ कलमी कार्यक्रम होता. ज्यात खादी, ग्रामीण उद्योग सुधारणा, मूलभूत शिक्षण, प्रौढ शिक्षण, ग्रामीण स्वच्छता, अस्पृश्यता निर्मुलन, मागासवर्गीयांची सुधारणा, महिलांचे कल्याण सार्वजनिक आणि स्वच्छता, दारूबंदी, मातृभाषेचा पुरस्कार आणि आर्थिक समानता इत्यादी घटकांचा समावेश होता.

गांधीजींचा रचनात्मक विकासाचा कार्यक्रम मानवाच्या विविध क्षेत्रांच्या विकासातून ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासावर आधारित होता. गांधीजींच्या या कार्यक्रमाचे मूळ तत्त्वज्ञान

सर्वांचे कल्याण हे होते. यात गांधीजींनी सर्वोदय असे नामकरण केले होते. सर्वोदय या संज्ञेचा अर्थ सर्वांचा आणि विशेषत: समाजातील अंतिम घटकाचा उदय होय.

गांधीजींचे म्हणणे असे होते की, ग्रामीण भागात उद्योगांचे स्थलांतर व्हायला हवे. देशातील सात लाख खेड्यात उद्योग उभे राहायला हवेत. गांधीजी ग्रामीण भागातील भागाला काम देणाऱ्या उद्योगांचा पुरस्कार करतात. गांधीजींनी ग्रामीण भागात कारागिराचे उद्योग तसेच सूतकमाई आणि विणाईचे उद्योग सुरू होण्यावर भर देतात. भारतातील ग्रामीण जनतेला ग्रामीण उद्योग पूर्व रोजगार देऊ शकतात. गांधीजींनी आपल्या रचनात्मक कामाच्या प्रेरणेचा हा महत्त्वाचा भाग मानत होते. ग्रामीण भागातील जीवनमान सुधारणे, सुविधा गांधीजींचा हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम होता.

गांधीजींचा ग्रामीण पुनर्रचनेचा कार्यक्रम सत्य आणि अहिंसेच्या तत्त्वावर आधारित होता. गांधीजींनी सरकारला अशा स्वरूपाचा कार्यक्रम हाती घ्यावा अशा स्वरूपाची भावना व्यक्त केली होती. सरकारने खादी आणि ग्रामोद्योगांच्या विकासासाठी प्रयत्न करावेत. असे झाल्यास खेडी स्वयंपूर्ण बनतील. यासाठी पंचायतीराज आणि सरकारचा विकास व्हावा, असेही महात्मा गांधीजींना वाटत होते.

महात्मा गांधी ग्रामीण विकासाचे विचार मांडून थांबले नाहीत. त्यांनी विचाराची कृती करण्याचा प्रयत्न केला. १९३७ साली गांधीजींनी एक महत्त्वाचा विचार मांडला तो विचार म्हणजे, 'मुळोद्योग शिक्षणाचा प्रयोग' होय. या प्रयोगाला नवी तालीम, जुनीयादी तालीम असेही म्हटले गेले आहे.

गांधीजींचे ग्रामीण विकासाचे मूलभूत विचार या संकल्पनेतून स्पष्ट होतात. मुक्त प्राथमिक शाळेतच मुक्तधामाचे शिक्षण घ्यायला हवे. या वयात मुलाला एखादा व्यवसाय शिकवावा जेणेकरून त्याची व्यावसायिक मानसिकता तयार होईल. पुढे त्याला शिकायचे नसेल तरी ते मूल मोठे झाल्यावर आपला व्यवसाय सुरू करून आपला स्वावलंबी जीवन जगू शकेल. ग्रामीण भागातील मुलाच्या अस्तित्वातील व्यवसायाचे प्रात्यक्षिकासहित ज्ञान द्यावे. मुलाला पुढे शिकायचे असेल तर ते पुढील शिक्षण घेऊ शकेल.

अशा प्रकारे हाताला कौशल्ये येईल आणि कौशल्याचे शिक्षण प्राथमिक स्थरावर दिल्यापुढे मुलांमध्ये व्यावसायिक वृत्ती विकसित होण्यास चालना मिळेल. स्वावलंबन यातूनच शक्य आहे. या शिक्षणास महात्मा गांधीजींनी जीवन शिक्षण असेही संबोधले होते.

दुर्दैवाने यथाकिंचित भारतीय शिक्षण तज्ज्ञांनी गांधीजींच्या विचारांची खिल्ली उडवली. गांधीजींचे विचार प्रत्यक्ष कृतीत आणणे शक्य होणार नाही. अशा स्वरूपात मत प्रदर्शन करून स्वतंत्रता काळात इंग्रज गव्हर्नर मेकॉले यांनी देशात सुरू केलेली पुस्तकी शिक्षण पद्धती देशात सुरू केली. गांधीजींच्या विचारापुढे दुर्लक्ष झाले. त्याचे कल आजच्या विद्यार्थ्यांना भोगावे लागत आहे.

१९६६ साली केंद्र सरकारने न्या. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षण आयोग नियुक्त केला होता. या शिक्षण आयोगाने कार्यानुभवावर आधारित शिक्षण द्यायला हवे असे आग्रही मत मांडले होते आणि महात्मा गांधीजींचे विचार किती महत्त्वाचे आहेत याची जाणीव होते.

### ३.२.२ गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांचा श्री निकेतन प्रकल्प :

१९२७ साली सुरत या गावी शांतीनिकेतनपासून २० मैलाच्या अंतरावर श्री निकेतनची स्थापना करण्यात आली? श्री निकेतनच्या माध्यमातून शेती आणि शेतीपूरक व्यवसायांचे ज्ञान देण्याची व्यवस्था रवींद्रनाथांनी केली. ग्रामीण सहकारी आरोग्य संस्थां निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी केला.




https://www.alamy.com

रवींद्रनाथांच्या मते विकास प्रक्रियेमध्ये माकडे, माणसे आणि मलेरिया या तीन अडचणी होत्या. हे तीन शेतकर्यांच्या जीवनात अडचणी निर्माण करतात. माकडापासून नासाडी होते. मलेरियापासून प्राणहानी होते. तर माणसे बर्याच वेळा एकमेकांशी अविश्वासाने वागतात. आपल्यातील गटबाजींमुळे एकमेकांच्या विकासामध्ये अडथळे निर्माण करतात.

अशा प्रकारे श्री निकेतनमध्ये शेतीसुधारणेत प्राधान्य दिले होते. त्याचबरोबर शेतीपूरक व्यवसाय म्हणून पशुसंवर्धन दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन आणि हस्त व्यवसायात सुरूवात केली. अशाप्रकारे रवींद्रनाथांचा स्वातंत्र्यपूर्व काळातील ग्रामीण विकासात प्रेरणा देणारा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प होता.

त्यांनी आठ गावांसाठी समूह विकास कार्यक्रम सुरू केले. परंतु बाजारपेठेची पुरेशी उपलब्धता नसते. व्यावसायिक मार्गदर्शनाचा अभाव, अंमलबजावणी यंत्रणेतील समन्वयाचा अभाव आणि कर्मचार्याला योग्य लाभ न मिळणे यामुळे या प्रकल्पावर मर्यादा पडल्या.

श्री निकेतन प्रकल्पामुळे ग्रामीण नागरिकांची स्वयंपूर्णता ग्रामीण संस्कृती सक्षमीकरण, स्वअस्तित्वाची जाणीव, देशातील संस्कृतीचे जतन, आधुनिक साधनसंपत्तीचा योग्य वापर ग्रामीण भागातील नागरिकांची शारीरिक, बौद्धिक आणि आर्थिक शक्ती उंचवावी हासुद्धा श्री निकेतनचा महत्त्वाचा उद्देश होता. जरी या प्रकल्पांना पुरेसे यश प्राप्त झाले नाही तरीही ग्रामीण पुनर्रचनेच्या दृष्टीने हा एक महत्त्वाचा प्रकल्प होता.

### ३.२.३ मार्तडन प्रकल्प (१९२२) :

यंग इंडिया ख्रिाश्चन असोसिएशन या संस्थेने श्रावणकोर किंचित संस्थांनात हाती घेतलेल्या हा महत्त्वाकांक्षी दारिद्र्य निर्मुलनाचा प्रकल्प होता. या विकास प्रकल्पात अमेरिकेत ग्रामीण विकासाचा अनुभव असलेले डॉ. स्पेंसर हॅच व त्यांची पत्नी रामिबी यांचे योगदान महत्त्वाचे होते.

श्रावणकोर कोचित संस्थांनातील मार्तडम परिसरातील तीन मैलांच्या परिसरात ४० अविकसित खेड्यांचा गट या प्रकल्पासाठी निवडत. या भागात दारिद्र्य मोठ्या प्रमाणात होत. शेतजमीन लागवडीच्या दृष्टीने फारशी सुपीक नव्हती. अशा परिस्थितीत लोक प्रबोधन करून ग्रामीण विकासाचा प्रयोग मांडल्यास लोकांच्या सहभागाच्या प्रमाणाची शक्यता जास्त होती.

या तीन मैलाच्या परिसरातील लोकसंख्या ४५ हजार होती. त्यातील ३० हजार हिंदू, १० हजार ख्रिास्ती व उर्वरित इतर धर्मीय होते. प्रत्येकी सात व्यक्तींपैकी एकच व्यक्ती निरक्षर होती.

परिसरात ३६ प्राथमिक शाळेत १८६ शिक्षक जवळपास हजार विद्यार्थ्यांना शिक्षण देत होते. शिक्षण मोफत नव्हते. त्यामुळे गरिबांना शिक्षण घेणे, शक्य होत नव्हते.

अशा परिस्थितीत या परिसरातील नागरिकांची स्थिती सुधारण्यासाठी संघटनेने पहिल्यांदा प्रशिक्षित कार्यकर्ते तयार करण्याचा प्रयत्न केला. प्रकल्पाची तात्त्विक निश्चित करण्यात आली. शारीरिक, बौद्धिक, आध्यात्मिक, आर्थिक व सामाजिक अशा प्रकारचा पंचसूत्री विकास कार्यक्रम तयार केला आणि प्रत्यक्ष कामाला सुरूवात केली.

लोकांकडे उपलब्ध असणारी साधनसामग्री वापरून लोकसहभागाद्वारे, आत्मनिर्भरता आणि तांत्रिक साधनांच्या आधारे, सर्वसमावेशक आणि कमकुवत घटकांना आधार देणारा व्यापक स्वरूपाचा, आध्यात्मिक बैठक असलेला हा प्रकल्प श्रावणकोर कोचित संस्थांनात यशस्वी करण्यात आला.

या प्रकल्पात काम करणारे कार्यकर्ते साधी राहणी आणि निर्वाह वेतन घेऊन काम करत होते. अत्यंत प्रामाणिकपणे कार्यकर्त्यांनी हा प्रकल्प यशस्वी करण्याचा प्रयत्न केला. या प्रकल्पाला उत्तम यश मिळाले. या प्रकल्पाचा केंद्राचा उकेरण रीडर डायजेस्ट या नियत कालिकाने Seven Dollars University असा केला होता.

### ३.२.४ गुरगाव प्रयोग :

१९२७ साली पंजाब राज्यातील गुरगाव जिल्ह्याचे सह-आयुक्त एफ.एल.ब्रयन यांनी हा प्रयोग सुरू केला. या कार्यक्रमाचा महत्त्वाचा उद्देश शेती सुधारणा, शिक्षण, आरोग्य आणि स्वच्छतेच्या सोयी सुविधा, सहकार आणि माध्यमातून अतिशय वेगाने समाज विकासाचे ध्येय निश्चित करण्यात आले होते. या महत्त्वाकांक्षी प्रयत्नांच्या माध्यमातून दारिद्र्य निर्मुलनाची सार्वत्रिक चळवळ या प्रकल्पाच्या माध्यमातून एफ.एल.ब्रयन यांनी हाती घेतली होती. त्यांनी या प्रकल्पांच्या माध्यमातून कामगारांना श्रेष्ठत्व देण्याचा प्रयत्न केला. स्वयंनिर्भरता निर्माण करण्यासाठी लोकप्रबोधनावर प्राधान्य क्रमाने भर दिला. यामध्ये चित्रपट लघुनाट्य आणि विविध खेड्यांचा उपयोग करण्यात आला. प्रत्येक गावात गाव मार्गदर्शक (Village Guide) नियुक्त करण्यात आले. या गाव मार्गदर्शकांच्या माध्यमातून विकासाच्या नवनवीन संकल्पना गावकर्यांच्या पर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न करण्यात आला.

या कार्यक्रमात नागरिकांचा सहभाग योग्य प्रकारे मिळत नाही. आहिरे आणि नाहिरे वर्गामधील विचारांची दरी हे याचे प्रमुख कारण होते.

### ३.२.५ ग्रामीण पुर्नरचनेचा बडोदा - प्रयोग :

१९३२ साली महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या बडोदा संस्थांनात हा प्रयोग सुरू केला. सयाजीराव गायकवाड हे प्रगतीत प्रोत्साहन देणारे आणि समाजातील अज्ञान दूर व्हायला पाहिजे. या विचाराचे राजे होते. या कार्यक्रमाचे मूळ उद्दिष्ट जीवनमान सुधारण्याची शक्ती नागरिकांच्यात निर्माण करणे आणि त्यांच्यात स्वयंनिर्भरता आणि स्वयंशक्ती निर्माण करणे हे या कार्यक्रमात पुढील घटकांचा समावेश करण्यात आला होता.

१) दळणवळण सुधारणा

२) पिण्याच्या पाण्यासाठी विहिरी खोदणे

३) मलेरिया प्रतिबंधक उपाययोजना करणे

४) कुरण विकास

५) सुधारित बियाणांचे वितरण

६) गृह उद्योगांचे प्रशिक्षण

७) प्रत्येक गावात पंचायत राज आणि सहकारी संस्थां निर्माण करणे

८) ग्रामीण शाळांचा विकास करणे, नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी शाळांमधून शेतीचे शिक्षण देणे

या कार्यक्रमात शासनाचे पूर्ण कायदेशीर आणि आर्थिक सहकार्य मिळावे. ग्रामीण विकासाचा बडोदा संस्थांनाचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प कोसंबा म्हणून परिचित आहे. हा प्रकल्प स्वत: राजे साहेबांनी लक्ष घातल्यामुळे खूप चांगल्या प्रकारे यशस्वी झाला.

### ३.२.६ फिरका विकास प्रकल्प (१९५६) मद्रास राज्य :

१९४६ साली चक्रवर्ती राजगोपाल यारी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाचे मंत्रिमंडळ सत्तेत आले होते. या राजगोपालचारी मंत्रिमंडळाने ग्रामीण विकासाचा 'फिरका विकास' प्रकल्प हा प्रयोग मांडला. या प्रयोगात ८ ते १० गावांचा एक गट अथवा फिरका तयार करण्यात आला. या फिरक्यासाठी एक ग्रामसेवक (VLW) नियुक्त करण्यात आला. ८ ते १० फिरक्यांचा मिळून एक विकास गट तयार करण्यात आला. अशा प्रकारे लोकसहभागावर आधारित हा फिरका विकास प्रकल्प होता. लोकप्रबोधन करून लोकसहभाग मिळवण्यात आला. स्थानिक कार्यकर्त्यांच्या सहभागाने फिरका विकास प्रकल्प राबविण्याचा प्रयत्न करण्यात आला. याही प्रकल्पात मिळवणे. कार्यकर्त्यांचा गट स्थापन करण्यात आला होता. कार्यकर्ते मंडळींनी लोकसहभाग उत्तम मिळतील. याच फिरका विकास प्रकल्पाची पुढील प्रतिकृती म्हणजे पंचायत राज होय.

१९५३-५४ साली पुढे हा कार्यक्रम सामुदायिक विकास कार्यक्रमात समाविष्ट करण्यात आला.

### ३.२.७ स्वातंत्र्यानंतरचे ग्रामीण विकासाचे प्रयोग :

#### १) इयवा प्रात्यक्षिक प्रकल्प उत्तर प्रदेश राज्य (१९४८) :

इ.स. १९३७ मध्ये गोविंद वल्लभ पंत यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाचे मंत्रिमंडळ U.P. च्या सत्तेवर आले होते. या मंडळाने ग्रामविकासविषयक योजनांची आखणी आणि अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने ग्रामीण विकासाचा स्वतंत्र विभाग प्रस्थापित केला.

दुसऱ्या महायुद्धानंतर काँग्रेस पक्षाचे ग्रामीण विकास खात्याचे सचिव श्री. अल्बर्ट मेयर (मायर्स) यांच्याकडे ग्रामीण विकासाचा तपशीलवार कार्यक्रम आखण्याची जबाबदारी सोपविली. मेयर यांनी यापूर्वीच्या ग्रामीण विकासाच्या प्रयोगाची तपासणी केली. यातील ग्रामीण विकासाशी उपयुक्त कार्यक्रमाशी सांगड घालण्याचा प्रयत्न केला.

ग्रामीण विकासासाठी ग्रामीण प्रजा, सरकारी यंत्रणा सेवाभावी संघटना यांचा परस्पर सहभाग, ग्रामीण सहकार्य आवश्यक आहे. अशा प्रकारे योजनांचे मूल्यमापन करून उत्तर प्रदेश राज्यासाठी कार्यक्रम तयार करावा अशा स्वरूपाची सूचना राज्य आणि केंद्र शासनाने केली होती.

उत्तर प्रदेशाच्या इयवा जिल्ह्यात हा प्रकल्प एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प होता. १९४८ रोजी आजूबाजूच्या ६४ खेड्यांत या प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाली होती.

या प्रकल्पात ग्रामीण विकासाकरिता ग्रामीण जनतेचा सहभाग आवश्यक आहे. हे तत्त्व मान्य करण्यात आले होते. जनतेची इच्छाशक्ती तयार करणे. आर्थिक व श्रमदानाच्या रूपात गावकऱ्यांचे सहकार्य अभिप्रेत होते.

या कार्यक्रमाची निश्चिती करताना ग्रामविकास हा महत्त्वाचा भाग मानण्यात आला होता. यात,

१) ग्रामविकास लोकांची चळवळ झाली पाहिजे, लोकांनी लोकांच्याकरिता लोकांच्यासाठी आखलेली चळवळ आहे आणि प्रशासकीय यंत्रणेचा तो भाग आहे.

२) लोकांच्या गरजानुरूप सूचकांचा विचार करूनच कार्यक्रमांची आखणी केली जावी.

३) ग्रामीण भागाचे परिवर्तन घडवून आणणे.

स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रामीण विकास कार्यक्रमाची पूर्वतयारी म्हणजे इयवा प्रायोगिक प्रकल्प होय. या प्रकल्पात अमेरिकन सरकारने आर्थिक आणि तांत्रिक सहकार्य उपलब्ध करून देण्याचे मान्य केले होते.

अल्बर्ट मेयर यांनी या कार्यक्रमाची चाचणी करताना काही निकष निश्चित केले होते.

१) सर्वांगीण विकास ही आर्थिक विकास

२) आर्थिक बदल की वैचारिक बदल

३) राज्य सरकारचा सहभाग

४) स्थानिक गरजा आणि नेतृत्वात प्राधान्य

५) ग्रामीण परिसराच्या विकासाची व्यापक योजना

६) उद्दिष्टे निश्चित साध्य करण्याकरिता कठोर परिश्रम

७) लोकांबरोबर ग्रामीण भागातील प्रत्येक संस्थां व संघटना यांचाही सहभाग आवश्यक

अशा प्रकारे राज्य पातळीवर वा प्रकल्पासाठी स्वतंत्र यंत्रणा निश्चित करण्यात आली. या प्रकल्पाला चांगल्या प्रकारचे यश प्राप्त झाले. काही कार्यक्रमाच्या बाबतीत मर्यादा आल्या. परंतु प्रयोग म्हणून हा प्रकल्प ग्रामीण विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असतो.

**२) एस.के.डे. यांचा मजदूर मंझिल प्रकल्प (प्रयोग) :**

भारत देश स्वतंत्र होताना भारत आणि पाकिस्तान हे दोन देश निर्माण झाले. देशाची फाळणी झाली. फाळणीपूर्व पाकिस्तानातून सिंधी समाजाची मंडळी मोठ्या संख्येने विस्थापित होताना भारताच्या आश्रयाला आली. या नागरिकांची संख्या एक कोटीच्या आसपास होती.

दिल्लीपासून १० मैल अंतरावर असलेल्या मजदूर मंझिल खेड्याच्या परिसरात हे नागरिक स्थिरावले होते. या नागरिकांच्या छावण्या तयार करण्यात आल्या होत्या. त्यांना आर्थिक मदत देऊन पांगळे करण्यापेक्षा त्यांच्या असलेल्या उपजत व्यावसायिक गुणांना पूर्णरूप देऊन त्यांना त्यांच्या पायावर उभे करणे ही S.K.Dey यांच्यासमोर प्रमुख जबाबदारी होती.

एस.के.डे यांनी निर्वाचित मंडळीचा सव्हे केला. या सव्हेत या नागरिकांकडे काही व्यावसायिक कौशल्य असलेले आठवले. या कौशल्यावर आधारित प्रशिक्षण आणि व्यवसाय वृद्धीसाठी प्रयत्न करण्याचे ठरवून एस.के.डे. आणि त्यांच्या सहकार्यांनी प्रकल्प तयार केला. निर्वासितांना स्वावलंबी बनविण्याचा यशस्वी प्रयत्न केला. याही प्रकल्पाला उत्तम यश मिळाले. आजच्या स्थितीत सिंधी निर्वासित मंडळी व्यावसायिक विकासात आघाडीवर दिसतात. त्याचे मूळ मजदूर मंझिल प्रकल्पात आहे.

प्रकल्पाच्या मर्यादा सामुदायिक विकास प्रकल्पात कमी करण्याच्या प्रयत्न करण्यात आला. या प्रकल्पाने शेती उद्योगाच्या स्थानिक स्वराजाचे हक्क असलेल्या ग्रामीण विकासाच्या मूळ स्थापनाची दिशा मिळावी, म्हणजे ग्रामीण भागात शेती उद्योगाच्या माध्यमातून विकास साधने शक्य आहे, हे या दृष्टिकोनाने दाखवून दिले. या प्रकल्पावर आधारित पहिल्या पंचवार्षिक योजनेत ५२ सामुदायिक प्रकल्प राबविण्यात आले. प्रकल्प हे प्रगतीचे प्रतीक होते. या प्रकल्पाची स्वतंत्र कार्यपद्धती होती. या कार्यपद्धतीनुसार जोडद्योग सुरू झाले. त्यांना स्पर्धात्मक पातळीवर थोडा त्रास सहन करावा लागला. परंतू हा पंचायत राज आणि ग्रामीण विकास कार्याच्या प्रशिक्षणाचे महत्त्वाचे केंद्र होते.

**३) आचार्य विनोबा भावे यांची भूदान चळवळ :**

आचार्य विनोबा यांनी भूदान चळवळीचा प्रयोग प्रथम देशात मांडला. देशातील गरिब भूमिहीनांच्या दृष्टीने ही महत्त्वाची चळवळ होती. आजच्या स्थितीत माणूस स्वावलंबी विचार करायला लागला आहे. परंतु भूदानाच्या विचाराने मानवास समोरच्या व्यक्तीच्या समस्यांचा विचार करायला लावला. भूदान म्हणजे जमिनीचे वितरण होय. ज्यांच्याकडे जास्त जमीन

आहे. त्या मंडळीनी आपल्याकडील जमिनीचा काही हिस्सा ज्यांना जमीन नाही त्यांना देणे या माध्यमातून ग्रामीण भागातील आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करायचा होता.

१९५१ साली विनोबा भावे यांनी हैद्राबाद मधील तेलगंणा जिल्ह्यातून भूदान यज्ञ चळवळीस सुरूवात केली. जमिनीचे प्रश्न मानवतेच्या नात्याने आणि शांततेने सोडवावेत ही या मागची विनोबांची संकल्पना होती. जमीन सुधारणा चळवळीसाठी योग्य प्रकारचे वातावरण विनोबांना करायचे होते.

विनोबा भावे यांनी मोठ्या प्रमाणात जमीनदारांच्या माध्यमातून मतपरिवर्तन केले. यातून लाखो हेक्टर जमीन विनोबांनी मिळविली. त्यांच्या पश्चात मात्र ही चळवळ योग्य रूप घेऊन शकली नाही. भूदानात मिळालेल्या जमिनीची योग्य प्रकारे वाटणी झाली नाही.

विनोबा भावे यांनी ग्रामदानाची आणि त्यातून निर्माणाची संकल्पना मांडली. महाराष्ट्रात २८ ग्रामदानी गावे आहेत. ग्रामदानी गावातील जमिनीची मागणी संपूर्ण गावाची असते. विनोबा भावे याची ग्रामदानी गावाची संकल्पना महत्त्वाची होती. परंतु शासनाने या संकल्पनेकडे योग्य लक्ष दिले नाही.

अशा प्रकारे भूदान आंदोलनाच्या माध्यमातून विनोबांनी केलेली चळवळ जरी अपयशी ठरली असली तरी या चळवळीतून असंख्य भूमिहीनांना जमिनी मिळाल्या हे नाकारून चालणार नाही.

**आपली प्रगती तपासा :**

१) स्वयंसेवी संस्थांचा उगम कसा झाला ते लिहा.

२) भारतातील स्वयंसेवी संस्थांचा विकास कसा होत गेला ते स्पष्ट करा.

## ३.३ स्वयंसेवी संस्थांचा उगम आणि विकास महाराष्ट्राच्या संदर्भात

महाराष्ट्र राज्यात १९ व्या शतकात पाश्चात्त्य शिक्षणाच्या प्रसारामुळे सामाजिक चळवळीत गती मिळाली. मुंबई पुण्यातील मंडळीनी पाश्चात्त्य शिक्षण घेतले. पाश्चात्त्य शिक्षणापुढे येथील विषय सामाजिक रचनेविषयी हे शिक्षण घेतलेल्या समाज सुधारांच्या मनात चीड निर्माण झाली.

महाराष्ट्राच्या सामाजिक कार्याच्या ऐतिहासिक संदर्भाचा आढावा घेता येथील संत परंपरेपासून समाजातील वाईट प्रवृत्तीवर अथवा विषमतेवर कोरडे ओढण्याचा प्रयत्न झाला. या विषमतेत सुधारणा व्हावी याकरिता सतांनी आपल्या परीने प्रयत्न केले. ज्ञानेश्वर, एकनाथ, चक्रधर, तुकाराम इत्यादी सतांचा यात पुढाकार होता. शिवाजी महाराजांनी या विषमतेविरुद्ध आपल्या राज्यात कायदे करण्याचा प्रयत्न केला. सर्व समाजाच्या लोकांना आपल्या राज्यकारभारात सहभागी करून घेण्याचा प्रयत्न केला.

१९ व्या शतकात धार्मिक रूढी परंपरेच्या गुंतागुंतीमधून सर्व सामान्य दलित, पीडित वर्गात राजकीय न्याय मिळायला हवा. या दृष्टीने प्रयत्न सुरू झाले. पुराणमतवादी लोकांच्या विरुद्ध कोरडे ओढण्याचा प्रयत्न झाला.

**आचार्य बाळशास्त्री जांभेकर :**

यांनी सतीच्या चालीरीती विरुद्ध आणि लहान मुलींच्या हत्येविरुद्ध आपल्या दर्पण या वृत्तपत्रामधून कोरडे ओढण्याचा प्रयत्न केला.

**गोपाळ हरी देशमुख (१८२३ - १८९२) :**

यांनी आपल्या माध्यमातून पुराणमतवादी ब्रह्मणांच्यावर वैचारिक हल्ला चढवला.

**जोतिराव गोविंद फुले तथा म. फुले (१८२७ ते १८९०) :**

यांनी जातीयतेविरुद्ध लढा दिला. १८४८ साली पुण्यासारख्या कर्मठ शहरात गोप्याच्या वाड्यात सर्वसामान्य वर्गाच्या मुलींसाठी शाळा सुरू केली. मुलींना शिकण्यासाठी स्वत: सावित्रीबाईना शिकविले. आणि शाळेच्या शिक्षिका बनविले. यामुळे बहुजनात नव्हे तर सर्वच समाजाच्या मुलींना शिक्षणाची संधी दिली. बालविधवा गृहाची स्थापना करून बालविधवांना शिक्षण देण्याचा प्रयत्न महात्मा फुले आणि सावित्रीबाइर्नी केला.

महात्मा फुलेच्या या प्रयत्नांमुळे आज मोठ्या प्रमाणात महिला शिक्षण घेऊन पुढे येत आहे. सर्व क्षेत्रांत पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांच्या वर्गाने भरारी घेतली आहे. महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची व्यापना केली.

**रामकृष्ण गोपाळ भांडारकर (१८३७ ते १९२५) आणि न्या. महादेव गोविंद रानडे (१८४२ ते १९०१) :**

यांनी प्रार्थना समाजाची स्थापना करून सामाजिक आणि आर्थिक सुधारणा करण्याचा प्रयत्न केला.

**गोपाळ गणेश आगरकर (१८५६ ते १८९५) :**

यांनी प्रामुख्याने सर्व समाजाच्या सामाजिक परिवर्तनासाठी प्रयत्न केले.

**महर्षी धोंडो केशव कर्वे (१८५८ ते १९६२) :**

यांनी महिलांच्या शिक्षणासाठी आपले आयुष्य सर्मपित केले. त्यांनी महिलांना उच्च शिक्षण मिळावे याकरिता नासिबाई ठाकरसी महिला विद्यापीठाची स्थापना केली. आज असंख्य महिलांना व्यावसायिक शिक्षण देऊन स्वावलंबी होण्याची संधी प्राप्त झाली आहे.

**बेहरामजी मलवारी (१८५३ ते १९१२) :**

सर्व समाजाच्या महिलांच्या आणि विशेषत: विधवा महिलांच्या पुनर्वसनासाठी मुंबई येथे सेवासदन सोसायटीची स्थापना केली.

**पंडिता रमाबाई (१८५८ ते १९२२) :**

उच्च समाजातील विधवांच्या पुनर्वसनासाठी १८९० साली शारदा सदनाची स्थापना केली. त्यामुळे समाजातील विधवांना सन्मानाने जीवन मिळण्यास मदत झाली.

**विठ्ठल रामजी शिंदे (१८७३ ते १९४४) :**

डिस्प्रेस्ड क्लास मिशनची स्थापना करून समाजातील अस्पृश्यतेविरुद्ध लढा उभारला. अस्पृश्य वर्गाला सामाजिक, आर्थिक समानता मिळायला हवी. यासाठी सामाजिक प्रबोधन करण्यास सुरूवात केली. अस्पृश्य वर्गाचे प्रबोधन करून त्यांच्यातील माणूस जागा करण्याचा प्रयत्न केला.

**कर्मवीर भाऊराव पाटील :**

वंचितांच्या शिक्षणासाठी संपूर्ण आयुष्य समर्पित केले. महाराष्ट्रातील लोकांस आणि शेतकरी गरिब समाजाच्या मुलांसाठी शिक्षणाची सोय केली. याकरिता रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. सामाजिक, आर्थिक विषमता शिक्षणाच्या माध्यमातून नष्ट करता येईल. यावर त्यांचा विश्वास होता.

गरिब मुलांना आर्थिक पाठबळ मिळावे याकरिता त्यांनी 'कमवा व शिका' योजना सुरू केली. आशिया खंडातील एक अग्रगण्य शिक्षण संस्थां म्हणून नावारूपास आणली. बहुजन समाजातील हजारो मुले कर्मवीर भाऊराव पाटलाच्या प्रेरणेने आज उच्च शिक्षण घेऊन उच्च पदाच्या नोकर्या मिळवून आपले दारिद्र्य संपवले आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर (१८९२ ते १९५६) :**

बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित समाजाच्या स्थानासाठी आपले संपूर्ण कार्य समर्पित केले. दलित समाजात शिका - संघटित व्हा आणि संघर्ष करा. हा विकासाचा मूलमंत्र दिला.

अस्पृश्यता निर्मूलनासाठी सामाजिक लढा उभारला. यामध्ये चवदार तळयाचा सत्याग्रह, काळाराम मंदिर सत्याग्रह मनुस्मृतीचे दहन अशा स्वरूपाच्या सत्याग्रहाच्या माध्यमातून अस्पृश्य वर्गातला माणूस जागा करण्याचा प्रयत्न केला.

महिला वर्गाला सामाजिक न्याय प्राप्त व्हावा, त्यांना जगण्याचा कायदेशीर हक्क मिळावा. याकरिता स्वतंत्र भारताच्या पहिल्या मंत्रिमंडळात कायदेमंत्री असताना 'हिंदू कोडबिल' मांडणे. स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेचे लिखाण केले. घटनेत देशातील प्रत्येक मानवाला सामाजिक-आर्थिक व राजनैतिक स्वातंत्र्य आणि बंधुता कायद्याने बहाल करण्याचा हक्क केला. अस्पृश्य वर्गाला भीक नको, हक्क हवा आणि तोही कायदेशीर असा आग्रह धरला.

हिंदू धर्मातील अस्पृश्यता घालवावी याकरिता खूप प्रयत्न केले. अस्पृश्यता नष्ट होण्याची स्थिती दिसेना याची जाणीव आल्यामुळे १९५६ साली आपल्या लाखो अनुयायांसह हिंदू धर्माचा त्याग करून भारतात जन्मास आलेल्या परंतु भारतातच लोप पावलेल्या गौतम बुद्धाच्या बुद्ध धर्माची दीक्षा घेतली. देशातील दलितांना माणूस म्हणून जगण्याची संधी उपलब्ध करून दिली.

भारतीय राज्यघटनेत १७ वे कलम समाविष्ट करून या कलमानुसार अस्पृश्यता पाळणे हा गुन्हा ठरविला. अनेक सामाजिक आणि आर्थिक समतेची कलमे घटनेने समाविष्ट केली.

**छ. शाहू महाराज :**

छ. शाहू महाराजांनी आपल्या कोल्हापूर संस्थांनात सर्व समाजाच्या मुलांकरिता स्वतंत्र वसतिगृहाची सोय सुरू करून मागासवर्गीयांना आणि इतर दुर्बल घटकांच्या मुलांना शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली.

१९०१ साली मागासवर्गीयांसाठी नोकर्यांमध्ये खास आरक्षणाची सोय केली. यामुळे मागासवर्गीयांना उच्च पदावर काम करण्याची संधी प्राप्त झाली.

**अप्पासाहेब पटवर्धन (१८६४ ते १९७७) :**

कोकण गांधी पू. अप्पासाहेब पटवर्धन यांनी संपूर्ण देशभर 'भंगीमुक्ती' चळवळ उभी केली. भंगी समाजाला गलिच्छ कामापासून मुक्त करण्याची त्यांचे धोरण होते.

ब्रह्मण भंगी भाई भाई,

अपनी अपनी करो सफाई,

ब्रह्मण भंगी प्रभू संतात,

सफाई पूजा एक समान॥

या कवनाच्या माध्यमातून समाजाला आपआपली सफाई आपण करावी असे आवाहन केले.

येपलीच्या शौचालयामुळे भंगी समाजाला होणारा त्रास घालवण्यासाठी सुधारित गोपुरी शौचालय, सोण शौचालय, म्हरो खेत तयार होणारी मुतारी, आणि गोबरगॅसचा महाराष्ट्रात पहिला प्रयोग १९५३ साली यशस्वी केला.

मागासवर्गीय नागरिकांना मृत जनावरे शोधल्यामुळे भोगावी लागणारी अस्पृश्यता घालवण्यासाठी स्वत: मृत जनावरांची कातडे काढायला सुरूवात केली.

१९४४ साली कणकवली येथील वागदे गावात गोपुरी आश्रम या संस्थेची स्थापना करून ग्रामोद्योग, शेती, गोशाळा उपक्रम सुरू करून ग्रामीण भागाच्या विकासासाठी वेगळी दिशा देण्याचा प्रयत्न केला.

**बाबा आमटे, रावसाहेब पटवर्धन, गोविंदराव शिंदे :**




https://www.yoळtळbe.com

या समाज कार्यकर्त्यांनी कुष्ठरोग निर्मुलनाचे कार्य महाराष्ट्रात उभे केले. महाराष्ट्रातील कुष्ठरोग्यांना माणसाची जीवन उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला.

हाच महाराष्ट्राच्या स्वयंसेवी कार्याचा वारसा आजही सुरू आहे. आज असंख्य कार्यकर्ते ग्रामीण विकासाच्या विविध क्षेत्रांत सामाजिक कार्यात सहभाग घेत आहेत. यात रचनात्मक आणि संघर्षात्मक असा दोन्ही स्वरूपात महाराष्ट्रातील कार्यकर्ते सहभागी आहेत.

श्रीमती मेधा पाटकर, अण्णा हजारे, डॉ. भारत पाटणकर, जयवंत मयेकर, अल्का महाजन, अँड सुरेखा दळवी, कै. विलासराव साळुंखे, जवाहर गांधी, विजय बोराडे, द्वारकादास लोहिया, डॉ. आनंद केनी, डॉ. स्तुगन दंठ, विलास आणि प्रकाश आमटे, डॉ. अभय बंग व डॉ. राणी बंग, मोहन हिराबाई हिरालाल, विष्णू प्रभुदेसाई, जी. जी. पारीख, भाऊ नारकर, शांता वारकर, राजन इंदुरकर, आमदार विवेक पंडित अशी कित्येक नावे सांगता येतील.

## ३.४ सारांश

स्वातंत्र्यपूर्व काळात ग्रामीण विकासाचे जे विविध प्रयोग मांडण्यात आले. त्यापैकी बहुतांश प्रयोग चांगले यशस्वी झाले. कारण या प्रयोगामध्ये स्वत:च्या मनाने वाहून घेतलेले कार्यकर्ते प्रामाणिक प्रमुख मंडळी. विशिष्ट तत्त्वांची बांधिलकी हा या मागचा महत्त्वाचा भाग होता.

स्वातंत्र्योत्तर काळात यातील काही प्रकल्प शासनामार्फत संयोजित करण्यास सुरूवात झाल्यानंतर सदर प्रकल्प शासनाच्या अधिकारी वर्गाच्या हातात आहे. अधिकारी वर्गाने या प्रकल्पांचा मूळ साचाच बदलला. त्यामुळे एकंदर मूळ प्रकारचा वेगळे काही स्वातंत्र्यपूर्व काळातील ग्रामीण विकासाच्या प्रकल्पाचे अस्तित्व बदलले.

वरिष्ठ प्रकल्पांचा बराचसा सकारात्मक अनुभव स्वातंत्र्योत्तर ग्रामीण विकासाची दिशा निश्चित करण्यासाठी उपयोगी ठरत. यातून पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळात सामुदायिक विकास कार्यक्रमाची मुहूर्तमेढ रोवली गेली. ग्रामीण विकासाची प्रक्रिया पुढे होण्याचा प्रयत्न करण्यात आला.

## ३.५ स्वाध्याय

१) स्वयंसेवी संस्थांचा उगम कसा झाला ते स्पष्ट करा.

२) भारतातील स्वयंसेवी संस्थांचा विकास कसा होत गेला ते स्पष्ट करा.

३) स्वयंसेवी संस्थांचा उगम आणि विकास महाराष्ट्राच्या संदर्भात लिहा.

## ३.६ अधिक माहितीकरता

१) नंदा पांगुळ - बारहाते - समुदाय संघटन.

२) प्राजक्ता टाकसाळे - एकात्मिक समाजकार्य.

❖❖❖❖

# ४

# स्वयंसेवी संस्थांची ग्रामीण विकासातील भूमिका आणि महत्त्व

**घटक रचना :**


४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ स्वयंसेवी संस्थांची संकल्पना

४.३ ग्रामीण विकासाची संकल्पना

४.४ स्वयंसेवी संस्थांची ग्रामीण विकासातील भूमिका

४.५ स्वयंसेवी संस्थांचे ग्रामीण विकासातील महत्त्व

४.६ सारांश

४.७ प्रश्नसंच

४.८ अधिक माहितीकरता


## ४.० उद्दिष्टे

स्वयंसेवी संस्थांची ग्रामीण विकासातील भूमिका आणि महत्त्वाच्या प्रकरणाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१) स्वयंसेवी संस्थेची आणि ग्रामीण विकासाची संकल्पना समजून घेणे.

२) स्वयंसेवी संस्थांच्या विविध कार्यक्षेत्राची माहिती करून घेणे.

३) महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांत कार्यरत असणार्या स्वयंसेवी संस्थांच्या कार्याचा आढावा घेणे.

४) स्वयंसेवी संस्थेच्या ग्रामीण विकासाबाबतच्या भूमिकेबाबत माहिती मिळविणे.

५) स्वयंसेवी संस्थांचे ग्रामीण विकासातील महत्त्व समजून घेणे.

## ४.१ प्रस्तावना

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाच्या विकासाची जबाबदारी शासन व्यवस्थेवर येऊन पडली. मात्र शासन व्यवस्थेला हवे तसे यश प्राप्त होईना. यातूनच पुढे विकासाची जबाबदारी

स्वयंसेवी संस्थांनी स्वीकारलेली दिसून येते. शासनाबरोबर स्वयंसेवी संस्थांदेखील मोठ्या प्रमाणावर विकास प्रक्रियेत सहभागी आहेत.

पूर्वी गरिब आणि गरजू, अपंग व कमकुवत घटकांची काळजी संयुक्त कुटुंबात घेतली जायची. पुढे काळाप्रमाणे कुटुंबाचे विभाजन होत गेले आणि विभक्त कुटुंबपद्धत अस्तित्वात आली. या प्रक्रियेत गरजूंची काळजी घेणे कठीण होऊ लागले. औद्योगिकीकरण, शहरीकरण, यामुळे एकूणच सामाजिक सुरक्षा व्यवस्थेचेही स्वरूप बदलत गेले. व्यक्ती, कुटुंब आणी गट या एकूण वातावरणातच अकार्यक्षमता आणि अस्थिरता निर्माण झाली अशा अनेक प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी कल्याणकारी संस्थांची स्थापना करणे समाजाची गरज होऊन बसली. यातूनच या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी शास्त्रीय दृष्टिकोनाची गरज पुढे आली आणि शास्त्रीय कार्यपद्धती आधार असलेल्या स्वयंसेवी संस्थां या अस्तित्वात आल्या.

अलीकडच्या काही वर्षात महाराष्ट्रात आणि भारततही विविध क्षेत्रांत विशिष्ट उद्दिष्टांसाठी स्वयंसेवी संस्थांची संख्या लक्षणीयरीत्या वाढत चालली आहे. या संस्थांमध्ये विविध समस्यांबाबत उदा. स्त्रियांच्या समस्या, अंधश्रद्धा निर्मुलन, निरक्षरता, मानवी हक्क, आरोग्य इ. क्षेत्रांत कार्यरत असणार्या संस्थांचा समावेश होतो. ग्रामीण भागांच्या विकासाच्या संदर्भात काही त्रुटी दिसतात त्या भरून आवश्यक जनमत तयार करणे, वातावरण तयार करणे आणि लोकजागृती करणे स्वयंसेवी संस्थांना शक्य आहे.

भारतातील स्वयंसेवी संस्थांचा विचार करताना स्वयंसेवी संस्थांची पूर्वीची भूमिका आणि आजची भूमिका यात फार मोठे बदल झाले आहेत. संस्थांच्या कार्यक्षेत्रात आणि कार्यपद्धतीत अनेक बदल घडून आले आहेत. ग्रामीण भागातील अनेक समस्या दूर करायला स्वयंसेवी संस्थांचा मोठ्या प्रमाणावर हातभार लागत आहे. स्वयंसेवी संस्थांचे ग्रामीण विकासाच्या दृष्टीने असलेले महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे.

यामुळे प्रस्तुत प्रकरणामध्ये स्वयंसेवी संस्थांचे कार्यक्षेत्र, ग्रामीण विकासाबाबत स्वयंसेवी संस्थेची भूमिका आणि ग्रामीण विकासातील स्वयंसेवी संस्थांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे.

## ४.२ स्वयंसेवी संस्थांची संकल्पना

'स्वयंसेवी संस्थां' ही संकल्पना 'स्वयंस्फूर्त कार्य आणि कार्यकर्ता' यांच्याशी निगडित आहे. स्वयंसेवी संस्थां या 'बिगर शासकीय संस्थां' (Non Governmental Organisation) म्हणून ओळखल्या जातात.

'स्वयंसेवी संस्थांना' 'समुदाय विकास संस्थां' - (Community Development Organisation) तसेच बिगर पक्षीय कृतिशील गट (Non Political Party Formation) असेही म्हणतात.

सर्वसामान्यपणे सेवाभावी किंवा स्वयंसेवी संस्थां म्हणजे दु:खी किंवा असहाय्य लोकांना संरक्षण करण्याच्या उद्देशाने, लोकांच्या पुढाकाराने काम करणारी व लोकांच्याच नियंत्रणाखाली असलेली संस्थां होय. स्वयंसेवी संस्थांच्या व्याख्या अनेक अभ्यासकांनी आणि विचारवंतांनी केल्या आहेत.

१) **प्रा. स. ह. देशपांडे :** 'सर्वसामान्य जनतेचे विशेषत: अतिगरिबी, गरजू आणि मागासलेल्या वर्गाचे निकडीचे प्रश्न हातात घेऊन ते सोडविण्याचा प्रयत्न करणार्या शासकीय किंवा निमशासकीय क्षेत्राबाहेरच्या, नफा हेतू नसलेल्या म्हणजेच समाजसेवा हा प्रधानहेतू असलेल्या आणि बाह्य नियमावलीच्या अधीन नसलेल्या संस्थां म्हणजे स्वयंसेवी संस्थां होय."

२) **लॉर्ड बेव्हरीज :** 'ज्या संघटनेमध्ये कामगार स्वावलंबी तत्त्वाने काम करतात ते मोबदला, वेतन किंवा मानधन घेतील अथवा न घेतील हे त्यांच्या इच्छेवर अवलंबून असते अशी संघटना स्वत:च्या सभासदांनी स्थापन केलेली व तिच्यावर बाहेरील कुणाचेही नियंत्रण नसते, अशा संघटनेला 'स्वयंसेवी संस्थां' म्हणतात."

३) "A Non Governmentalm Organisation (NGO) is a citizen based association that aperates independantly of government, uselly to deliver resources or serve some social or political purpose. ."

उपरोक्त व्याख्यांचा विचार करता लक्षात येते की, स्वयंसेवी संस्थां या स्वायत्त आहेत. त्या स्वत:चा निर्णय स्वत: घेऊ शकतात. स्वत:च्या कार्यपद्धतीने कार्य करू शकतात. म्हणून त्यांच्या विकासाला चालना मिळाली आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) स्वयंसेवी संस्थांच्या व्याख्या सांगा.

## ४.३ ग्रामीण विकासाची संकल्पना

'भारत' हा खेड्यांचा देश आहे. भारतामध्ये आजही ६ लाखांपेक्षा अधिक खेडी आहेत म्हणूनच आजही भारताचे वर्णन खेडेप्रधान ग्रामप्रधान देश म्हणून करावे लागते. भारताची अर्थव्यवस्था आजही ग्रामीण अर्थव्यवस्थांची आहे. म्हणूनच भारताच्या विकासाचे प्रतिबिंब ग्रामीण विकासात बघावयास मिळते.

'ग्रामीण विकास' या व्याख्येत 'ग्रामीण' आणि 'विकास' या दोन संकल्पना समाविष्ट आहेत. ग्रामीण विकासाच्या अनेक विचारवंतांनी आणि अभ्यासकांनी व्याख्या केल्या आहेत. ग्रामीण विकासाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) **श्री. रॉबर्ट मॅकनामारा :** 'ग्रामीण भागातील दुर्बल घटक म्हणजे छोटे शेतकरी, भूमिहीन शेतमजूर आणि ग्रामीण कारागीर यांच्या विकासावर भर देऊन ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करणे म्हणजे ग्रामीण विकास होय."

२) **डॉ. स्वामिनाथन :** 'ग्रामीण भागातील दुर्बल घटकांना सक्षम करण्याची प्रक्रिया म्हणजे ग्रामीण विकास होय."

याचाच अर्थ ग्रामीण विकास ही ग्रामीण भागातील दुर्बल घटकांचा विकास करण्याची प्रक्रिया होय.

## ४.४ स्वयंसेवी संस्थांची ग्रामीण विकासातील भूमिका

भारताच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक विकासात ग्रामीण भागाच्या विकासाला विशेष महत्त्व आहे. ग्रामीण भागातील दारिद्र्य, बेरोजगारी, प्राथमिक शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी, वाहतुकीच्या सोयी, रस्ते, वीज, यांसारख्या मूलभूत सोयी प्राप्त करून देण्यासाठी शासनाला अनेक योजनांच्या माध्यमातून प्रयत्न करावे लागतात. ग्रामविकासाच्या या कार्यात शासनाला मदत करणार्या सेवाभावी यंत्रणेची आवश्यकता आहे.

सेवाभावी दृष्टीने आणि सामाजिक बांधिलकीच्या दृष्टिकोनातून कार्य करणार्या सेवाभावी किंवा स्वयंसेवी संस्थां शासनाला मदत करत असतात. यासाठी शिक्षणाविषयीची जागृती, अंधश्रद्धा निर्मुलन, कुटुंब नियोजन, प्रौढ शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, वृद्धांची काळजी, पर्यावरण रक्षण, कायदेविषयक साक्षरता, ग्रामस्वच्छता यांसारख्या अनेक क्षेत्रांत स्वयंसेवी संस्थांचे संपूर्ण देशात शासनाला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मदत करण्याचे विशाल जाळे निर्माण झाले आहे.

भारतातील स्वयंसेवी संस्थां या स्वायत्त असून त्या शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागातील असहाय्य, दु:खी, निराधार, गरिब लोकांना स्वावलंबी बनविण्यासाठी या संस्थां नेहमीच तयार असतात. भारतात स्वातंत्र्यपूर्ण काळात रामकृष्ण मिशन, ख्रिश्चन मिशनरी, यासारख्या अनेक संस्थांचे सामाजिक कार्याचे योगदान आपल्याला विसरता न येण्यासारखे आहे. प्रबोधन आणि जाणीव जागृतीच्या कार्यात ग्रामीण भागातील लोकांची मनोवृत्ती बदलण्यासाठी, अनिष्ट रूढी, परंपरा, अस्पृश्यता, जातीयता नष्ट करण्यासाठी स्वयंसेवी संस्थां शासनाच्या पाठीमागे भक्कमपणे उभ्या राहताना दिसत आहेत.

स्वयंसेवी संस्थांची ग्रामीण विकासाबाबत असलेली भूमिका पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

**१) ऐच्छिक कृती :** ऐच्छिक कृती स्वीकारणारा पहिला दृष्टिकोन असे मानतो, की शासनाची विकासाची कृती केवळ बर्या स्थितीत असलेल्या लोकांचीच परिस्थिती सुधारू शकते. मात्र तळागाळातील गोरगरिबांच्या कल्याणासाठी कार्यक्रम राबविले गेले. त्यांच्या दु:खात आणि पिळवणुकीत भरच पडली. अर्थात असे शासकीय कार्यक्रम मुळात जनतेच्या विषयी असलेल्या सद्भावनेतूनच आखले जातात. परंतु प्रत्यक्षात विकासाचा भरीव पाया मात्र घातला जात नाही. अशा वेळी विकासाच्या संधीपासून वंचित राहिलेला गोरगरिबांना मदत करण्यात शासकीय यंत्रणेला अपयश आल्याने लोकांची ऐच्छिक कृती अशासकीय संघटनाद्वारे केल्या जातात. विकसनशील देशातील अनेक समस्यांवर ऐच्छिक कृती हे बिनतोड उत्तर असल्याचे मतप्रवाह हा युक्तिवाद मानतो. म्हणून ऐच्छिक कृती हा विकासाचा पर्यायी दृष्टिकोन समजला जातो. अलीकडे अशासकीय संघटनांचे महत्त्व राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर वाढत आहे.

विकासाची आव्हाने स्वीकारण्यात अशासकीय संघटनांकडून अपेक्षा वाढत आहेत. भारतामध्ये आजही मोठ्या प्रमाणावर दारिद्र्य, बेकारी, आर्थिक आणि सामाजिक विषमता अस्तित्वात आहे. या सर्व आव्हानांवर मात करून समाजाचे सामाजिक आणि आर्थिक स्थित्यंतर घडवून आणण्यात स्वयंसेवी संस्थां फार मोठी भूमिका बजावत आहेत.

**२) शासकीय यंत्रणेस पूरक :** ऐच्छिक कृतीच्या बाबतीतील दुसरा दृष्टिकोन अशासकीय स्वयंसेवी संस्थांना दुय्यम भूमिका देणारा आहे. या दृष्टिकोनावर शासकीय कामांना डावलून अशासकीय संस्थां मागासलेल्या समाजाचे सामाजिक आणि आर्थिक स्थित्यंतर घडवू शकणार नाही. काही अंशी हा दृष्टिकोन व्यवहार्य आणि बरोबर आहे. अशासकीय संघटना फार तर शासकीय यंत्रणेला पूरक म्हणून कार्ये करू शकतील, असा या दृष्टिकोनाचा अर्थ आहे.

सरकारची आर्थिक मदत आणि विकास कामांना सरकारची तांत्रिक आणि प्रशासकीय मान्यता असल्याशिवाय अशासकीय संघटना काही करू शकत नाही. ग्रामीण भागातील समस्या या अनेक प्रकारच्या, गंभीर, आणि गुंतागुंतीच्या स्वरूपाच्या असून त्यांची व्याप्ती मोठी असते. समस्यांची व्याप्ती मोठी असल्या कारणाने शासकीय पाठिंब्याशिवाय अशासकीय संघटनांचे कार्य अपूर्णच राहते.

**३) स्पर्धा व पूरकता :** ऐच्छिक कृतीच्या विकासातील सहभागाविषयी तिसरा आणि शेवटचा दृष्टिकोन असा की, विकासप्रक्रियेत सेवाभावी संस्थां आणि शासकीय संस्थां, यंत्रणा यांनी एकाच वेळी परस्पर स्पर्धक आणि परस्पर पूरक म्हणून कार्य केले पाहिजे. शासनाकडे वित्तीय आणि प्रशासकीय सामर्थ्य असते. विकास प्रक्रियेतून शासकीय यंत्रणा वेगळीच जाऊ शकत नाही. अशासकीय संघटनांकडे लोकांशी संवाद साधून त्यांचा विश्वास संपादन करण्याची आणि त्यांचा विकासप्रक्रियेत सहभाग मिळवण्याची अफाट क्षमता असते. अशासकीय संघटनांची ही क्षमता ओळखून सरकारने विकासप्रक्रियेत अशासकीय सेवाभावी संघटनांना अधिकाधिक सहभागी करून घ्यावे असा या दृष्टिकोनाचा मतप्रवाह आहे. स्पर्धक या अर्थाने की एखादा प्रकल्प पूर्ण करण्याचा कालावधी व खर्चात काटकसर या निकषावर ऐच्छिक आणि शासकीय यापैकी कोणती कृती अधिक कार्यक्षम ठरते. याबाबत स्पर्धेचे वातावरण असते.

**४) मध्यस्थांची भूमिका :** विकास आणि सामाजिक कृतीकरता संप्रेषण कौशल्य महत्त्वाचे असते. स्वयंसेवी संस्थां स्थानिक लोक ते अधिकारी, प्रतिनिधी वा संवादाच्या विभिन्न पातळयांवर मध्यस्थींची (Mediatory) भूमिका बजावते.

**५) सल्लागारात्मक भूमिका :** समर्थनाचे दस्तऐवजीकरण, माहिती प्रसार आणि तज्ज्ञता फार महत्त्वाची असते. तेव्हा सल्लागारात्मक भूमिका प्रमुख ठरते. अशा वेळी स्थानिक पातळीवरील तज्ज्ञ / व्यावसायिक / मार्गदर्शक व्यक्ती महत्त्वाची भूमिका बजावतात.

**६) पायाभूत सुविधांचा विकास आणि कार्यचलन :** स्वयंसेवी संस्थां जमीन प्राप्त, विभाजित आणि विकसित करू शकतात. गृहनिर्माण करू शकतात, पायाभूत सुविधा पुरवू शकतात. त्याचबरोबर विहिरी, सार्वजनिक शौचालये बांधणे, घनकचरा गोळा करणे, इ. बाबतीत कार्यचलन (Operate) करू शकतात.

**७) संशोधन, पर्यवेक्षण आणि मूल्यमापन :** अनेक स्वयंसेवी संस्थां महत्त्वाच्या सामाजिक प्रश्नांवर संशोधन, योजना व प्रकल्पाच्या पर्यवेक्षण आणि मूल्यमापन या विविध टप्प्यांवर कार्यरत असलेल्या दिसतात.

स्वयंसेवी संस्थां या प्रामुख्याने दोन भूमिका बजावतात.

१) स्वयंसेवी संस्थां आपल्या परिक्षेत्रात येणार्या राज्यसंस्थेच्या कृतींना पूरक ठरेल अशी कार्य पार पाडतात.

२) राज्यसंस्थेच्या अनुपस्थितीमुळे किंवा तिची भूमिका दुर्लक्षित राहिली असेल, अशा संदर्भातील कार्ये स्वयंसेवी संस्थां पार पाडतात.

१९९३ साली ऑस्ट्रियातील व्हिएन्ना येथे 'मानवी हक्कांवर जागतिक परिषद' पार पाडली. या परिषदेचा उद्देश म्हणजे मानवी हक्कांच्या क्षेत्रात केलेल्या प्रगतीचा आढावा घेणे आणि मूल्यमापन करणे होय. या परिषदेच्या घोषणापत्रातील ठराव क्र. ३८ नुसार मानवी हक्कांवरील जागतिक परिषदेने सर्व प्रकारच्या मानवी हक्क आणि मानवतावादाच्या संवर्धनातील बिगर शासकीय संस्थांच्या भूमिकेचे महत्त्व अधोरेखित केले आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) स्वयंसेवी संस्थांची भूमिका विशद करा.

## ४.५ स्वयंसेवी संस्थांचे ग्रामीण विकासातील महत्त्व

दिवसेंदिवस स्वयंसेवी संस्थांचे महत्त्व मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेमध्ये लोकांना फार मोठ्या प्रमाणावर विकासाच्या प्रवाहामध्ये सामावून घेण्यासाठी जागरुकतेने हालचाली कराव्या लागतात. ग्रामीण, शहरी तसेच निमशहरी भागातील अनेक प्रकारच्या समस्या दूर करण्यासाठी सरकार अकार्यक्षम ठरत आहे. सरकारच्या कार्यक्रमातील त्रुटी दूर करण्यासाठी अनेक स्वयंसेवी संस्थां सरकारचे विस्तारक घटक म्हणून कार्यरत आहेत.

स्वयंसेवी संस्थांच्या कार्याचे महत्त्व पुढील मुद्यांवरून स्पष्ट होते.

१) **ग्रामीण विकास :** विकसनशील देशात ग्रामीण विकास जलद होण्याची आवश्यकता असते. शासनामार्फत ग्रामीण भागाचा विकास घडवून आणण्यासाठी अनेक महत्त्वाकांक्षी योजना आणि प्रकल्प राबविले जातात. परंतु शासनाच्या कर्मचार्यांची कामाविषयी असलेली अनास्था आणि सामान्य लोकांमध्ये असलेला माहितीचा अभाव या कारणास्तव अनेक चांगल्या योजना या निष्फळ ठरतात. आज अनेक स्वयंसेवी संस्थां ग्रामीण भागात सक्रियपणे कार्य करत आहेत. स्वयंसेवी संस्थां या तळागाळात (grass root level) कार्यरत असल्यामुळे ते लोकांना कामामध्ये सहभागी करून अनेक प्रकारचे कार्यक्रम व योजना यशस्वीरीत्या पार पाडतात. योजनेचे व कार्यक्रमाचे लोकांच्या दृष्टीने असलेले महत्त्व लोकांना पटवून देण्यात स्वयंसेवी संस्थां यशस्वी होत असल्यामुळे अनेक जण स्वावलंबीपणे आणि स्वेच्छेने विकास कार्यात सहभागी होत आहेत व ग्रामीण विकासाला चालना मिळत आहे.

२) **विकास प्रक्रियेत लोक सहभाग :** स्वयंसेवी कार्यामुळे लोकांचा सहभाग मिळविण्यास मदत होते. जगातील विकसित राष्ट्रांचा विकास जलदगतीने होण्याकरता स्वयंसेवी संघटनांचे योगदान हे अत्यंत महत्त्वाचे आहे. विकसनशील राष्ट्रांना देखील स्वयंसेवी

क्रिया करण्याची गरज आहे. लोकांना विकास प्रक्रियेमध्ये सामावून घेण्यासाठी, त्यांची अंधश्रद्धा दूर करण्यासाठी, विकास कार्यक्रमांची अंमलबजावणी तळागाळात करण्यासाठी शासनयंत्रणा अपुरी पडत आहे. या सर्व कारणांसाठी स्वयंसेवी संस्थां आवश्यक आहेत. स्वयंसेवी संस्थांवर जर लोकांचा सहभाग मिळविण्यासाठी जबाबदारी टाकली तर भारतासारख्या विकसनशील देशाचा विकास जलद गतीने होण्यास मदत होईल.



https://loksatta.com

३) **कल्याणकारी राज्याच्या स्थापनेत सहकार्य :** भारताने 'कल्याणकारी राज्य' या संकल्पनेचा स्वीकार केला आहे. कल्याणकारी राज्य या कल्पनेत राज्याचे कार्यक्षेत्र वाढत आहे. परंतु राज्य सर्व लोकांचे कल्याण करण्यासाठी कमी पडत आहे. अलीकडच्या काळात कल्याणकारी राज्याच्या जबाबदाऱ्या मोठ्या प्रमाणावर वाढत आहेत. या सर्व जबाबदार्या कल्याणकारी राज्याला पार पाडता येत नाहीत. कल्याणकारी राज्याची संकल्पना राबविण्यासाठी शासनाला स्वयंसेवी संस्थांचा भक्कम आधार मिळत आहे. शिक्षण, आरोग्य, अंधश्रद्धा निर्मुलन, स्वयंरोजगार, कुटुंबनियोजन, इ. कार्य स्वयंसेवी संस्थां जबाबदारीने पार पाडत आहेत. कुशल नेतृत्व, काम करण्याची अभिनव पद्धत, उत्तम तंत्रे, प्रभावी जनसंपर्क या सर्व बाबींमुळे स्वयंसेवी संस्थां शासनाच्या अनुपस्थितीत प्रभावीपणे काम करत आहेत.

स्वयंसेवी संस्थांना शासनाकडून केवळ अनुदानाचीच अपेक्षा असते. स्वयंसेवी संस्थां या 'समांतरित स्वरूपाचे' आणि 'विस्तारित' स्वरूपाचे अशा दोन प्रकारचे कार्य करून शासनाला कल्याणकारी राज्याच्या स्थापनेत सहकार्य करत असते.

४) **ग्रामीण आणि शहरी भागातील विकासाचे अंतर कमी करण्यासाठी :** भारतामधील ग्रामीण भागाचा आणि शहरी भागाचा विचार करता असे लक्षात येते की ग्रामीण आणि शहरी या दोन्ही भागांतील विकासांमध्ये मोठ्या प्रमाणावर तफावत दर्शनास येते 'शहरे' ही शिक्षण, आरोग्य, संरचनात्मक सोयी सुविधा यांसारख्या अनेक सोयी सुविधांनी संपन्न आहेत तर ग्रामीण भाग म्हणजेच 'खेडी' आजदेखील शिक्षण, आरोग्य, शुद्ध पिण्याचे पाणी यांसारख्या मूलभूत सोयीसुविधांपासून वंचित असल्याचे चित्र आपणांस पाहावयास मिळते. परिणामत: 'दुर्बल खेडी' आणि 'सबळ शहरे' अशा विभाजित स्वरूपाचा विकास दिसतो. ग्रामीण भागातील शिक्षण, आरोग्य, रस्ते, यांसारख्या मूलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी अनेक स्वयंसेवी संस्थां उत्स्फूर्तपणे पुढाकार घेत आहेत. ग्रामीण भागातील अनेक प्रकारच्या समस्यांवर मात करून ग्रामीण भागाचा व ग्रामीण भागातील दुर्बल घटकांचा विकास करण्यासाठी स्वयंसेवी संस्थां या सहाय्यभूत

ठरत आहेत. अशा प्रकारे ग्रामीण आणि शहरी भागातील विकासाचे अंतर कमी करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य स्वयंसेवी संस्थां करतात.

५) **लोकशाहीची जोपासना :** लोकांना नैतिक मूल्ये, राष्ट्रीय अस्मिता, राष्ट्रीयत्व शिकवण्याची योग्य जबाबदारी स्वयंसेवी संस्थां पार पाडू शकते. स्वयंसेवी संस्थांचा मूळ हेतू राष्ट्रीय हित जोपासण्याचा असतो. स्वयंसेवी संस्थांमुळे लोकशाहीच्या हिताची जोपासना करता येते. स्वयंसेवी संस्थांमुळे खर्या अर्थाने देशातील लोकशाही टिकवता येते. राष्ट्रीय एकात्मता पाठवण्याचा, देशातील विषमता नष्ट करण्याचा प्रयत्न स्वयंसेवी संस्थांकडून केला जातो. अशा प्रकारे देशातील लोकशाही जोपासण्यासाठी स्वयंसेवी संस्थांचे कार्य महत्त्वपूर्ण ठरते.

६) **कार्याची नवीन क्षितिजे :** स्वयंसेवी संस्थांच्या कार्याचा व्याप जसाजसा वाढत जातो. तसतशा लोकांच्या तक्रारी कमी होत जातात. स्वयंसेवी संस्थांच्या कामामुळे शासनावरील कामाचा ताण बर्यापैकी कमी होतो. स्वयंसेवी संस्थांचे कार्य जनतेच्या हितासाठीच असल्यामुळे अनेक बुद्धिवंत व विचारवंत स्वयंसेवी संस्थेच्या कार्याकडे वळतात. स्वयंसेवी संस्थांच्या कार्यामुळे स्वयंसेवी संस्थां जनतेचा मोठ्या प्रमाणावर विश्वास संपादन करतात. त्याचा उपयोग या संस्थांच्या वाढत्या कार्यासाठी होऊ शकतो. त्यासाठी अनेक विचारवंत संशोधन करून कार्याची नवीन नवीन क्षितिजे शोधतात.

७) **सामाजिक परिवर्तन :** सामाजिक, आर्थिक, राजकीय परिवर्तनाच्या दृष्टीने विचार करता आजची परिस्थिती ही फार निराशाजनक आहे. समाजातील अनेक जण सामाजिक प्रगतीविषयी उदासीन आहेत. आर्थिक, सामाजिक व राजकीय परिवर्तनाच्या दृष्टीने शासन आणि राजकीय पक्ष ठोस पावले नजीकच्या काळात उचलतील असे दिसत नाही. अनेक स्वयंसेवी संस्थां या समाजातील उपेक्षित व अन्यायग्रस्त लोकांच्या हक्कांसाठी लढत आहेत. स्वयंसेवी संस्थांच्या या प्रयत्नातून सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेला गती मिळत आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) स्वयंसेवी संस्थांचे महत्त्व सांगा.

## ४.६ सारांश

स्वयंस्फूर्तीने कार्य करणार्या स्वयंसेवी संस्थां या आज समाजसुधारणेचे महत्त्वपूर्ण कार्य करत आहेत. वेगवेगळया विषयांच्या माध्यमातून ग्रामीण भागात आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आरोग्यात्मक, पर्यावरण संरक्षण यांसारख्या बाबींमध्ये स्वयंसेवी संस्थां महत्त्वपूर्ण कार्य पार पाडत आहेत.

## ४.८ प्रश्नसंच

१) स्वयंसेवी संस्थांची संकल्पना सांगून ग्रामीण विकासातील भूमिका सांगा.

२) ग्रामीण विकासाची संकल्पना सांगून स्वयंसेवी संस्थांचे ग्रामीण विकासातील महत्त्व सांगा.

## ४.९ अधिक माहितीकरता

१) मानवी हक्क, तुकाराम जाधव, महेश शिरापूरकर, युनिक प्रकाशन

२) व्यावसायिक समाजकार्य, प्रा. प्राजक्ता टाकसाळे, के सागर प्रकाशन

❖❖❖❖

# ५

# स्वयंसेवी संस्थांच्या व्यवस्थापनाची तत्वे

**घटक रचना :**

५.० उद्दिष्टे

५.१ प्रस्तावना

५.२ व्यवस्थापनाचा अर्थ व व्याख्या

५.३ व्यवस्थापनाचे स्वरूप

५.४ व्यवस्थापनाची वैशिष्ट्ये

५.५ व्यवस्थापनाचे महत्त्व

५.६ सारांश

५.७ प्रश्नसंच

५.८ संदर्भसूची

## ५.० उद्दिष्टे

प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण स्वयंसेवी क्षेत्र व्यवस्थापनातील तत्त्वे आणि व्यवहार या बद्दल अभ्यास करणार आहोत. या अभ्यासाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

- व्यवस्थापन म्हणजे काय व त्याची व्याख्या समजून घेणार आहोत.
- व्यवस्थापनाचे स्वरूप, वैशिष्ट्ये व महत्त्व या बदल अभ्यास करणार आहोत.
- हेन्री फेयॉलची व्यवस्थापनातील तत्त्वे कोणती याचाही अभ्यास करणार आहोत.

## ५.१ प्रस्तावना

स्वयंसेवी क्षेत्राचा विचार करता ह्या क्षेत्राचा विस्तार आज विकसित राष्ट्रापासून ते अविकसित राष्ट्रापर्यंत म्हणजेच जगाच्या कानाकोपर्यात आला आहे. भारतातसुद्धा स्वयंसेवी क्षेत्र विकासाला मोठ्या प्रमाणात चालना मिळालेली दिसून येते. किंबहुना शासनाच्या अनेक कार्यामध्ये शासनाला पूरक किंवा शासनाची एजन्सी म्हणून अनेक स्वयंसेवी संस्थां कार्यरत आहेत. या स्वयंसेवी क्षेत्राच्या विकासासाठी मागील मुख्य कारण म्हणजे त्यांचे स्वतंत्र व्यवस्थापन होय.

एखादे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अनेक व्यक्तींचे प्रयत्न किंवा श्रम याच्यात एकसूत्रता आणू. त्यासाठी व्यवस्थापनाची आवश्यकता असते. यामध्ये उद्दिष्टे निश्चित केली जातात. त्याचे पृथक्करण केले जाते. व्यक्तीच्या कौशल्याचा व बुद्धीचा वापर केला जातो. त्याचप्रमाणे उपलब्ध असणाऱ्या इतर साधनसामग्रीचा योग्य विनियोग केला जातो. व्यवस्थापत पद्धतीचा उपयोग प्रत्येक व्यक्ती, संस्थां व व्यवहार इ. मध्ये केला जातो. उदा. शाळा, कारखाने, बँका, सहकारी संस्थां, स्वयंसेवी संस्थां इ. क्षेत्रांत व्यवस्थापनाचा वापर केला जातो. व्यवस्थापनाच्या पद्धती, व्यक्ती किंवा संस्थां यानुसार बदलत असतात. परंतु यामध्ये महत्त्वाच्या दोन गोष्टी केल्या जातात. पहिली म्हणजे, व्यवस्थापन संस्थेची उद्दिष्टे निश्चित करणे. ही उद्दिष्टे वेगवेगळया समस्यांच्या नेमक्या व संक्षिप्त विधानाद्वारे व्यक्त केली जातात व दुसरी म्हणजे, उद्दिष्टे साध्य करण्यासाठी येणाऱ्या अडचणी व मर्यादा याबाबतचे मार्गदर्शन व्यवस्थापन केले जाते.

संस्थेने ठरवून दिलेल्या धोरणाच्या अनुषंगाने कार्यक्रमाची रचना व नियोजन त्या अनुरुप संघटना बांधणी, कार्याची विभागणी करून संघटनेच्या वेगवेगळया पातळयांवर कार्य होत असताना त्यामध्ये समन्वय आणि सहकार कार्य योग्य दिशेने चालवण्यासाठी मार्गदर्शन आणि नियंत्रण व कार्यसिद्धी हे व्यवस्थापनाचे कार्य आहे.

स्वयंसेवी क्षेत्र व्यवस्थापनामध्ये धोरणनिश्चिती, निर्णयक्रिया, नियोजन, समन्वय, संरचना नियंत्रण देखरेख आणि लोकसंपर्क ही व्यवस्थापनाची तत्त्वे आहेत. कोणत्याही संस्थेचे व्यवस्थापन हे ती संस्थां किती कार्यक्षमतेने कार्य पार पाडते यावर ते चांगले का वाईट हे ठरविता येते.

## ५.२ व्यवस्थापनाचा अर्थ व व्याख्या

व्यवस्थापन म्हणजे संस्थेची पूर्वनियोजित उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टीचे नियोजन व संघटन करणे, मार्गदर्शन करणे, समस्या सोडविण्यासाठी आवश्यक असणारी मदत करणे व संस्थेंतर्गत विविध घटकांमध्ये एकसूत्रता, एकसंधता निर्माण करणे.

व्यवस्थापन हे एक कार्य आहे. व्यवस्थापन ही एक स्वतंत्र ज्ञानशाखा आहे. परंतु विशिष्ट व्यक्ती किंवा व्यक्तींचा समूह म्हणजे व्यवस्थापन असे नाही. तर यामध्ये एकूण व्यवस्थापन पद्धतीचा विचार केलेला असतो. ज्या व्यक्ती व्यवस्थापकाचे काम करतात त्यांना व्यवस्थापक किंवा प्रशासक असे संबोधले जाते. इतर व्यक्तींच्या सहकार्याने काम करून घेणे म्हणजेच व्यवस्थापन.

म्हणजेच संस्थेच्या अस्तित्वाशिवाय व्यवस्थापनाचे अस्तित्व असूच शकत नाही. एखाद्या व्यक्तीची व्यवस्थापक म्हणून नियुक्ती करताना केवळ त्या व्यक्तीच्या कार्यातील निपुणता विचार घेऊन चालत नाही तर त्या व्यक्तीची इतरांकडून काम करून घेण्याची क्षमता विचारात घ्यावी लागते. व्यवस्थापनात व्यक्तीप्रमाणेच कल्पनाही तितक्याच महत्त्वाच्या असतात. नवीन कल्पनांच्या साहाय्यानेच उद्दिष्टपूर्ती करणे व्यवस्थापकास शक्य होते.

**५.२.१ व्याख्या :**

- **हेन्री फेयॉल -** अंदाज नियोजन, संघटन, समन्वय व नियंत्रण ही सर्व कार्ये म्हणजेच संघटन होय. या व्याख्येतून व्यवस्थापनाची कार्य स्पष्ट होतात.

- **जे. एल्. लँडी -** यांच्या मतानुसार व्यवसाय संघटनेचे विशिष्ट हेतू अगर उद्दिष्टे साध्य करण्यासाठी संघटनेतील व्यक्तीसमूहाकडून काम करून घेणे. एकंदर, मनुष्यबळाचे संयोजन व संघटन करणे, काम करणाऱ्यांस प्रेरणा देणे व कामावर नियंत्रण ठेवणे म्हणजे व्यवस्थापन होय.

- **मिलवर्ड -** व्यवस्थापन ही एक अशी प्रक्रिया व माध्यम आहे की, ज्या मार्फत व्यवसाय संघटनेने ठरविलेल्या धोरणांची अंमलबजावणी करण्यासाठी नियोजन केले जाते आणि धोरणाची अंमलबजावणी होत असताना त्यावर देखरेख व नियंत्रण ठेवले जाते.

वरील सर्व व्याख्यांचा एकत्रित विचार केल्यास व्यवस्थापन म्हणजे विशिष्ट हेतू किंवा उद्दिष्टे साध्य करण्यासाठी नियोजन करणे आणि धोरणाच्या अंमलबजावणीबरोबर देखरेख व नियंत्रण ठेवणे होय.

**आपली प्रगती तपासा :**

१) व्यवस्थापनाची व्याख्या व अर्थ स्पष्ट करा.

## ५.३ व्यवस्थापनाचे स्वरूप

**१) व्यवस्थापन हे एक आर्थिक साधन आहे :**

स्वयंसेवी संस्थांमध्ये उपलब्ध साधनांचा पर्याप्त वापर करणे गरजेचे असते. उपलब्ध साधनाचा समन्वय साधून त्यावर प्रभावी नियंत्रण ठेवणे हे व्यवस्थापनाचे कर्तव्य आहे. संस्थेची उद्दिष्टे पार पाडण्यासाठी या आर्थिक साधनांचा पर्याप्त उपयोग करणे आवश्यक असते.

**२) व्यवस्थापन ही अधिकार पद्धती असते :**

व्यवस्थापनाला आपले कार्य करण्यासाठी आवश्यक ते अधिकार असले पाहिजेत. नियोजन, संघटन, निर्देशन, निर्णय घेणे, समन्वय व नियंत्रण या बाबत आवश्यक ते अधिकार सोपविले जातात. या अधिकारामुळे व्यवस्थापनाला संस्थेचे व्यवस्थापन करता येते म्हणूनच व्यवस्थापन ही एक अधिकार पद्धती आहे. या अधिकार पद्धतीमध्ये हुकूमत व नियंत्रण यांची अधिसत्ता अंतर्भूत असते.

**३) व्यवस्थापन ही एक सामूहिक क्रिया आहे :**

व्यवस्थापनात इतरांकडून कार्य करून घेण्याचे कौशल्य अभिप्रेत असते. व्यवसायातील कार्याच्या बिनचूक व कार्यक्षम अंमलबजावणीसाठी पात्र लोकांची नियुक्ती करणे आणि त्यांच्याकडून कार्य करून घेणे यात व्यवस्थापनाचे कर्तव्य आहे. कारण कर्मचारी वर्ग हा

घटक सजीव क्रियाशील असतो. श्रम आणि साधने यात हाच मूलभूत फरक आहे. कर्मचाऱ्यांकडून सहकार्य व कृतिशील प्रतिसाद मिळविणे आवश्यक असते. त्याशिवाय संस्थेला लाभदायक स्थिती येणार नाही. पुढाकार घेऊन विविध क्रियांचे संघटन करणे आणि संबंधित क्रियांमध्ये सातत्य कायम राखणे महत्त्वाचे असते. इतरांकडून कौशल्याने कार्ये करून घेतले तर ते शक्य होते. व्यवस्थापकाने कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नांना शिस्त व योग्य दिशा लावली पाहिजे.

**आपली प्रगती तपासा :**

१) व्यवस्थापनाचे स्वरूप विशद करा.

## ५.४ व्यवस्थापनाची वैशिष्ट्ये

**१) व्यवस्थापन ही एक प्रक्रिया आहे :**

व्यवस्थापन ह्या प्रक्रियेत नियोजन, संघटन, समन्वय, अभिप्रेरण, नियंत्रण, इ. अनेक प्रक्रियांचा समावेश होतो. संस्थांचालक, नोकरवर्ग इ. या प्रक्रियेचे घटक असतात. या प्रक्रियेचे प्रमुख कार्य म्हणजे साधनसामग्रीचा पर्याप्त उपयोग समाजासाठी करणे, असा अर्थ लागतो. संस्थेच्या कार्याला आवश्यक असणाऱ्या साधनसामग्रीचा पर्याप्त वापर करण्याचे कार्य व्यवस्थापन प्रक्रियेद्वारे चालते.

**२) व्यवस्थापन हे चांगल्या कामाचे फळ आहे :**

व्यवस्थापन करणे हे चांगल्या कामाचे फळ आहे. व्यवस्थापन हे नेहमी काही तरी साध्य करण्याच्या मागे असते. व्यवस्थापनाला ठराविक उद्दिष्टे पार पाडायची असतात. उदा. विविध प्रकल्प राबविणे, विविध कार्यक्रम करणे इ. उद्दिष्टे गाठण्याचे काम व्यवस्थापन करीत असते.

**३) व्यवस्थापन म्हणजे इतरांकडून कार्य करून घेणे :**

व्यवस्थापकाला आपल्या संस्थेची कार्ये पार पाडण्यासाठी, आपल्या हाताखालील कर्मचाऱ्यांकडून कार्ये करून घ्यावयाची असतात. ही कार्ये करून घेत असताना त्याला आपल्या सहकाऱ्यांना सल्ला देणे, मार्गदर्शन करणे, अभिप्रेरित करणे, सहकार्य करणे व कार्ये करावी लागतात. थोडक्यात व्यवस्थापकाला आपल्या सहकाऱ्यांकडून कुशलतेने कार्ये करून घ्यावी लागतात.

**४) व्यवस्थापन हे एक सामूहिक कार्ये आहे :**

व्यवस्थापन ही एक सामुदायिक क्रिया आहे. कोणत्याही संस्थेची उद्दिष्टे सामूहिक प्रयत्नांनी लवकर साध्य होतात. व्यक्तीगत प्रयत्नांना व्यवस्थापन म्हणता येणार नाही. व्यवस्थापनाचा संबंध सामूहिक प्रयत्नांशी येतो. संस्थेचा उद्देश सफल व्हावा म्हणून संस्थेचे कर्मचारी समूहाने प्रयत्न करतात त्याला व्यवस्थापन म्हणता येईल.

### ५) व्यवस्थापन हे अदृश्य स्वरूपाचे असते :

व्यवस्थापन ही न दिसणारी अदृश्य शक्ती होय. व्यवस्थापन हे एक शासनाप्रमाणे असते. आपण प्रत्यक्ष व्यवस्थापन पाहू शकत नाही. परंतु व्यवस्थापनाचे चांगले-वाईट परिणाम पाहू शकतो. म्हणजेच कर्मचाऱ्यांचा उत्साह, त्यांची कार्यक्षमता व यश अधिक मिळाले असेल, तर त्या संस्थेचे व्यवस्थापन चांगले आहे असे आपणास म्हणता येईल.

### ६) व्यवस्थापनाला पर्याय नाही :

व्यवस्थापनाची कार्ये करण्यासाठी संगणकाचा वापर मोठ्या प्रमाणावर होऊ लागला आहे. त्यामुळे व्यवस्थापकाच्या काम करण्याच्या क्षमतेमध्ये भर घातली आहे. जरी असे असले तरी व्यवस्थापन प्रक्रियेला पर्याय नाही. व्यवस्थापक हा त्या संस्थेमध्ये आवश्यक असतो.

### ७) व्यवस्थापन ही एक कला आहे :

व्यवस्थापन ही कला आहे, कारण व्यवस्थापकीय कौशल्य ही व्यक्तिगत बाब आहे. वास्तविक व्यवस्थापन हे एक शास्त्र आहे. तथापि शास्त्रांचा अवलंब करते वेळी त्यात वैयक्तिक कौशल्यामुळे फरक पडतो. म्हणून व्यवस्थापन ही एक कला आहे. व्यवस्थापनाला अनेक निर्णय घ्यावे लागतात. त्यासाठी त्याच्याकडे चांगले कौशल्य असणे आवश्यक आहे त्याला अनेक प्रश्न, समस्या सोडवाव्या लागतात. त्या सोडविण्याची कला व्यवस्थापकांच्या अंगी असते.

### ८) व्यवस्थापन हे एक शास्त्र आहे :

व्यवस्थापन करत असताना व्यवस्थापक त्याच्या ज्ञानाचा वापर करतो. व्यवस्थापनामध्ये तत्त्वाचा समावेश होतो. व्यवस्थापनाच्या ज्ञानामध्ये तर्कसंगत सातत्य आढळते. व्यवस्थापनासंबधी काही सिद्धांत तत्त्वे आहेत. शास्त्रीय प्रयोगाच्या कसोटीवर तपासणी व विश्लेषण करून व्यवस्थापनाचे ज्ञान संपादन केलेले असते. या सर्व कारणांमुळे व्यवस्थापन शास्त्र आहे.

### ९) व्यवस्थापन हा एक व्यवसाय किंवा पेशा आहे :

व्यवस्थापकास चौफेर ज्ञानाची गरज असल्याने त्यास काही शैक्षणिक, व्यावसायिक व प्रशिक्षणात्मक शिक्षण घ्यावे लागते म्हणून व्यवस्थापन हा एक पेशा आहे.

### १०) व्यवस्थापन सर्वव्यापी प्रक्रिया आहे :

व्यवस्थापन मानवी प्रश्नाची सोडवणूक करते की ज्यामुळे व्यवसाय उद्दिष्टे साध्य होतात. व्यवस्थापक प्रत्येक क्षेत्रासाठी आवश्यक असते. उदा. शैक्षणिक संस्थां, धार्मिक संस्थां, सहकारी संस्थां इ. म्हणून व्यवस्थापन सर्वव्यापी प्रक्रिया आहे.

### ११) व्यवस्थापन हे गतिमान आहे :

व्यवस्थापन ही एक गतिमान क्रिया आहे. व्यवस्थापन ही सत्ता विकसित होणारी एक गतिमान क्रिया होय. व्यवस्थापनाची व्याप्ती स्वरूप, तत्त्वे, सिद्धांत यामध्ये काळानुसार

अनेक परिवर्तने झालेली दिसून येतात. व्यवस्थापनाचे परंपरागत स्वरूप आज पूर्णत: बदललेले आहे. भविष्यातसुद्धा ही परिवर्तनाची क्रिया अशीच सुरू राहणार आहे.

**१२) व्यवस्थापन अनेक तत्त्वांचा अवलंब करते :**

व्यवस्थापन करीत असताना व्यवस्थापानाच्या तत्त्वांच्या अवलंब करावा लागतो. उदा. (हेन्री) फेयॉलने सांगितलेली चौदा तत्त्वे कार्यविभाजन, अधिकार व जबाबदारी, शिस्त, आदेशातील एकवाक्यता, निर्देशनातील एकवाक्यता इ. तत्त्वांचा अवलंब करावा लागतो. म्हणून व्यवस्थापनामध्ये अनेक तत्त्वांचा समावेश होतो.

**१३) व्यवस्थापन सर्व स्तरावर असते :**

व्यवस्थापनाचा अवलंब हा सर्व स्तरांवर केला जातो. उदा. उच्च व्यवस्थापन (Top Managment), मध्यम व्यवस्थापन (Middle Level Management) आणि कनिष्ठ व्यवस्थापन (Lower Level Management) या सर्व स्तरांसाठी व्यवस्थापकांना व्यवस्थापन करावे लागते. यामध्ये उच्च व्यवस्थापनावर व्यवस्थापकाला अधिक महत्त्वाची कामे करावी लागतात. कनिष्ठ व्यवस्थापनावर रोजची असणारी कामे करावी लागतात.

**१४) व्यवस्थापन सतत चालणारी प्रक्रिया आहे :**

व्यवस्थापन ही सतत चालणारी अशी प्रक्रिया आहे. व्यवस्थापनाला आपली कार्ये अखंडपणे करावी लागतात. व्यवस्थापन थांबल्यास व्यवसायातील सर्वच क्रिया थांबतात. म्हणून व्यवस्थापनाला आपले काम सतत सुरू ठेवावे लागते.

**१५) व्यवस्थापन सामाजिक प्रक्रिया आहे :**

व्यवस्थापनाचा संबंध मानवाशी येतो. उद्योग संस्थेतील ध्येय पूर्ण करण्यासाठी कामगारांमध्ये समन्वय साधणे, त्यांना मार्गदर्शन करणे, प्रोत्साहन देणे, त्यांच्या समस्या सोडविणे, त्याच्यावर देखरेख व नियंत्रण करणे म्हणजे व्यवस्थापन, म्हणजेच व्यक्तीविकास होय.

**आपली प्रगती तपासा :**

१) व्यवस्थापनाच्या विविध वैशिष्ट्यांची चर्चा करा.

## ५.५ व्यवस्थापनाचे महत्त्व

आधुनिकीकरणामध्ये व्यवस्थापनाच्या महत्त्वात सतत वाढ होत आहे. जागतिक परिस्थितीमध्ये व्यवसाय संस्थांना आपल्या अस्तित्वासाठी व भविष्यासाठी झगडावे लागत आहे. या सर्व परिस्थितीमुळे व्यवस्थापनाला कधी नव्हे, इतके महत्त्व प्राप्त झाले आहे. अशा व्यवस्थापनाचे महत्त्व खालीलप्रमाणे आहे.

**१) साधनसामुग्रीचा महत्तम उपयोग :**

व्यवसायातील उपलब्ध साधनांचा योग्य व महत्तम उपयोग करणे हे कार्यक्षम व्यवस्थापनावर अवलंबून असते. कोणत्याही व्यवसायासाठी अनेक साधनसामुग्रीची जोडणी करावी लागते. त्याचबरोबर त्या साधनांचा काटकसरीने व योग्य उपयोग करणे आवश्यक असते. नियोजन, नियंत्रण व निर्देशक करून साधनांचा महत्तम उपयोग करण्यासाठी व्यवस्थापन प्रयत्नशील असते.

**२) स्पर्धाशक्ती वाढते :**

व्यवस्थापनामुळे संघटनेची स्पर्धाशक्ती वाढते. आधुनिक काळात लोकांच्या गरजा लक्षात घेऊन अनेक उत्पादने घेतली जातात. त्यामुळे बाजारपेठेत तीव्र स्पर्धा निर्माण झालेली दिसते. या स्पर्धेला तोंड देण्यासाठी व्यवस्थापन महत्त्वाची भूमिका बजावते.

**३) कार्यक्षमता वाढते :**

व्यवस्थापन चांगल्या प्रकारे केल्यामुळे व्यवसायाची कार्यक्षमता वाढते. व्यवस्थापनामुळे साधनसामग्रीचा पर्याप्त वापर केला जातो. त्यामुळे कमीत कमी उत्पादन खर्चात सेवा मिळते. साहजिकच सर्व व्यवसायाची कार्यक्षमता व्यवसायामुळे वाढते.

**४) कर्मचाऱ्यांना प्रेरणा मिळते :**

संस्थेतील कर्मचाऱ्यांना प्रेरणा देणे हे व्यवस्थापनाचे मुख्य कार्य आहे. कर्मचाऱ्यांना प्रेरणा दोन प्रकारे दिली जाते. आर्थिक प्रेरणा आणि आर्थिकेतर प्रेरणा. कर्मचाऱ्यांना या दोन्ही माध्यमांतून नेहमी समाधानी ठेवण्याचे काम व्यवस्थापन करते.

**५) पुढाकारासाठी उत्तेजन मिळते :**

यशस्वी व्यवस्थापक आपल्या कर्मचाऱ्यांना पुढाकार देत असतो. त्यामुळे सांघिक भावना वाढते. वैयक्तिक कौशल्यात भर पडते त्यामुळे संघटना कार्यक्षम बनते.

**६) सांघिक भावना वाढीस लागते :**

व्यवस्थापक आपल्या कर्मचाऱ्यांना आपुलकीच्या भावनेने कार्य करण्यास भाग पाडतो. याचबरोबर सर्वांना सहकार्याच्या भावनेने कार्ये करण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. ही सांघिक भावना व्यवस्थापनामुळे विकसित होते.

**७) नवीन बदल करणे शक्य :**

आधुनिक व्यवस्थापन हे गतिशील आहे. यामध्ये सातत्याने नवीन समस्येनुसार नवीन बदल हे अपेक्षित असतात. नवीन व्यवस्थापकीय कल्पनेतून अशा समस्या सोडविण्यासाठी नवीन बदल स्वीकारले जातात. त्यातून संस्थेला अधिक फायदे होतात.

**८) तंत्रज्ञानातील प्रगती :**

आधुनिक जगात नवनवीन शोध व तांत्रिक बदल होत असतात. या नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग व्यवस्थापनाकडून चांगल्या प्रकारे होतो. त्यासाठीचे व्यवस्थापन व्यवस्थापकच करू शकतो.

**९) वाढ आणि विस्तार करणे शक्य :**

कार्यक्षम व्यवस्थापनामुळे संस्थेची वाढ आणि विस्तार करता येते. संस्थां विकसित करण्यासाठी व्यवस्थापक प्रयत्नशील असतो. तो आपल्या कर्मचारी वर्गाला प्रोत्साहित करून संस्थेबद्दल त्यांच्यामध्ये आपुलकी निर्माण करतो. यातूनच संस्थेची वाढ आणि विस्तार होतो.

**१०) कामगारांच्या जीवनमानाचा दर्जा सुधारतो :**

आधुनिक काळात व्यवस्थापकाला आर्थिक प्रगतीचा आधार असे संबोधले जाते. व्यवस्थापन कार्यक्षमतेवर कामगारांचे जीवनमान अवलंबून असते. कार्यक्षम व्यवस्थापनामुळे उत्पादन कार्यास चालना मिळते. आवश्यक व चैनीच्या वस्तूचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन करता येते. असंख्य लोकांना रोजगार उपलब्ध करून देता येतो.

**११) समाजाची मदत मिळते :**

व्यवसायाचे कार्यक्षम व्यवस्थापन करणे ही व्यवस्थापनाची सामाजिक जबाबदारी समजली जाते. या सामाजिक जबाबदारीबरोबर भागधारकांचे हित जपणे. कर्मचाऱ्यांना योग्य मंजुरी वस्तूंची किंमत किफायतशीर ठेवणे इ. गोष्टींचा समावेश होतो. साहजिकच त्यामुळे व्यवस्थापनदेखील एक प्रकारची समाजाची मदत मिळण्यास साध्य होते.

**आपली प्रगती तपासा :**

१) स्वयंसेवी संस्थांच्या कार्यात व्यवस्थापनाची महत्त्वाची चर्चा करा.

## ५.६ सारांश

स्वयंसेवी क्षेत्राच्या वाढीमागील व विकासामागील प्रमुख कारण म्हणजे स्वयंसेवी संस्थांचे व्यवस्थापन होय. स्वयंसेवी संस्थांना आपली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अनेकांच्या प्रयत्नांची व मदतीची आवश्यकता असते. या प्रयत्नांना सुंसघटित स्वरूप देण्यासाठी व्यवस्थापनाची आवश्यकता असते. संस्थेने ठरवून दिलेल्या कार्यक्रमांच्या अनुषंगाने रचना, नियोजन, कार्याची विभागणी, भांडवल उभारणी, यांसारख्या संघटनेच्या विविध पातळयांवर कार्य होत असताना त्यामध्ये समन्वय, सहकार, कार्य योग्य दिशेने चालण्यासाठी मार्गदर्शन करणे व नियंत्रण ठेवणे हे व्यवस्थापनाचे प्रमुख कार्य असते.

संस्थेच्या कार्याचा बरेवाईटपणा संस्थेच्या व्यवस्थापनावर अवलंबून असतो.

## ५.७ प्रश्नसंच

१. व्यवस्थापनाची संकल्पना स्पष्ट करून व्यवस्थापनाची वैशिष्ट्ये विशद करा.

२. व्यवस्थापनाचा अर्थ व व्याख्या सांगून व्यवस्थापनाचे स्वरूप स्पष्ट करा.

३. व्यवस्थापनाच्या महत्त्वावर टिपण लिहा.

४. स्वयंसेवी संस्थांच्या कार्यात व्यवस्थापनाच्या महत्त्वावर चर्चा करा.

## ५.८ संदर्भसूची

१. व्यवस्थापनाची तत्त्वे आणि कार्य

लेखिका : १) प्रा. रुपाली शेठ, २) प्रा. विदुला कुलकर्णी, ३) प्रा.नेहापुराणिक, ४) प्रा. अस्मिता कुलकर्णी

प्रकाशन : डायमंड प्रकाशन

२. व्यवस्थापन संकल्पना (Management Concept)

लेखक : डॉ. एम. के. गावडे

प्रकाशन : अथर्व पब्लिकेशन

❖❖❖❖

# ६

# स्वयंसेवी संस्थांचे उपक्रम

**घटक रचना :**

६.० उद्दिष्टे

६.१ प्रास्ताविक

६.२ आरोग्यविषयक कार्यक्रम

६.३ शैक्षणिक कार्यक्रम

६.४ जलव्यवस्थापन कार्य

६.५ व्यसनमुक्ती कार्यक्रम

६.६ रोजगार निर्मिती कार्यक्रम

६.७ स्वयंसेवी संस्थांसमोरील समस्या

६.८ सेवाभावी संस्थांच्या समस्यांवरील उपाय

६.९ सारांश

६.१० स्वाध्याय

६.११ संदर्भ सूची

## ६.० उद्दिष्टे

प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण स्वयंसेवी संस्थांचे कार्यक्रम आणि त्यांच्या प्रमुख समस्यांचा अभ्यास करणार आहोत. या प्रकरणाच्या अभ्यासाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

- स्वयंसेवी संस्थांचे प्रमुख कार्यक्रम समजून घेणे.
- स्वयंसेवी संस्थांच्या समस्या विशद करणे.
- स्वयंसेवी संस्थांच्या समस्येवरील उपाय जाणणे.

## ६.१ प्रस्तावना

भारताच्या आा|थक, सामाजिक विकासात ग्रामीण भागाच्या विकासाला विशेष महत्त्व आहे. ग्रामीण भागातील दारिद्र्य, बेरोजगारी, प्राथमिक शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी,

वाहतुकीच्या सोयी, रस्ते, वीज यांसारख्या मूलभूत सुविधा प्राप्त करून देण्यासाठी शासनाला अनेक योजनांच्या माध्यमातून प्रयत्न करावे लागतात. ग्रामविकासाच्या कार्यात शासनाला मदत करणाऱ्या सेवाभावी यंत्रणेची आवश्यकता आहे. सेवाभावी दृष्टीने आणि सामाजिक बांधिलकीच्या दृष्टिकोनातून कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्थां शासनाला मदत करीत असतात. यासाठी शिक्षणाविषयीची जागृती, अंधश्रद्धा निर्मुलन, कुटुंब नियोजन, प्रौढ शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, वृद्धांची काळजी, पर्यावरण रक्षण, कायदेविषयक साक्षरता, ग्राम स्वच्छता यांसारख्या अनेक क्षेत्रांत सेवाभावी संस्थांचे संपूर्ण देशात शासनाला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मदत करण्याचे विशाल जाळे निर्माण झाले आहे.

भारतातील सेवाभावी संस्थां या स्वायत्त संस्थां असून त्या शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागातील सहाय्य, निराधार आणि विशेषतः गरिब लोकांना स्वावलंबी बनविण्यासाठी या संस्थां नेहमीच तत्पर असतात. भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात रामकृष्ण मिशन, ख्रिश्चन मिशनरी यांसारख्या अनेक संस्थांचे सामाजिक कार्याचे योगदान आपणास विसरता येणार नाही. प्रबोधन आणि जाणीव जागृतीच्या कार्यात भारतातील ग्रामीण भागातील लोकांची पारंपरिक मनोवृत्ती बदलण्यासाठी अनिष्ट रूढी, परंपरा, अस्पृश्यता, जातीयता नष्ट करण्यासाठी सेवाभावी संस्थां शासनाच्या पाठीमागे भक्कमपणे उभ्या राहताना दिसून येतात.

स्वयंसेवी संस्थांचे कार्यक्रम ग्रामीण समाजाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी महत्त्वाचे असल्यामुळे विविध विभागांत वेगवेगळया स्वरूपाचे कार्यक्रम स्वयंसेवी संस्थांमार्फत राबवले जात आहेत.

महत्त्वाचे कार्यक्रम पुढील प्रमाणेसांगता येतील.

## ६.२ आरोग्यविषयक कार्यक्रम

ग्रामीण भागात रूढी, परंपरा, अंधश्रद्धा आणि अनिष्ट चालीरीती यामुळे आरोग्याची समस्या फार बिकट आहे. निरक्षरता व आर्थिक दुर्बलता यामुळे आरोग्याच्या समस्या वेळीच सोडवल्या जात नाहीत म्हणून अशा समस्या सोडवण्यासाठी स्वयंसेवी संस्थां आरोग्यविषयक कार्यक्रम हाती घेते ते पुढीलप्रमाणे :

### ६.२.१ कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रम :

ग्रामीण समाजात कुष्ठरोगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन फार वेगळा आहे. कुष्ठरोगाला महारोग म्हणूनही ओळखला जातो. पूर्वी एखाद्याच्या घरी कुष्ठरोगी आढळला तर त्या घरावर बहिष्कार टाकला जात असे. त्या भीतीपोटी आपल्या घरामध्ये कुष्ठरोगी आहे हे सांगत नव्हते. कुष्ठरोगाबाबत अनेक गैरसमज आहेत म्हणून कुष्ठरोगाची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे.

या रोगाचे निर्मुलन करण्यासाठी महाराष्ट्रातील अनेक स्वयंसेवी संस्थां कार्य करीत आहेत. पनवेल येथे असणारी बाबा आमटेंच्या आनंदवनापासून प्रेरणा घेऊन स्थापन झालेली कुष्ठरोग निवारण समिती शांतीवन हे त्याचे मूर्तिमंत उदाहरण देता येईल. या संस्थेच्या

माध्यमातून अनेक कुष्ठरोग्यांना पूर्णपणे बरे करण्यात आले व त्या लोकांच्या पुनर्वसनाचे कार्य देखील पार पाडले.

### ६.२.२ क्षयरोग निर्मूलन कार्यक्रम :

आपल्या देशात काही स्वयंसेवी संस्थां एका विशिष्ट उद्देशाने स्थापन झालेल्या आहेत. अशा संस्थांमध्ये क्षयरोग निर्मूलनाचे कार्य करणाऱ्या संस्थां अनेक आहेत. क्षयरोगावरील उपचार प्रक्रिया दीर्घकालीन असल्यामुळे क्षयरोग झालेल्या रुग्णांना मोफत आरोग्य सुविधा स्वयंसेवी संस्थांमार्फत पुरविल्या जात आहेत.

### ६.२.३ एड्सविषयक कार्यक्रम :

स्वातंत्र्योत्तर काळात एड्स ही आरोग्याची नवीन समस्या निर्माण झाली आहे. शासकीय स्तरांवर जनजागृतीचे कार्यक्रम घेतले जात आहेत. आज स्वयंसेवी संस्थां शहरी आणि ग्रामीण भागात अनेक माध्यमांतून जनजागृतीचे कार्यक्रम राबवीत आहेत. काही स्वयंसेवी संस्थां एड्सग्रस्त रुग्णांसाठी आरोग्य सुविधा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करताना दिसत आहेत.

### ६.२.४ कुटुंब कल्याण कार्यक्रम :

कुटुंब कल्याण कार्यक्रमामध्ये पाळणा लांबविण्यासाठी व थांबविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सुविधा पुरवण्याचे कार्य यामध्ये गर्भनिरोधक गोळयांचा पुरवठा करणे, मोफत शस्त्रक्रिया करणे तसेच लहान कुटुंबाचे महत्त्व लोकांना पटवून सांगणे अशा प्रकारे लोकसंख्या वाढीची समस्या लक्षात घेऊन लोकसंख्या नियंत्रणासाठी व सामाजिक जनजागृतीसाठी स्वयंसेवी संस्थांनी कुटुंब कल्याण कार्यक्रमावर भर दिला आहे.

### ६.२.५ नेत्रचिकित्सा व मोतीबिंदू शस्त्रक्रिया :

ग्रामीण भागातील गरिब आणि गरजूंसाठी नेत्रचिकित्सा म्हणजेच डोळयांची तपासणी करून देणे आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया मोफत करणे कार्यक्रमाला काही स्वयंसेवी संस्थेने आर्थिक महत्त्व दिले आहे. याचे मूर्तिमंत उदाहरण आपण पनवेल तालुक्यातील तारा या गावातील युसुफ सेंटर या स्वयंसेवी संस्थेचे घेऊ शकतो. या स्वयंसेवी संस्थेने नेत्रचिकित्सा व मोतीबिंदू शस्त्रक्रिया संदर्भात एवढे कार्य केले की लोक सध्या तारा या गावाला डोळयांच्या ऑपरेशनचे गाव म्हणून ओळखू लागले. काही स्वयंसेवी संस्थेमध्ये या सुविधा अतिशय अल्पदरात उपलब्ध करून दिल्या जात आहेत. म्हणून नेत्रचिकित्सा व मोतीबिंदू शस्त्रक्रिया हे एक स्वयंसेवी संस्थेचे महत्त्वाचे कार्य आहे.

### ६.२.६ इतर आरोग्यविषयक कार्यक्रम :

दैनंदिन जीवनात भेडसावणाऱ्या आरोग्याच्या समस्या सोडविण्यासाठी आरोग्य सुविधांचा पुरवठा स्वयंसेवी संस्थां करीत आहेत. मोफत आरोग्य तपासणी करणे, औषध पुरवठा करणे, किरकोळ स्वरूपाचे आजार आणि त्यावरील उपचार यासाठी आरोग्य केंद्र चालवणे असे इतर आरोग्याचे कार्यक्रम स्वयंसेवी संस्थां राबवीत आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) स्वयंसेवी संस्थांच्या आरोग्यविषयक कार्यक्रमांचा आढावा घ्या.

## ६.३ शैक्षणिक कार्यक्रम

ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी व गरिब गरजूंना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी अनेक स्वयंसेवी संस्थां शैक्षणिक कार्यक्रमाची अंमलबजावणी करीत आहेत. औपचारिक शिक्षणाबरोबरच जीवनमूल्याचे शिक्षण देणे. मूलभूत शिक्षण देणे किंवा शिक्षणाला व्यावसायिक जोड देणे या दृष्टीने शैक्षणिक कार्यक्रमाची अंमलबजावणी केली जात आहे.

### ६.३.१ आदिवासी आश्रमशाळा चालविणे :

आदिवासी समाजाला शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी अतिदुर्गम भागांत अनेक स्वयंसेवी संस्थां आश्रमशाळा चालवीत आहेत. काही आश्रमशाळा शासनाच्या अनुदानावर चालवल्या जातात. तर काही आश्रमशाळा स्वयंसेवी संस्थां स्वेच्छेने व स्वखर्चाने चालवीत आहेत.

### ६.३.२ शैक्षणिक सुविधा निर्माण करणे :

महाराष्ट्रातील अनेक स्वयंसेवी संस्थांनी दुर्बल घटकांना किंवा बहुजन समाजाला शिक्षण देण्यासाठी शैक्षणिक संस्थां सुरू केल्या आहेत. या संस्थांमध्ये मोफत शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. त्याचबरोबर दुर्गम भागात अंगणवाड्या चालविणे, रात्रीचे वर्ग चालविणे, शिष्यवृत्ती देणे, शैक्षणिक साहित्याचा पुरवठा करणे इत्यादी शिक्षणविषयक कार्यक्रम राबवले जात आहेत.

## ६.४ जलव्यवस्थापन कार्य

संस्थांचे जलव्यवस्थापन हे एक महत्त्वाचे कार्य आहे. जलसंपत्तीचे संरक्षण करणे, जलसाक्षरता करणे आणि पाण्याचे साठे निर्माण करणे यासाठी कड्या व पट्ट्या स्वरूपाचे बंधारे बांधण्याचे काम स्वयंसेवी संस्थां करीत आहे. लोक सहभागातून पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम स्वयंसेवी संस्थांमार्फत राबविले जात आहेत. काही स्वयंसेवी संस्थां जलव्यवस्थापनाच्या उद्देशाने स्थापन केलेले आहेत. म्हणून जलव्यवस्थापन हा एक महत्त्वाचा कार्यक्रम स्वयंसेवी संस्थांचा आहे.

## ६.५ व्यसनमुक्ती कार्यक्रम

ग्रामीण भागात व विशेषतः दुर्गम भागांत व्यसनाधीनता अधिक प्रमाणात आढळून येते या व्यसनाधीनतेमुळे ग्रामीण भागात दारिद्र्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असताना आपणास दिसत आहे. आदिवासी विभागात तर याचे प्रमाण अधिक आहे. म्हणून व्यसनमुक्ती कार्यक्रमाची अंमलबजावणी करून व्यसनाधीन कुटुंबाचे पुनर्वसन करणे, वेगवेगळया व्यसनांपासून त्यांना दूर करणे तसेच व्यसनांपासून दूर राहण्यासाठी जनजागृती करणे अशा स्वरूपाच्या कार्यक्रमांची अंमलबजावणी स्वयंसेवी संस्थां करताना दिसत आहेत.

## ६.६ रोजगार निर्मिती कार्यक्रम

बेरोजगारी ही एक मोठी समस्या बनत असल्यामुळे शासनामार्फत रोजगार निर्मितीच्या कार्यक्रमांची आखणी व अंमलबजावणी केली जात आहे. ज्या उद्देशाने रोजगार निर्मितीचे कार्यक्रम शासनाने सुरू केले आहेत. ते उद्देश साध्य करण्यासाठी ग्रामीण भागात अधिक रोजगार निर्मिती करण्यासाठी प्रत्यक्ष कार्यक्रमांची अंमलबजावणी स्वयंसेवी संस्थां करीत आहेत.

## ६.७ स्वयंसेवी संस्थांसमोरील समस्या

**प्रस्तावना :**

स्वयंसेवी संस्थां सामाजिक परिवर्तनासाठी वेगवेगळया स्वरूपाची कार्य अविरतपणे करत आहेत या कार्याची विभागणी कल्याणकारी कार्य विकासात्मक कार्य व प्रबोधनात्मक कार्य या गटांमध्ये केली जाते. तशा विविध स्वरूपाचे कार्य करत असताना वेगवेगळया बाबींना किंवा समस्यांना स्वयंसेवी संस्थां तोंड देत असतात. त्यांच्या कार्याला अनुकूल असे वातावरण किंवा परिस्थिती नसल्यामुळे अनेक समस्यामधून स्वयंसेवी संस्थां वाटचाल करीत आहेत. यामधील महत्त्वाच्या समस्या किंवा प्रमुख बाबी पुढीलप्रमाणे.

### ६.७.१ असंघटित क्षेत्र :

स्वयंसेवी संस्थां ग्रामीण भागांत व शहरी भागांत विखुरलेल्या आहेत. प्रत्येक संस्थेचे कार्यक्षेत्र व उद्दिष्टे भिन्न भिन्न स्वरूपाचे आहेत. मात्र बहुतांशी स्वयंसेवी संस्थांना भेडसावणाऱ्या समस्या सर्वसाधारण समान आहेत. या समस्या सोडविण्यासाठी स्वयंसेवी संस्थांचे स्थानिक पातळीवर किंवा प्रादेशिक स्तरावर संघत्न असणे आवश्यक आहे. मात्र तशा प्रकारच्या संघटना स्वयंसेवी संस्थांना दिसून येत नाही. त्यामुळे या संस्थांच्या विकासाला पोषक वातावरण निर्माण होत नाही.

### ६.७.२ अपुरा निधी :

स्वयंसेवी संस्था समाज परिवर्तनाचे कार्य करण्यासाठी आवश्यक असणारा निधी वेगवेगळया मार्गाने मिळवीत आहेत. काही स्वयंसेवी संस्थां विशिष्ट कार्यासाठी शासनाकडून अनुदान घेतात. मात्र संस्थेचा संपूर्ण कारभार चालविण्यासाठी ठरलेली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी देणगी रूपाने मिळणारा निधी व शासकीय अनुदान अपुरा असल्यामुळे आपल्या कार्याची व्याप्ती वाढविता येत नाही. निधी उभारण्यासाठी अनेक कार्यकर्त्यांना अधिक वेळ द्यावा लागतो. भांडवलाच्या कमतरतेमुळे आर्थिक समस्या स्वयंसेवी संस्थांमध्ये असलेल्या दिसून येतात.

### ६.७.३ राजकीय नेत्यांचे वर्चस्व :

भारतामध्ये ग्रामीण भागांतील वेगवेगळया स्वयंसेवी संस्थांमध्ये राजकीय नेत्यांचे वर्चस्व आहे. स्वार्थी स्वयंसेवी संस्थांमध्ये राजकीय नेत्यांनी स्थान मिळवलेले असते. स्वयंसेवी संस्थांना थोडे आर्थिक साहाय्य करून आपले वर्चस्व निर्माण केलेले असते त्याचबरोबर

राजकीय पक्षाचा फायदा घेऊन किंवा सत्तेचा फायदा घेऊन चुकीच्या मार्गाने शासकीय निधी व सवलती मिळविल्या जातात मात्र अशा संस्थां विशिष्ट नेत्यांच्या दबावाखाली कार्य करत असतात. सामाजिक कार्य करत असताना समाजामध्ये दुजाभाव व्यक्त केला जातो. अशा संस्थां खर्या अर्थाने लोकहिताच्या न राहता राजकीय नेत्यांची मर्जी सांभाळण्याचे काम करत असतात. त्यामुळे गरिब व गरजू घटकांपर्यंत अशा संस्थांचे उपक्रम पोहोचत नाही.

### ६.७.४ शासकीय अधिकाऱ्यांचा हस्तक्षेप :

स्वयंसेवी संस्थां आणि शासकीय यंत्रणा यांच्यामध्ये सलोख्याचे संबंध असलेले दिसून येत नाहीत. शासकीय यंत्रणेमध्ये असलेल्या त्रुटी स्वयंसेवी संस्थांमधील कार्यकर्ते समाजासमोर आणत असतात. तसेच शासकीय योजना प्रत्यक्ष लाभार्थीपर्यंत पोहचविण्यासाठी शासकीय अधिकाऱ्यांवर दबाव आणत असतात. यासंबंधी शासकीय अधिकारी स्वयंसेवी संस्थांच्या कार्यकर्त्यांवर रोष ठेवतात आणि त्याचा राग अप्रत्यक्षरीत्या काढण्याचा प्रयत्न केला जातो अशा प्रकारे शासकीय अधिकारी व स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते यांच्यामध्ये सलोख्याचे संबंध नसल्यामुळे राजकीय नेत्यांचा आधार घेऊन शासकीय अधिकाऱ्यांमध्ये हस्तक्षेप करून कार्यकर्त्यांना त्रास देतात, कार्यकर्त्यांची छळवणूक करतात. कार्य करण्यास नाउमेद करतात अशी प्रवृत्ती शासकीय अधिकाऱ्यांमध्ये आढळून येते.

### ६.७.५ प्रशिक्षित कार्यकर्त्यांचा अभाव :

स्वयंसेवी संस्थांमध्ये कार्य करणारे कार्यकर्ते स्वेच्छेने तयार झालेले असतात. यामध्ये फार थोडे कार्यकर्ते बेरोजगारामुळे स्वयंसेवी संस्थांमध्ये कार्य करीत असतात. अशा कार्यकर्त्यांमध्ये कार्य करण्याचे कोणतेही अनुभव किंवा विशेष प्रशिक्षण घेतलेले नसते. सुरुवातीला या कार्यकर्त्यांमध्ये जनतेबद्दल आपुलकी किंवा आत्मीयता नसते अशा कार्यकर्त्यांकडून जनतेचा सहभाग मिळविण्यासाठी विशेष प्रयत्न होत नाही. काही कार्यकर्ते सामाजिक प्रतिष्ठा मिळविण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना जोडलेले असतात. या कार्यकर्त्यांना कोणतेही अनुभव नसल्यामुळे योग्यरीत्या सामाजिक कार्य केले जात नाही.

### ६.७.६ कार्यपद्धतीतील दोष :

अनेक स्वयंसेवी संस्थांची उद्दिष्टे स्पष्ट नसतात. त्यांच्या कार्यात पूर्वनियोजन नसते किंबहुना संयोजन कौशल्याचा अभाव असतो. संस्थेचे कार्यकारी मंडळ आणि कार्यकर्ते यांच्यामध्ये समन्वयाचा अभाव असतो किंवा मालक व नोकर यांसारखे संबंध निर्माण झालेले असतात. काही संस्थांमध्ये घराणेशाहीचे वर्चस्व असते अशा प्रकारे कार्यपद्धतीत दोष असल्यामुळे विशिष्ट व्यक्तीकडून संस्थेचे सर्व निर्णय घेतले जातात. निर्णय घेताना कार्यकर्त्यांच्या मतांचा आदर केला जातोय असे नाही त्यामुळे स्वयंसेवी संस्थांचे निर्णय सदोष पद्धतीचे असतात ही समस्यादेखील अनेक स्वयंसेवी संस्थांमध्ये असलेली दिसून येते. तसेच शासकीय निधी वेळेवर उपलब्ध करून दिला जात नाही. याचा विपरीत परिणाम स्वयंसेवी संस्थांच्या कार्यपद्धतीवर होतो.

### ६.७.७ सत्ता टिकविण्याचे माध्यम :

आपल्या सत्तेला धोका पोहोचू नये म्हणून काही निःस्वार्थी कार्यकर्त्यांना पुढे करून सेवाभावी संस्थांचा आधार घेतात. त्यामुळे सेवाभावी संस्थांची आणि कार्यकर्त्यांची प्रतिमा मलीन होते अशा व्यक्तींची संख्या स्वयंसेवी संस्थां स्थापन करून कार्यकर्त्यांच्या माध्यमातून आणि स्वयंसेवी संस्थेच्या नावाने आपली प्रतिमा उजळण्याचे काम करतात आणि संस्थेच्या माध्यमातून किंवा संस्थेचा दुरुपयोग करून राजकीय क्षेत्रात सत्ता टिकविण्याचे प्रयत्न करीत असतात. यामुळे स्वयंसेवी संस्थांच्या नि:स्वार्थी कार्य पद्धतीमुळे मर्यादा येतात. म्हणूनच स्वयंसेवी क्षेत्रात ही एक समस्या निर्माण झाली आहे.

### ६.७.८ शासनाचे विस्तारित विकास घटक / शासनाच्या अनुदानावर अवलंबून असणाऱ्या संस्थां :

अनेक स्वयंसेवी संस्थां स्वतःच्या उत्पन्नाचे साधन शोधायचे सोडून फक्त शासनाच्या अनुदानावर चालणाऱ्या आहेत. अशा संस्थांना स्वतःचे अस्तित्व नाही. शासन आपले विविध विकासाचे कार्यक्रम या संस्थांमार्फत राबवीताना दिसून येतो अशा कार्यक्रमाची अंमलबजावणी करताना शासनाच्या नोकरशाहीचे आदेश पाळावे लागतात. शासनाच्या नियमांना बांधील राहून आपले कार्य करावे लागते त्यामुळे समाजाच्या गरजा ओळखून उद्दिष्ट ठरविण्यापेक्षा शासनाने ठरवून दिलेले कार्यक्रम राबविणे एवढ्यापुरते मर्यादित कार्य असलेले दिसून येते. अशा स्वयंसेवी संस्थां स्वायत्तता धोक्यात येते. शासनाचे कार्यक्रम बंद पडल्यास किंवा योजनेत गैरव्यवहार झाल्यास संस्थांची प्रतिमा मलीन होते.

### ६.७.९ उद्दिष्टपूर्तीला महत्त्व :

काही स्वयंसेवी संस्थां सामाजिक कार्य करत असताना वेगवेगळया मार्गाने निधी मिळवण्यासाठी किंवा शासनाकडून अनुदान मिळवण्यासाठी आपल्या उद्दिष्टपूर्तीला अधिक महत्त्व देतात. आपल्या कार्याचा खर्या अर्थाने समाजाला किती फायदा होतो या गोष्टींचा विचार न करता श्रीमंताकडून देणग्या मिळविणे आणि पैशांची उधळपट्टी करणे किंवा निधीचा गैरव्यवहार करणे या गोष्टीला प्राधान्य देतात आणि अशा स्वयंसेवी संस्थां मूळ हेतूपासून दूर जातात.

### ६.७.१० नेतृत्त्वांच्या भावी पिढींचा अभाव :

स्वातंत्र्योत्तर काळात सामाजिक बांधिलकीच्या नात्याने व स्वयंप्रेरणेने व्यक्ती समूहाने स्वयंसेवी संस्थांची स्थापना केली. एका विशिष्ट उद्देशाने प्रेरित होऊन आयुष्यभर सामाजिक कार्य केले मात्र अशा संस्थांचे किंवा समाजसुधारकांचे वारस योग्य प्रमाणात निर्माण झाले नाहीत. यामुळे अशा संस्थांचे किंवा समाजसुधारकांचे वारस योग्य प्रमाणात निर्माण झाले नाहीत. यामुळे अशा संस्थां पुढे निःस्वार्थपणे कार्य करू शकल्या नाहीत. सद्यपरिस्थितीत समाज कार्य करण्याचे नेतृत्व लोप पावत असल्यामुळे स्वयंसेवी संस्थांमध्ये भावी नेतृत्वाची किंवा नवीन नेतृत्वाची समस्या निर्माण झाली आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) स्वयंसेवी संस्थांना भेडसावणाऱ्या प्रमुख समस्या सांगा.

## ६.८ सेवाभावी संस्थांच्या समस्यांवरील उपाय

सेवाभावी संस्थांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांवर पुढीलप्रमाणे काही उपाय सुचविण्यात येतात.

**१) संसाधनाची उभारणी :**

सेवाभावी संस्थांनी स्वावलंबी होण्यासाठी केवळ देणग्या व अनुदान यावर फारसे अवलंबून राहू नये. लाभार्थीकडून नाममात्र शुल्क घ्यावे. स्वतःची उत्पन्नाची साधने उभी करावी.

**२) कार्यकर्त्यांची निवड :**

सेवाभावी संस्थेतील कार्यकर्त्यांची निवड करताना त्यांची प्रेरणा प्रवृत्ती, ग्रामीण भाग व ग्रामीण विकास कामाविषयी आवड, त्यांचे शिक्षण व प्रशिक्षण, अभ्यास यांचा विचार होणे आवश्यक आहे. स्थानिक स्वयंसेवक कार्यकर्त्यांची प्राधान्याने निवड करावी.

**३) विकास कार्यक्रमांस प्रसिद्धी :**

शासनातर्फे देशातील ग्रामीण विकास कार्यक्रमासंबंधी सविस्तर तपशिलासह पुस्तिका, मार्गदर्शिका, पत्रिका, नियमितपणे प्रसिद्ध करावी. स्थानिक वर्तमानपत्रात त्यांना प्रसिद्धी द्यावी.

**४) संस्थेची कुवत व योग्य कार्याची निवड :**

सेवाभावी संस्थेने स्वतःजवळील कार्यकर्ते, साधने, आर्थिक कुवत, आवड इत्यादी गोष्टी लक्षात घेऊन विकास कार्य, कल्याणकार्य व परिवर्तन, कार्यात सातत्य असावे. स्वयंसेवकांनी दैनंदिनी ठेवावी. अनुभव मार्गदर्शक ठरते.

५) समन्वय समिती :

ग्राम पातळीवर संबंधित अधिकारी, शिक्षक, ग्रामसेवक, सरपंच, स्थानिक वंदनीय व्यक्ती व युवक-युवती यांचे प्रतिनिधी ह्यांचा समावेश असलेली एक समन्वय समिती स्थापावी. त्यांत लाभार्थी गट, कामाचे उद्दिष्ट व व्याप्ती निश्चित करावी.

**६) कार्याबाबतचा दृष्टिकोन :**

सेवाभावी संस्थेने सेवा कार्य करताना ग्रामीण लोकांकडे पालक म्हणून किंवा मार्गदर्शक म्हणून जाऊ नये, तर मित्र म्हणून जावे. ग्रामीण लोकांना आत्मनिर्भर करणे हेच आपले अंतिम लक्ष्य आहे हे सेवाभावी संस्थांनी सतत लक्षात ठेवावे. मासे विनामूल्य देण्यापेक्षा मासे पकडण्यास शिकवावे अशी एक म्हण आहे. कार्यकर्त्यांनी यातील गर्भितार्थ सतत लक्षात ठेवावा.

**आपली प्रगती तपासा :**

१) स्वयंसेवी संस्थांच्या समस्यांवर उपाय सुचवा.

## ६.९ सारांश

विशिष्ट प्रदेशाची किंवा लोकांची सेवा विनामूल्य करण्याच्या हेतूने स्वयंस्फूर्तपणे स्थापण्यात आलेली संस्थां म्हणजे सेवाभावी संस्थां होय. सेवा हे सेवाभावी संस्थेचे प्रमुख ध्येय असते.

सेवाभावी संस्थां ग्रामीण विकास कार्यक्रमात पुरातन काळापासून आपले योगदान देत आहेत. कल्याणकारी कार्यात अंध, विधवा, निरपराधी यांना अग्रक्रम देणे, नैसर्गिक आपत्तीच्या प्रसंगी सहाय्य करणे, शिक्षणाची सोय उपलब्ध करणे, इत्यादी कार्याचा समावेश होतो. विकास कार्यात ग्रामीण लोकांना शेती, ग्रामोद्योग, कुटीरोद्योग ह्यांचे प्रशिक्षण देणे, सरकार रोजगार निर्मितीसाठी राबवीत असलेल्या विविध योजनांची माहिती देणे, लोकसंख्या नियंत्रणाचे महत्त्व पटवून देऊन लोकसंख्या नियंत्रणाच्या कार्यात लोकांचा सहभाग वाढविणे, ग्रामीण लोक, जनता व योजना राबविणारे अधिकारी ह्यांच्यात संवाद प्रस्थापित करणे, लाभार्थींच्या अडचणी अधिकाऱ्यांपुढे मांडणे, रस्ते बांधणे, वनीकरण, शाळा, समाज मंदिर बांधणे इत्यादी कामे हाती घेतली जातात.

सेवाभावी संस्थांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते, परंतु सेवाभावी संस्थांनी केवळ देणग्या, अनुदान ह्यांवर अवलंबून न राहता स्वतः संसाधनाची उभारणी करणे आवश्यक आहे. तसेच कार्यकर्ते निवडताना ग्रामीण विकास कार्याची आवड असणारे कार्यकर्ते निवडावेत. असे असले तरीही ग्रामीण भागातील लोकांना हवी ती सर्व मदत देण्याचे आपले उद्दिष्ट नाही, तर त्यांना आत्मनिर्भर बनविण्याचे उद्दिष्ट आहे. हे सेवाभावी संस्थांनी ध्यानात ठेवणे आवश्यक आहे.

## ६.१० स्वाध्याय

१. स्वयंसेवी संस्थांचे प्रमुख कार्यक्रम विशद करा.

२. सेवाभावी संस्थांना भेडसावणाऱ्या समस्या स्पष्ट करा.

३. स्वयंसेवी संस्थांच्या समस्यांवर उपाय सुचवा.

## ६.११ संदर्भसूची

१. प्रा. डॉ. पानसे रमेश सेवाभावी संघटना आणि ग्रामीण विकास, मुंबई मराठी अर्थशास्त्र परिषद.

२. देसाई वसंत रूरल डेव्हलपमेंट १ के ३ मुंबई हिमालय पब्लिशिंग हाऊस.

३. Mishra S.K.Puri, V.K.Indian Economy Its Development Experience, Mumbai H.P.House.

४. डॉ. डोळे वा म. डॉ. कुलकर्णी स. ना ग्रामीण विकासासंबंधी बिनसरकारी, सेवाभावी संस्थांचा दृष्टिकोनच नाशिक, य. च. म. मु. वि.

५. कामत गो. रा. सहकार तत्त्व आणि व्यवहार, पुणे, समाज प्रबोधन संस्थां.

६. प्रा. डॉ. देसाई रा. मु. डॉ. जोशी श. शं., भारतीय अर्थव्यवस्था

७. "योजना मासिक नोव्हेंबर २०११"

८. "ग्रामीण विकासासंबंधी बिनसरकारी, सेवाभावी संस्थांचा दृष्टिकोन", यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

❖❖❖❖

# ७

# स्वयंसेवी संस्था व लोकसहभाग

**घटक रचना :**

७.० उद्दिष्टे

७.१ प्रस्तावना

७.२ विकास कार्यात लोक सहभाग

७.३ आर्थिक सहभाग

७.४ श्रमाच्या माध्यमातून सहभाग

७.५ मानसिक सहभाग

७.६ सारांश

७.७ स्वाध्याय

७.८ संदर्भ सूची

## ७.० उद्दिष्टे

स्वयंसेवी संस्थां व लोकसहभाग या प्रकरणाच्या अभ्यासाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

- स्वयंसेवी संस्थेमध्ये लोकसहभागाचे महत्त्व जाणून घेणे.
- विकास कार्यातील लोकसहभाग समजून घेणे.
- आर्थिक घटकांतील लोकसहभाग जाणून घेणे.
- श्रमाच्या माध्यमातून मिळवलेला लोकसहभाग जाणणे.
- मानसिक लोकसहभागाचे महत्त्व जाणून घेणे.

## ७.१ प्रस्तावना

स्वातंत्र्यपूर्व काळापासून स्वयंसेवी कार्यात लोक सहभागांची एक महत्त्वाची परंपरा आहे. समाज सुधारकांनी जे समाज विकासाचे कार्य सुरू केले या कार्यामध्ये लोकसहभाग सतत लढत होता. लोकांच्या लोकसहभागामुळे ब्रिटिशांना आपले काही निर्णय बदलावे लागले. यामध्ये महात्मा गांधीजींच्या मिठाचा सत्याग्रह हे एक उत्तम उदाहरण आहे.

लोकसहभागाची परंपरा आपल्या देशात प्राचीन काळापासून असल्यामुळे सध्या देखील स्वयंसेवी कार्याला लोकसहभागांचे महत्त्व कमी झालेले नाहीत.

लोक सहभाग याचा अर्थ ज्या समाजाकरिता विकास कार्याची आखणी स्वयंसेवी संस्थां करतात त्या विकास कामामध्ये जनतेला सहभागी करून घेणे आणि जनतेच्या सहकार्याने विकास कामांची पूर्तता करणे याच गोष्टीला लोकसहभाग असे म्हणतात.

विकास कामाचा खर्या अर्थाने समाज लाभार्थी असतो. या कार्याची समाजाला जाणीव व्हावी, विकास कार्याचे महत्त्व कळावे यासाठी लोकसहभाग विकास कार्यात महत्त्वाचा मानला जातो. शासकीय कार्यक्रमामध्ये सुरुवातीला लोकसहभाग या घटकाला महत्त्व देण्यात आले नव्हते. त्यामुळे अनेक योजना अपयशी ठरल्या. मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार वाढत गेला म्हणून नंतरच्या काळात विकास कार्यात लोक सहभाग वाढविण्याचे विशेष प्रयत्न सुरू झाले मात्र लोकसहभागाची स्वयंसेवी संस्थांची परंपरा फार जुनी आहे.

## ७.२ विकास कार्यात लोकसहभाग

आपल्या देशात बहुसंख्य स्वयंसेवी संस्थां विखुरलेल्या स्वरूपात कार्य करत असलेल्या दिसून येतात. शहरी भागात, ग्रामीण भागात व अतिदुर्गम भागात समाज विकासाचे कार्य या संस्थांमार्फत केले जाते. स्थानिक भागात कार्य करत असताना स्थानिक समाजाच्या गरजा ओळखून विकास कार्यक्रमाची आखणी केली जाते आणि त्यांची अंमलबजावणी संस्थेतील कार्यकर्ते करीत असतात. समाजातील ज्वलंत समस्या सोडविण्याचे कार्य स्वयंसेवी संस्थां करत असल्यामुळे जनतेचा चांगला प्रतिसाद विकास कार्याला मिळत आहे. समाजाच्या सहभागातून दर्जेदार कामे पूर्ण करता येतात. यांची जाणीव स्वयंसेवी क्षेत्रात असल्यामुळे अनेक स्वयंसेवी संस्थांनी लोकसहभागातून यशस्वी विकास कार्ये केली आहेत.



https://www.myhindistatus.com/

## ७.३ आर्थिक सहभाग

लोकसहभागामध्ये आर्थिक सहभाग आणि श्रमाच्या माध्यमातून सहयोग हे घटक अत्यंत महत्त्वाचे आहेत. आर्थिक पाठबळ असल्याशिवाय कोणतेही विकास कार्य योग्यरीत्या पूर्ण करता येत नाही. म्हणून स्वयंसेवी संस्थां आर्थिक सहभाग मिळवण्याचे विशेष प्रयत्न करीत आहेत. आर्थिक सहभाग मिळविताना समाजातील श्रीमंत व धनिक वर्गाकडून देणगी

स्वरूपाने सहभाग मिळवला जातो. तर विकास कार्यातील लाभार्थी घटकांकडून त्यांच्या आर्थिक परिस्थितीनुसार सहभाग मिळविण्याचा प्रयत्न केला जातो.

स्वयंसेवी संस्थां स्वतःचा निधी उभारण्यासाठी वेगवेगळया मार्गाने प्रयत्न करीत असतात. यामध्ये शासकीय अनुदान प्राप्त करून घेणे हा एक भाग असला तरी इतर विकास कामासाठी देणगी रूपाने निधी म्हणून आवश्यक तो खर्च केला जातो. समाज उपयोगी कार्य या संस्थांकडून केला जात असल्यामुळे स्वयंसेवी संस्थांना आर्थिक सहभागदेखील चांगला मिळत आहे.

## ७.४ श्रमाच्या माध्यमातून सहभाग

विकास कार्यात लोकसहभाग मिळविण्याचे दुसरे माध्यम म्हणजे श्रमाच्या माध्यमातून मिळवलेला समाजाचा सहभाग होय. सध्या महाराष्ट्रामध्ये पाणी फाऊंडेशनने चालविलेले कार्य हे लोकसहभागाचे मूर्तिमंत उदाहरण आहे. विकास कार्यक्रम एकाकी स्वरूपाचे होऊ नये म्हणून श्रमाच्या माध्यमातून लोकसहभाग मिळवून लाभार्थींसाठी कार्य केले जाते. वेगवेगळ्या विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी करताना समाजाने श्रमाचा सहभाग द्यावा हे अपेक्षित असते. जल-व्यवस्थापनाचे कार्य करताना लोकांच्या सहकार्याने कामे पूर्ण करणे, वृक्ष लागवड करताना श्रमाच्या माध्यमातून सहभाग करून घेणे हे अपेक्षित असते. जलव्यवस्थापनाचे कार्य करताना लोकांच्या सहकार्याने कामे पूर्ण करणे, वृक्ष लागवड करताना श्रमाच्या माध्यमातून सहभाग मिळवणे, स्वच्छतेची कामे पूर्ण करताना ग्रामस्थांच्या श्रमाचा सहभाग करून घेणे हे अपेक्षित असते. सामूहिक विकासाच्या योजनांमध्ये संपूर्ण लाभार्थी समाजाला सहभागी करून घेणे अशी अनेक कामे स्वयंसेवी संस्थां श्रमाच्या माध्यमातून लोकसहभाग मिळविण्यासाठी यशस्वी ठरल्या आहेत.

## ७.५ मानसिक सहभाग

ग्रामीण भागात कार्य करीत असताना समाजाचा विकास कार्यात मानसिक सहभाग असावा या दृष्टीनेदेखील प्रयत्न असतात. विकास कामात समाजाची सकारात्मक मानसिकता तयार करणे आणि समाजाचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळविणे हे मानसिक सहभागात अत्यंत महत्त्वाचे असते. स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते ज्यावेळी समाजात जातात त्यावेळी ते अनोळखी असतात. अशा वेळी स्थानिक लोकांचा मानसिक सहभाग लगेच मिळत नाही. मानसिक सहभागाची पहिली पायरी म्हणजे आपण मांडलेल्या विचारांना लोकांकडून सहमती मिळवणे किंवा आपण मांडलेले विचार लोकांनी स्वीकारणे हीच आपण केलेल्या आव्हानांना विरोध न करता त्यांचा स्वीकार करणे यालाच मानसिक सहभाग असे म्हणतात.

जनतेचा मानसिक सहभाग असेल तर विकास कामांना अडथळा निर्माण होत नाही. समाजाच्या मानसिक सहभागामुळे स्वयंसेवी संस्थांबद्दलची आपुलकी व संस्थांवर वाढत असलेला विश्वास हे मानसिक सहभागांचे उत्तम उदाहरण आहे. एखाद्या उपक्रम समाजासमोर मांडला असेल आणि या उपक्रमाला विरोध होत असेल तर त्या वेळी समाजाचा मानसिक सहभाग योग्य प्रमाणात नाही असे दिसून येते मात्र स्वयंसेवी संस्थां ग्रामीण समाजाचा मानसिक सहभाग मिळविण्यामध्ये यशस्वी झाला. त्यामुळे अत्याचारविरूद्ध आवाज उठवण्याचे महत्त्वाचे कार्य स्वयंसेवी संस्थां करीत आहे.

एकंदरीत स्वयंसेवी संस्थां आणि लोकसहभाग हा घटक अत्यंत महत्त्वाचा आहे मात्र शासनाला विकास कार्यात फार मोठ्या प्रमाणात लोकसहभाग मिळविता आले नाहीत म्हणून शासनाच्या अनेक योजना अयशस्वी ठरल्या आहेत.

## ७.६ सारांश

संघटनमध्ये लोकसहभाग अतिशय महत्त्वाचा आहे. जोपर्यंत कोणत्याही समुदायात लोकसहभाग प्राप्त होत नाही. तोपर्यंत त्या समुदायाची समस्या सोडविली जाऊ शकत नाही. लोकसहभाग कसा प्राप्त करायचा? ही सर्वच समुदाय संघटन कार्यकर्त्यांपुढील समस्या आहे. कोणत्याही कार्यकर्त्याला शक्य नाही की समुदायातील सर्वच लोकांचा सहभाग मिळविता येईल मात्र जास्तीत जास्त लोकांचा सहभाग मिळविणे आवश्यक आहे. प्रत्येक समुदायातील लोक लहान-मोठ्या समूहात विभागले असतात आणि प्रत्येक समुदायात एक वा अधिक नेतादेखील असतात. जे वैयक्तिकरीत्या आपल्या समुदायाचा विकास करण्यासाठी प्रतिनिधित्व करतात. यासाठी समुदाय संघटनसाठी आवश्यक आहे की समुदाय संघटन कार्यकर्त्याने प्रथम अशा समूहाला शोधावे ज्याचे समुदायात विशेष महत्त्व आहे आणि समूहाच्या नेत्याचीसुद्धा ओळख करून घ्यावी. अशा सर्व नेत्यांना जर एकाच मंचावर एकत्रित करून शकले आणि समुदायाप्रति आणि कर्तव्याप्रति जागरूकता निर्माण करू शकले तर सर्व समुदायातील सर्व लोकांचे प्रतिनिधित्व होऊ शकेल आणि त्यांना कार्य करण्यासाठी प्रेरित केले जाऊ शकेल.

समुदाय संघटनमध्ये ही बाब तितकी महत्त्वपूर्ण नाही की कोणकोणते कार्य पूर्ण केले गेले. परंतु हे अधिक महत्त्वपूर्ण आहे की समुदायातील लोकांमध्ये सोबत कार्य करण्याची कुशलता, सामुदायिक भावना, समस्या समजून घेण्याची पात्रता व दूरदर्शिता कोणत्या स्तरापर्यंत निर्माण झाली आहे आणि लोकांशी आपले मतभेद कोणत्या स्तरापर्यंत रचनात्मकरीत्या उपयोगात आणले आहे.

सामुदायिक संघटनमध्ये लोकसहभागात लोकांमधील आपसी मतभेद, तणाव, संघर्ष यामुळे अडथळे निर्माण होतात. परंतु लोकांसोबत मिळून परस्पर सहकार्याने कार्य करण्याचा हा अर्थ नाही की समुदायातील मतभेद व तणाव संघर्ष पूर्णपणेच समाप्त होईल. वास्तविक पाहता हे सामुदायिक जीवनाचे अभिन्न अंग आहे आणि हे असे तत्त्व आहेत जे सामुदायिक जीवनाला शक्ती प्रदान करतात.

## ७.७ स्वाध्याय

- स्वयंसेवी संस्थां व लोकसहभाग यांचा सहसंबंध स्पष्ट करा.
- स्वयंसेवी संस्थेमध्ये लोकसहभागाचे महत्त्व विशद करा.

## ७.८ संदर्भ सूची


- Kaonta Prasad : NGO's and Socia – Economic Development Opportunities". Deep and deep Publication, New Delhi.
- डॉ. डोळे वा म. डॉ. कुलकर्णी स. ना ग्रामीण विकासासंबंधी बिनसरकारी, सेवाभावी संस्थांचा दृष्टिकोनच नाशिक, य. च. म. मु. वि.
- कामत गो. रा. सहकार तत्त्व आणि व्यवहार, पुणे, समाज प्रबोधन संस्थां.
- Ravi Shankar Kumar Singh (2003) : Role of NGOs in Developing Countries Deep and deep Publication, New Delhi.
- प्रा. डॉ. पानसे रमेश सेवाभावी संघटना आणि ग्रामीण विकास, मराठी अर्थशास्त्र परिषद.
- "योजना मासिक नोव्हेंबर २०११"
- "ग्रामीण विकासासंबंधी बिनसरकारी, सेवाभावी संस्थांचा दृष्टिकोन", यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.


❖❖❖❖

# ८

# स्वयंसेवी संस्था नोंदणी

**घटक रचना :**

८.० पाठाची उद्दिष्टे

८.१ प्रस्तावना

८.२ संस्था नोंदणी अधिनियम १८६०

८.३ स्वयंसेवी संस्थांची नोंदणी प्रक्रिया

८.४ स्वयंसेवी संस्था नोंदणी साठी आवश्यक कागदपत्रे

८.४ सारांश

८.५ स्वाध्याय

८.५ संदर्भ सूची

## ८.० उद्दिष्टे

- स्वयंसेवी संस्था नोंदणीची प्रक्रिया समजून घेणे.
- स्वयंसेवी संस्था नोंदणीसाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांच्या यादीचा अभ्यास करणे.
- स्वयंसेवी संस्था नोंदणीसाठी प्रस्ताव तयार करण्याची प्रक्रिया समजून घेणे.

## ८.१ प्रस्तावना

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशात स्वयंसेवी संस्थांचा विकास मोठ्या प्रमाणावर झाल्याने विविध क्षेत्रात स्वयंसेवी संस्था स्थापन होऊ लागल्या. ग्रामीण तसेच शहरी भागातसुद्धा स्वयंसेवी संस्थांचा विस्तार झाल्याचे दिसून येते. प्रारंभी विणकर आणि कारागीरांना मदत करण्यासाठी स्वयंसेवी संस्था स्थापन झालेल्या होत्या. अशा विविध प्रकारच्या संस्थांचे स्वरूप व कार्ये वेगवेगळी असतात. स्वयंसेवी संस्थांची स्थापना कोण आणि कशा पद्धतीने करतात यासाठी स्वयंसेवी संस्थेच्या नोंदणीची कार्यपद्धती समजावून घेणे महत्त्वाचे असते.

ग्रामीण विकास विषयाअंतर्गत असणाऱ्या ग्रामीण विकासासाठी समाजकार्य या अभ्यासक्रमात आपण स्वयंसेवी संस्थांची संकल्पना, वैशिष्ट्ये, कार्यक्षेत्र, स्वयंसेवी संस्थांच्या समस्या आणि त्यावरील उपाययोजना यांसारख्या बाबींची सैद्धांतिक मांडणी केली आहे.

स्वयंसेवी संस्था नोंदणीची प्रक्रिया, स्वयंसेवी संस्था नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रांची यादी, संस्थांच्या नोंदणीसाठी अस्तित्वात असणारे कायदे याबद्दलच्या माहितीचा अभाव सर्वसामान्यांमध्ये असतो.

परिणामत: स्वयंसेवी संस्था नोंदणी करू इच्छिणाऱ्या व्यक्तींना व समाजकार्याचे प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अनेक अडचणीना सामोरे जावे लागते. संस्था नोंदणीच्या प्रक्रियेची माहिती नसल्यामुळे बऱ्याचदा संस्थेच्या नोंदणीसाठी वकिलांची अथवा दलालांची मदत घेतली जाते. या नोंदणी प्रक्रीये मध्ये मध्यस्थांचा समावेश झाल्याने कमी खर्चिक असलेली ही प्रक्रिया अधिक खर्चिक होवून जाते. तसेच संस्थेचा आत्मा असणारी संस्थेची उद्दिष्टे देखील संस्थाचालकामार्फत न तयार झाल्यामुळे संस्थेची उद्दिष्टे संस्थाचालकांना स्पष्ट नसतात परिणामत: त्यांचे काम चाचपडताना दिसते व स्वयंसेवी संस्थाच्या कार्याला अनेक मर्यादा येतात.

नव्याने सुधारणा होणाऱ्या या अभ्यासक्रमात वर नमूद केलेल्या "स्वयंसेवी संस्थांची नोंदणी प्रक्रिया" या घटकाचा समावेश केल्यास स्वयंसेवी क्षेत्रात कार्य करू इच्छिणाऱ्या व स्वयंसेवी संस्था सुरु/ स्थापू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना या क्षेत्रातील कायदे आणि नोंदणी प्रक्रिया या बाबींची माहिती होईल. स्वयंसेवी संस्थांचे कार्यक्षेत्र अलीकडच्या काळात रुंदावत आहे. तंत्रज्ञान, वैद्यकीय अशा शाखांशी निगडित , वाणिज्य- व्यवसाय क्षेत्रातील नव्या संधीमुळे, जागतिककारणामुळे आणि सामाजिक विकासामुळे निर्माण झाल्या आहेत. व्यवसायातील, स्वयंरोजगारातील, बदलत्या काळाच्या गरजेवर आधारित अभ्यासक्रमाची माहिती विद्यार्थ्यांसोबत त्यांच्या पालकांना देखील मार्गदर्शक ठरेल. शहरी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अशा कायद्यांची व संस्थानोंदणीच्या प्रक्रियेची माहिती मिळत नाही. या सर्व विद्यार्थ्यांना 'स्वयंसेवी संस्थांची नोंदणी प्रकिया' प्रकरण मार्गदर्शक ठरेल.




https://alotmarathi.com

## ८.२ संस्था नोंदणी अधिनियम १८६०

स्वयंसेवी संस्था रजिस्ट्रेशन/ नवीन संस्था सुरु करणे सेवाभावी संस्था/ मंडळ/ शैक्षणिक मंडळ/ ग्राम विकास मंडळ अथवा संस्था सुरु करावयाची असल्यास जिल्हा पातळीवर धर्मदायुक्त कार्यालयात संबंधित संस्थेची नोंदणी, संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अंतर्गत करून प्रमाणपत्र मिळवणे आवश्यक असते.

**संस्था नोंदणी अधिनियम, १८६० महत्वाच्या बाबी :**

जी संस्था सुरु करावयाची आहे तीचे नाव इतर संस्थेच्या नावाप्रमाणे नसावे.

संस्थेच्या जर व्यक्तीचे किंवा घराण्याचे नाव द्यावयाचे असल्यास त्यांच्या कुटुंबाचे अथवा वारसांचे संस्थेला नाव देण्याबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र व नाव देण्यास समंती पत्र घेणे आवश्यक आहे.

- संस्थेचे व्यवस्थापकीय मंडळ यांचे वय १८ वर्षे पूर्ण असावे.
- व्यवस्थापक / सदस्यांची संख्या विषम असावी उदा.७, ९, ११.
- संस्था स्थापने नंतर संस्थेच्या नावाने राष्ट्रीयकृत बँकेत खाते सुरु करावे.
- जास्तीत जास्त व्यवहार चेकने करावा.
- दरवर्षी संस्थेचे ऑडित करून घ्यावे.

## ८.३ स्वयंसेवी संस्थांची नोंदणी प्रक्रिया

**संस्था नोंदणी कशी करावी ?**

स्वयंसेवी संस्था ( NGO ) तुमच्या जिह्ल्यातील धर्मादाय आयुक्तांकडे ( charity office ) ला स्वयंसेवी संस्था (NGO) ची नोंद केली जाते. स्वयंसेवी संस्थेची नोंद हि १९५० व १८६० च्या कायद्याखाली केली जाते त्याचप्रमाणे तुम्हाला १९५० व १८६० अशी दोन प्रकारची नोंदणी प्रमाणपत्रे दिली जातात.सुरुवातीपासून स्वयंसेवी संस्थेची नोंदनी हि थेट धर्मादाय कार्यालयात केली जात होती,परंतु फेब्रुवारी २०१७ पासून सुरुवातीला स्वयंसेवी संस्थेची नोंद हि ऑनलाईन पद्धतीने करणे आवश्यक केली आहे व त्यानंतरच धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणी केली जाते.

### ८.२.१ स्वयंसेवी संस्था नोंदणी साठी आवश्यक कागदपत्रे

| |
|---|
| अग्रेषण पत्र – परिशिष्ट ‘अ’ |
| ज्ञापन – परिशिष्ट ‘ब’ |
| संस्थेचे नियम आणि नियमावली – परिशिष्ट ‘क’ |
| संमती पत्र, १८६०– परिशिष्ट ‘ड’ |
| अधिकारपत्र – परिशिष्ट ‘ई’ |
| स्वयंघोषणा पत्र – प्रपत्र ‘अ’ |
| परिशिष्ट १, २, व ६ |
| ठरावाची प्रत |
| कार्यालयाच्या पत्त्याबाबत ना हरकत प्रमाणपत्र |
| कार्यालयाच्या पत्त्याबाबत पुरावा |
| सर्व सदस्यांचे ओळख पत्र . |

**अग्रेषण पत्र – परिशिष्ट ‘अ’**

संस्थेची नोंदणी संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये करण्याकरीता संस्था नोंदणी करू इच्छिणाऱ्या व्यक्तींना संस्था नोंदणीसाठी रीतसर अर्ज संबधित प्रशासकीय विभागाच्या धर्मादाय आयुक्त कार्यालयतील सहाय्यक संस्था निबंधक यांना करावा लागतो. या अर्जालाच परिशिष्ट ‘अ’ किंवा अग्रेषण पत्र असे म्हणतात . या अग्रेषण पत्रामध्ये संस्थेचे नाव व संस्था नोंदणी साठी सादर करण्यात येणाऱ्या कागदपत्रांविषयी माहिती देण्यात येते.तसेच या अग्रेषण पत्राद्वारे संस्था नोंदणी करणारी व्यक्ती संस्था नोंदणीसाठी आवश्यक असणारे नोंदणी शुल्क भरण्यास आपण तयार आहोत अशी हमी सहाय्यक संस्था निबंधकास देते तसेच ज्या नावाने संबधित व्यक्ती संस्थेची नोंदणी करू इच्छिते त्या नावाने ही संस्था संस्था , अधिनियम १८६० अन्वये त्वरीत नोंदवावी अशी विनंती या अग्रेषण पत्रातून सहाय्यक संस्था निबंधकास करण्यात येते.

परिशिष्ट ‘अ’ किंवा अग्रेषण पत्राचा नमुना पुढील प्रमाणे असतो.

दिनांक :

**परिशिष्ट ‘अ’**

प्रति,
सहाय्यक संस्था निबंधक ,
विभाग,

विषय : संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये नोंदणीबाबत.

संस्थेचे नाव : ________________________________

महोदय,

निवेदन करण्यात येते की, विषयात नमूद केलेल्या संस्थेची नोंदणी संस्था अधिनियम, १८६० प्रमाणे करावयाची आहे. सबब आपणाकडे खालीलप्रमाणे कागदपत्र सादर करण्यात येत आहेत :

- विधानपत्र (ज्ञापन) (मेमोरन्डम ऑफ असोसिएशन).
- नियम व नियमावलीची सत्यप्रत.
- संस्था नोंदणी संदर्भात कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांचे संमतीपत्र.
- संस्था नोंदणी संदर्भात कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांच्या सहीनिशी अधिकारपत्र.
- संस्थेच्या पत्त्याबाबत व मालमत्तेबाबत अध्यक्ष व सचिव यांचे प्रतीज्ञापत्र रु.१०० च्या स्टॅम्पपेपर वर रु.१०० कोर्ट फी स्टॅम्पसह.

पुढे असेही निवेदन करण्यात येते की, वरील संस्थेचे सर्व उद्देश सन १८६० च्या संस्था अधिनियमाच्या कलम २० अन्वये असून वरील संस्थेच्या नावाची वा नामसदृश्य असलेली संस्था माझ्या माहिती प्रमाणे अस्तित्वात नाही. नोंदणी रु. ५०/-(रु.पन्नास फक्त) भरण्यास तयार आहे. तरी वरील संस्था, संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये त्वरीत नोंदवावी अशी विनंती आहे.

कळावे,

आपला विश्वासू ,
(अर्जदाराचे नाव व पत्ता )

**ज्ञापन – परिशिष्ट 'ब'**

परिशिष्ट 'ब' ला संस्थेचे ज्ञापन किंवा मेमोरन्ड्म ऑफ असोसिएशन असे म्हणतात. या परिशिष्टामध्ये संस्थेचे नाव, संस्थेच्या कार्यालयाचा पत्ता, संस्थेचे ध्येय व उद्देश यांचा समावेश असतो. या सोबतच संस्थेच्या नियम आणि नियमावलीप्रमाणे ज्या कार्यकारी मंडळावर सदर संस्थेची जबाबदारी, व्यवस्था व कारभार सोपविण्यात आला आहे अशा पहिल्या कार्यकारी मंडळाच्या सभासदांची संपूर्ण नावे, पत्ते, वय, व्यवसाय व राष्ट्रीयत्व याची माहिती या परिशिष्टामध्ये द्यावी लागते.

या सोबतच संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये अभिप्रेत केलेली संस्था अस्तित्वात आणण्याची आपली इच्छा व्यक्त करून वर नमूद केलेल्या उद्देशाने एकत्र येऊन ही संस्था (संस्थेचे नाव) केली असून ही संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी करण्यासाठी कार्यकारी मंडळाच्या सभासदांना विधानपत्रावर विशेष कार्यकारी दंडाधिकारी/ वकील/ सनदी लेखापाल/ नोटरी यांच्या समक्ष विधानपत्रावर सह्या कराव्या लागतात.

या विधानपत्राच्या प्रत्येक पानावर कमीत कमी तीन सभासदांच्या (अध्यक्ष, सचिव , खजिनदार) यांच्या सह्या अनिवार्य असतात.

परिशिष्ट 'ब' किंवा ज्ञापन/ मेमोरन्ड्म ऑफ असोसिएशन चा नमुना पुढील प्रमाणे असतो.

**परिशिष्ट 'ब'**

---------------------------------------------------------------------------------------------

या संस्थेचे (ज्ञापन ---------------------------------------------------------------------------

(मेमोरन्डम ऑफ असोसिएशन )

संस्थेचे नाव :------------------------------------------------------------------------------

संस्थेच्या कार्यालयाचा पत्ता : ----------------------------------------------------------------

संस्थेचे ध्येय व उद्देश :---------------------------------------------------------------------

(संस्थेचे नाव ________________________________________) या संस्थेच्या नियम व नियमावलीप्रमाणे ज्या कार्यकारी मंडळावर सदरहू संस्थेची व्यवस्था व कारभार सोपविण्यात आलेला आहे अशा पहिल्या कार्यकारी मंडळाच्या सभासदांची संपूर्ण नावे व पत्ते, वय, व्यवसाय व राष्ट्रीयत्व खालीलप्रमाणे आहे :

---

| अनुक्रमांक | संपूर्ण नाव | पत्ता | हुद्दा | वय | राष्ट्रीयत्व | व्यवसाय |
|---|---|---|---|---|---|---|

(नियम/ नियमावलीत जितक्या पदाधिकारी व सदस्यांची संख्या असेल त्या सर्वांची माहिती)

आम्ही खालील सह्या करणारे (संस्थेचे नाव ) चे सदस्य जाहीर करतो की, संस्था नोंदणी अधिनियम ,१८६० अन्वये अभिप्रेत केलेली संस्था अस्तित्वात आणण्याची आमची इच्छा असून वरील उद्देशाने आम्ही एकत्र येऊन (संस्थेचे नाव) ही संस्था आज दिनांक / / रोजी स्थापन केली असून ती संस्था नोंदणी अधिनियम ,१८६० अन्वये नोंदणी करण्यासाठी आम्ही या विधानपत्रावर सह्या केल्या आहेत.

| अनुक्रमांक | सभासदांचे संपूर्ण नाव व पत्ता | सही |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

कार्यकारी मंडळाची सभासद संख्या ७ पेक्षा जास्त असल्यास सर्व सभासदांची नावे, पत्ते, व सह्या या ठिकाणी हव्यात.

स्थळ :
दिनांक :

वरील सह्या करणाऱ्या इसमांना मी ओळखतो व त्यांनी माझ्या समक्ष या विधानपत्रावर सह्या केल्या आहेत.

सही/ विशेष कार्यकारी दंडाधिकारी/ वकील / संनदी लेखापाल/ नोटरी.

तारखेसह

संपूर्ण नाव, पत्ता व शिक्का

या विधानपत्राच्या प्रत्येक पानावर कमीत कमी तीन सभासदांच्या सह्या हव्यात .

**संस्थेचे नियम आणि नियमावली – परिशिष्ट ‘क’**

**परिशिष्ट ‘क’ (संस्थेचे नियम आणि नियमावली) :** परिशिष्ट ‘क’ मध्ये संस्थेच्या नियम आणि नियमावलीचा समावेश असतो. संस्थेचे कामकाज व्यवस्थितरीत्या चालावे या कार्यामध्ये कोणत्याही प्रकारचा अडथळा येऊ नये या करीता नियमित व लिखित अशा स्वरूपाच्या नियमांची आवश्यकता असते. संस्थेचे कामकाज योग्य दिशेने व्हावे याकरिता संस्था स्थापन करणाऱ्या कार्यकारी मंडळातील सदस्यांनी संस्थेसाठी काही नियम आणि नियमावली तयार करणे आवश्यक असते.

सभासदांनी स्थापन केलेली व कोणत्याही बाह्य नियमाच्या अधीन न राहता स्वत:च्या नियमावर आधारलेली कार्यप्रणाली असणे हे स्वयंसेवी संस्थेचे महत्वाचे वैशिष्ट्य आहे.

संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये संस्था नोंदणी करण्यासाठी असलेल्या परिशिष्ट 'क' मध्ये एकूण २६ बाबींचा समावेश होतो.

या बाबींना अनुसरूनच संस्थेचे नियम आणि संस्थेसाठीची नियमावली तयार करणे कार्यकारी मंडळावर बंधनकारक असते.

या नियमांच्या बाबींमध्ये पुढील मुद्‌द्यांचा समावेश आहे.

**परिशिष्ट "क"**

(संस्थेचे नाव) या संस्थेचे : ------------------------------------------

नियम आणि नियमावली :

नियमावलीतील संदर्भीय शब्दांची व्याख्या.

संस्थेचे कार्यक्षेत्र.

हिशोबाचे वर्ष.

सभासदत्व व त्यांच्या नोंदणीची पद्धत.

सभासदांचे प्रकार.

सभासदत्व रद्द होणे.

सर्वसाधारण सभा , तिचे अधिकार आणि कार्ये.

सर्वसाधारण सभेची सुचना व गणसंख्या.

विशेष सर्वसाधारण सभा व तिची कार्ये.

संस्थेचे कार्यकारी मंडळ, पदाधिकारी यांची रचना.

कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ व निवडणुकीची पद्धत.

कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कामे.

कार्यकारी मंडळाची सभा व मागणीची सभा.

कार्यकारी मंडळाची सभेची सूचना व गणसंख्या.

कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीचे नियम.

कार्यकारी मंडळातील रिक्त पद भरण्याबाबत.

कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्ये.

संस्थची निधी, मिळकत व विनियोग.

उद्दिष्ट निहाय खर्चाची तरतूद (टक्केवारी प्रमाणे)

कर्ज किंवा ठेवी संबंधी तरतूद.

स्थावर मालमत्ता विक्री करणे बाबतची तरतूद.

बँक खाते.

सभासदांची यादी ठेवण्याची पद्धत.

नियम आणि नियमावलीत बदल करण्याबाबतची तरतूद.

संस्थेच्या नावात व उद्देशात बदल करण्याची तरतूद.

सन १९७१ च्या संस्था नोंदणी (महाराष्ट्र) नियमामध्ये उल्लेख केलेले अनुसूची १,२ व ६ चे स्वतंत्र्य नमुने अर्जदाराचे सहीनिशी असावे व त्याबाबत नियमावलीत तरतूद केलेली असावी.

विसर्जन

**दाखला**

प्रमाणित करण्यात येते की , ______________________________( संस्थेचे नाव) या संस्थेच्या नियम आणि नियमावलीची सत्य प्रत आहे.

पदाधिकारी यांचे संपूर्ण नाव व हुद्दा सही

______________________________

______________________________

______________________________

स्थळ :

दिनांक :

टीप : नियम आणि नियमावली कमीत कमी तीन पदाधिकारी यांनी प्रमाणित करावयास हवी.

**परिशिष्ट ‘ड’ (संमती पत्र) :** परिशिष्ट ‘ड’ हे संमती पत्र म्हणून ओळखले जाते. या परिशिष्टाच्या माध्यमातून संस्थेची नोंदणी करू इच्छिणाऱ्या व्यक्ती सहाय्यक संस्था निबंधकांना संस्थेच्या नोंदणीसाठी रीतसर अर्ज करतात. या अर्जाच्या म्हणजेच परिशिष्ट ‘ड’ च्या माध्यमातून पहिल्या कार्यकारी मंडळाचे सभासद आपण संस्थेच्या ध्येय, उद्देश व नियमावलीप्रमाणे काम करण्यास आपली संमती असल्याचे सहाय्यक संस्था निबंधकास कळवितात.. तसेच सदर संस्थेची नोंदणी संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये होण्यास आपली संमती म्हणून पहिल्या कार्यकारी मंडळाचे सभासद विशेष कार्यकारी दंडाधिकारी/ वकील/ सनदी लेखापाल/ नोटरी यांच्या समक्ष संमतीपत्रावर सह्या करतात..

संमतीपत्रामध्ये पहिल्या कार्यकारी मंडळाच्या सर्व पदाधिकारी व सभासदांच्या नावांचा व स्वाक्षरीचा (सही) समावेश असतो.

परिशिष्ट ‘ड’ किंवा संमतीपत्राचा नमुना पुढील प्रमाणे असतो.

परिशिष्ट ‘ड’

**संमती पत्र**

प्रति,

सहाय्यक संस्था निबंधक ,

विभाग

विषय : संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये

(संस्थेचे नाव)

या संस्थेची नोंदणी.

महोदय ,

आम्ही खालील सह्या करणारे ________________________________(संस्थेचे नाव) या संस्थेच्या पहिल्या कार्यकारी मंडळाचे सभासद असून सदर संस्थेच्या ध्येय, उद्देश व नियमावलीप्रमाणे काम करण्यास आमची संमती आहे. तसेच संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये सदर संस्थेची नोंदणी होण्यास आमची संमती असून त्याचे प्रतिक म्हणून आम्ही आमच्या स्वाक्षऱ्या या संमतीपत्रावर केल्या आहेत.

आपले विश्वासू,

| अनुक्रमांक | नाव | सही |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

( कार्यकारी मंडळातील पदाधिकारी व सभासद यांची नावे व सह्या )

स्थळ :

दिनांक :

वरील सह्या करणारे यांना मी ओळखतो. त्यांनी माझ्या समक्ष सह्या केल्या आहेत .

सही व तारीख (विशेष कार्यकारी दंडाधिकारी/ वकील/ सनदी लेखापाल/ नोटरी)

**परिशिष्ट 'ई'(अधिकारपत्र) :** परिशिष्ट 'ई' ला अधिकारपत्र असे संबोधले जाते. अधिकार पत्र म्हणजे संस्थेच्या पहिल्या कार्यकारी मंडळातील सभासदांपैकी कोणत्याही एका सभासदाला संस्थेच्या नोंदणी कागदपत्रात भविष्यामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी सर्व सभासदांनी मिळून प्रदान केलेले अधिकार होय.

या साठी संस्था नोंदणी करणारे कार्यकारी मंडळाचे सभासद सहाय्यक संस्था निबंधकांना अधिकारप्रदानासंबंधी अर्ज सादर करतात. या अर्जामध्ये ज्या पदाधिकारी / सभासदाला अधिकार प्रदान करण्यात येणार आहेत त्या सभासदाचे / पदाधिकाऱ्याचे नाव असते व त्याला अनुमोदन म्हणून इतर पदाधिकारी व सभासद आपली स्वाक्षरी देतात.

बऱ्याचदा संस्थेच्या बाबतीतील कागदपत्रात आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार संस्थेच्या अध्यक्षांकडे असल्याचे निदर्शनास येते.

**अधिकारपत्र – परिशिष्ट 'ई'**

परिशिष्ट 'ई' किंवा अधिकार पत्राचा नमुना पुढील प्रमाणे असतो.

**परिशिष्ट 'ई'**

**अधिकारपत्र**

प्रति,

सहाय्यक संस्था निबंधक,

विभाग ,

महोदय ,

आम्ही खालील सह्या करणार ________________________ (संस्थेचे नाव) या संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सभासद नमूद करीत आहोत की , या संस्थेच्या वतीने श्री /श्रीमती. __________________(सभासद / पदाधिकारी यांचे नाव) यांना सदरहू संस्था नोंदणी बाबतचे कागदपत्रात आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार या पत्राने प्रदान करीत आहोत.

| अनुक्रमांक | सभासदाचे नाव | सही |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

वरील अधिकारपत्र स्वीकारले

________________________

अधिकार ग्रहण करणाऱ्या सभासदाची सही व तारीख

**स्वयंघोषणा पत्र – प्रपत्र ‘अ’**

प्रपत्र – अ ( स्वयंघोषणापत्र ) : प्रपत्र –अ हे स्वयंघोषणा पत्र म्हणून ओळखले जाते. यापूर्वी प्रपत्र – अ ला परिशिष्ट ‘फ’ - प्रतिज्ञापत्र असे संबोधले जात होते.

प्रपत्र – अ म्हणजेच स्वयंघोषणा पत्राद्वारे संस्था नोंदणी करणारा प्रमुख सभासद पुढील बाबी घोषित करतो .

संस्थेच्या विधानापत्रावर (संस्थापन समयालेख ) सह्या करणाऱ्या सभासदांना तो किंवा ती ओळखतो /ते.

आजपर्यंत त्यांच्या संस्थेच्या नोंदणी प्रकरणातील मजकुरात काहीही बदल झझालेला नाही.

वरील नावाची किंवा नामासदृश्य असलेली संस्था त्याच्या / तिच्या माहितीप्रमाणे अस्तित्वात वा नोंद झालेली नाही .

संस्था नोंदणी करण्याच्या तारखेपर्यंत संस्थेत असलेली स्थावर व जंगम मालमत्तेचा तपशील.

संस्थेच्या ज्ञापानात संस्थेच्या कार्यालयाचा दिलेला पत्ता किंवा संस्थेच्या पत्रव्यवहाराचा पत्ता याकरिता दिलेली जागा ही कोणाच्या मालकीची आहे.

तसेच या संस्थेच्या पत्याबाबत काही वाद निर्माण झाल्यास संपूर्ण जबाबदारी आपली व संस्थेचे इतर पदाधिकारी यांची राहील.

वर नमूद केलेली माहिती खोटी आढळल्यास भारतीत दंड संहिता अन्वये आणि किंवा संबंधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल याची मला पूर्ण जाणीव आहे.

स्वयंघोषणा पत्राच्या अखेरीस अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी असते.

प्रपत्र – अ किंवा स्वयंघोषणापत्राचा नमुना पुढीलप्रमाणे असतो.

**प्रपत्र – अ**

स्वयंघोषणापत्र

□□□□□□□□□
□□□□□□□
□□□□□□□□□
□□□□□□□□□
□
□□□□

मी,______________________ श्री ____________________यांचा मुलगा/ मुलगी/ पती/ पत्नी, वय ________वर्ष, आधार क्रमांक _______________ व्यवसाय____________राहणार____________________________________ (पत्ता ) याद्वारे घोषित करतो / करते की, मी, “ ____________________________” (संस्थेचे नाव) या संस्थेचा ___________(पद) असून संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये सदर संस्था नोंदणी करीता सहाय्यक निबंधक, _____ विभाग यांच्या कार्यालयात दिनांक - / / २० रोजी प्रस्ताव दाखल केलेला आहे. सदर संस्थेच्या ज्ञापनातील नियम व नियमावली तसेच प्रस्तावासोबत जोडलेले इतर कागदपत्रातील मजकूर व विधाने बरोबर व सत्य आहेत.

वरील संस्था ही धर्मादाय स्वरूपाच्या उद्देशाकरीता स्थापन केलेली असुन तिचे ध्येय व उद्देश संस्था नोंदणी अधिनियम १८६० च्या कलम २० प्रमाणे आहेत.

मी असेही सांगतो की,

या संस्थेच्या विधानपत्रावर (संस्थापन सामायालेख) सह्या करणाऱ्या सभासदांना मी ओळखतो.

आज तारखेपर्यंत नोंदणी प्रकरणातील मजकुरात काहीही बदल झालेला नाही.

वरील नावाची किंवा नामसदृश्य असलेली संस्था माझ्या माहिती प्रमाणे अस्तित्वात वा नोंद झालेली नाही.

आज तारखेपर्यंत संस्थेस कोणत्याही प्रकारची स्थावर मालमत्ता नाही . जंगम मालमत्ता म्हणून रोख रक्कम रु. ____________/- ( रुपये _________________ फक्त ) आहे व ती ______________ यांच्याकडे संस्थेच्या नावे बँकेत / पोस्टात जमा आहे.

या संस्थेच्या ज्ञापनात संस्थेच्या कार्यालयाचा पत्ता किंवा संस्थेच्या पत्रव्यवहाराचा पत्ता _____________________________________________________या सदरात दिलेली पत्त्याची जागा ही श्री.____________________________________ यांच्या मालकीची आहे. त्या प्रीत्यर्थ लाईट बील व ना- हरकत प्रमाणपत्र या दस्तऐवजाची खरीप्रत सादर केली आहे. या बाबतीत काही कमी जास्त झाल्यास अथवा काही वाद निर्माण झाल्यास याची संपूर्ण जबाबदारी माझी स्वत:ची तसेच संस्थेचे इतर पदाधिकारी यांची राहील. संस्थेच्या पत्त्यात काही बदल झाल्यास तो रीतसर आपल्याकडे कळविण्याची जबाबदारी माझी राहील.

वरील सर्व माहिती माझ्या व्यक्तीगत माहिती व समजुतीनुसार खरी आहे . सदर माहिती खोटी आढळून आल्यास भारतीय दंड संहिता अन्वये आणि / किंवा संबंधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण : ____________________

अर्जदाराची सही : __________________

दिनांक : ______________________

अर्जदाराचे नाव : __________________

परिशिष्ट – एक : परिशिष्ट – एक मध्ये संस्था नोंदणी अधिनियम १८६० च्या कलम ४ प्रमाणे कार्यकारी मंडळाची यादि निबंधकांकडे दाखल करण्यात येते. ही सभासदांची यादी कमीत कमी तीन पदाधिकारी यांनी प्रमाणित करावयास हवी.

परिशिष्ट १, २, व ६

परिशिष्ट – एक चा नमुना पुढील प्रमाणे असतो.

परिशिष्ट – एक

संस्था नोंदणी अधिनियम १८६० च्या कलम ४ प्रमाणे कार्यकारी मंडळाची यादी

संस्थेचे नाव : ____________________________________________

संस्थेचा पत्ता : ___________________________________________

| अनु. क्रमांक | सभासदाचे नाव व पत्ता | वय | हुद्दा | व्यवसाय | राष्ट्रीयत्व |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

स्थळ :

दिनांक :

अध्यक्ष सचिव खजिनदार

**परिशिष्ट – दोन :** परिशिष्ट –दोन मध्ये संस्थेने नोकरीला लावेलेल्या व्यक्तींच्या नोकरीसंबंधीच्या अटींची माहिती असते. या परिशिष्टामध्ये संस्थेचे नाव, संस्थेचा पूर्ण पत्ता, संस्था नोंदणी अधिनियम १८६० प्रमाणे नोंदणी क्रमांक, कर्मचाऱ्यांचे संपूर्ण नाव , पत्ता व हुद्दा, सध्याची वेतन श्रेणी, सध्याचे मासिक वेतन, मासिक महागाई भत्ता , इतर विशेष वेतन, इतर दुसरे भत्ते कोणतेही असल्यास (घरभाडे, -औषधोपचाराकरीता , वाहनाकरीता), भविष्य निर्वाह निधीचा फायदा , संस्थेने कर्मचाऱ्यांना उपलब्ध करून दिलेले इतर कोणतेही फायदे आणि शेरा अशा १० बाबींचा समावेश पारीशिष्ट – दोन मध्ये होतो.

**थोडक्यात सांगायचे झाल्यास परिशिष्ट –** दोन मध्ये संस्थेने कामाला लावलेल्या कर्मचारी वर्गाचा व त्यांच्या वेतन श्रेणीचा तपशील असतो. परिशिष्ट – दोन चा नमुना पुढील प्रमाणे असतो.

**परिशिष्ट – दोन**

संस्थेने नोकरीस लावलेल्या व्यक्तींच्या नोकरी संबंधाच्या अती विवरण पत्रक ३१ मार्च २०___ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता.

संस्थेचे नाव : ______________________________________

संस्थेचा पत्ता : ______________________________________

सोसायटी रजिस्ट्रेशन Act १८६० प्रमाणे नोंदणी क्रमांक

| अनु. क्रमांक | कर्मचाऱ्याचे नाव , पत्ता व हुद्दा | सध्याची अस्थाई वेतन श्रेणी | अस्थाई किंवा कायम आहे आणि पूर्णकालीन किंवा अंशकालीन आहे | सध्याचे मासिक वेतन | मासिक महागाई |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| | ----- | निरंक | ---------- | -------- | -------- |

| विशेष वेतन इतर कोणतेही | इतर दुसरे भत्ते कोणतेही असल्यास (घरभाडे), औषधोपचाराकरीता, वाहनाकरीता, इत्यादी | भविष्य निर्वाह | संस्थेने उपलब्ध केलेले फायदे इतर कोणतेही असल्यास | शेरा |
|---|---|---|---|---|
| ७ | ८ | ९ | १० | ११ |
| ----- | निरंक | ------ | ------- | ----- --- |

अध्यक्ष सचिव खजिनदार

**परिशिष्ट – सहा (नियम १५) :** परिशिष्ट – सहा मध्ये संस्थेच्या कार्यकारी मंडळाने ठेवावयाची सभासदांची यादी असते. परिशिष्ट –सहा चा नमुना खालील प्रमाणे असतो.

परिशिष्ट – सहा

(नियम १५)

संस्थेच्या कार्यकारी मंडळाने ठेवावयाची सभासदांची यादी .

संस्थेचे नाव व पत्ता : ______________________________

| अनु.क्रमांक | सभासदांचे नाव व पत्ता | प्रवेश तारीख | सही |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

स्थळ :

दिनांक :

अध्यक्ष सचिव खजिनदार

**ठरावाची प्रत**

ठराव : संस्था नोंदणी करत असताना नोंदणी प्रस्तावासोबत तीन प्रकारचे ठराव (प्रोसिडिंग) रजिस्टर मध्ये व्यवस्थित नोंद करून मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त किंवा सहाय्यक संस्था निबंधक यांच्याकडे सादर करावयाचे असतात.

या ठरावांमध्ये प्रामुख्याने संस्थेच्या नावाचा ठराव , संस्थेच्या कार्यकारी मंडळांची निवड, व संस्थेच्या कागदपत्रात बदल करण्याचा तसेच संस्थेचे नोंदणीपत्र स्वीकारण्याचा अधिकार याबाबत ठराव करायचे असतात .

ठरावांचा नमुना खालीलप्रमाणे असतो .

ठराव

आज दिनांक ____________________ रोजी ठीक ______________ वाजता श्री/ श्रीमती________________________यांच्या अध्यक्षतेखाली ____________________ स्तर चर्चा करण्यात आली आहे. खालील प्रमाणे नावाची संस्था स्थापन करण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले. तसेच संस्थेसंबंधीचे इतर सर्व ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

विषय क्रमांक १ : संस्थेच्या नावाबाबत

ठराव क्रमांक १ : वरील विषयी पदाधिकारी व सभासदात चर्चा करण्यात आली व त्यात संस्थेचे नाव ________________________________________ असे ठेवण्यात यावे असे सर्वानुमते ठरले व ठराव क्रमांक १ सर्वानुमते मंजूर करण्यात आला .

सूचक : _____________________(सभासद /पदाधिकारी यांचे नाव )

अनुमोदक :_________________(सभासद /पदाधिकारी यांचे नाव )

**ठराव सर्वानुमते मंजूर**

विषय क्रमांक २ : कार्यकारी मंडळाच्या निवडीबाबत

ठराव क्रमांक २ : _____________________________________ (संस्थेचे नाव) या संस्थेच्या कार्यकरी मंडळाची निवड खालीलप्रमाणे करण्यात आलेली आहे. हे कार्यकारी मंडळ _____ वर्षासाठी कार्यरत राहील , असे सर्वानुमते ठरले व ठराव क्रमांक २ सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

| अनु. क्रमांक | सदस्यांची नावे | पद | सही |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

सूचक : _____________(सभासद /पदाधिकारी यांचे नाव )

अनुमोदक :_________ (सभासद /पदाधिकारी यांचे नाव )

ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्रमांक ३: नियम व नियमावलीच्या मंजुरीबाबत**

ठराव क्रमांक ३ : ___________________________________________ यांनी असा ठराव मांडला की , _________________________________ (संस्थेचे नाव) या संस्थेचे उद्देश, नियम व नियमावली तयार करून त्यांचे वाचन करण्यात आले. सर्व सदस्यांच्या मताने चर्चा करून नियामावलीला अधिकृत मंजुरी देऊन नियमावलीच्या चौकटीत राहून सर्व पदाधिकारी व सदस्य यांनी कामकाज करण्याचे ठरविले व ठराव क्रमांक ३ सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

घटनेत किंवा कागदपत्रात खाडोखोड किंवा दुरुस्ती करणे व त्यात काहीही सुधारणा करणे असल्यास दुरुस्तीचा अधिकार श्री./ श्रीमती ______________________________ यांना देण्यात आला आहे .

सूचक : ________________________ (सभासद /पदाधिकारी यांचे नाव )

अनुमोदक : ________________________(सभासद /पदाधिकारी यांचे नाव )

**ठराव सर्वानुमते मंजूर**

अध्यक्षांनी सर्व उपस्थित व्यक्तींचे , पदाधिकारी व सभासदांचे आभार मानले व सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

दिनांक :

स्थळ :

सही :

ठरावाची सत्यप्रत

कार्यालयाच्या पत्त्याबाबत ना हरकत प्रमाणपत्र.

**ना हरकत प्रमाणपत्र (No Objection Certificate) :**

संस्था नोंदणी करण्यासाठी सर्व प्रथम संस्थेला कार्यालय असणे आवश्यक असते.संस्थेचा पत्ता किंवा कार्यालीयीन कामकाजासाठी संस्थेचा निश्चित पत्ता असणे आवश्यक असते . बऱ्याचदा संस्था नोंदणी करत असताना संस्थेला उत्पन्नाचा स्त्रोत नसल्याने कार्यकारी मंडळातील सदस्यांचे निवासस्थान हे संस्थेचे कार्यालय म्हणून दाखविले जाते किंवा एखादी जागा भाडेतत्वावर घेऊन तिथे संस्थेचे कार्यालय सुरु केले जाते,

संस्थेचे कार्यालय पदाधिकारी किंवा सभासद यांच्या घरी सुरु करायला किंवा एखाद्या भाड्याच्या ठिकाणी सुरु करण्यासाठी त्या सभासदाची किंवा त्या कार्यालयाच्या ठिकाणच्या मूळ मालकाची परवानगी असणे आवश्यक असते. संस्थेचे कार्यालय या ठिकाणी चालू करण्यास परवानगी देताना , संस्थेच्या कार्यालयाला आपली कोणतीही हरकत नाही असे मूळ मालकाला सहाय्यक संस्था निबंधक यांना लेखी स्वरूपात लिहून द्यावे लागते. यालाच ना हरकत प्रमाणपत्र (No Objection Certificate) असे संबोधतात.

ना हरकत प्रमाणपत्राचा नमुना खालील प्रमाणे असतो.

दिनांक : / /

प्रति,

मा.सहाय्यक संस्था निबंधक ,

विभाग

विषय : ना हरकत प्रमाणपत्र

महोदय ,

मी खालील सही करणार ______________________________(ना हरकत प्रमाणपत्र लिहून देणाऱ्या व्यक्तीचे नाव) ना हरकत प्रमाणपत्र लिहून देतो की, ________________________________ (संस्थेचे नाव) या संस्थेच्या ज्ञापन मध्ये दिलेला संस्थेच्या कार्यालयाचा पत्ता _________________________________ हा माझ्या मालकीचा असून ही जागा सदर संस्थेस कार्यालयीन वापर्र तसेच पत्रव्यव्यवहारासाठी वापरण्यास माझी कसलीही हरकत नाही .

सदर जागेवर संस्थेचा कुठल्याही प्रकारचा मालकी हक्क राहणार नाही.

स्थळ:

दिनांक:

आपला विश्वासू,

(ना हरकत प्रमाणपत्र लिहून देणाऱ्याचे नाव व सही )

**कार्यालयाच्या पत्त्याबाबत पुरावा**

स्वयंसेवी संस्थेच्या कार्यालयाच्या पत्त्यासाठीचा पुरावा म्हणून खालील कागदपत्रांचा समावेश होतो.

संस्थेच्या पत्ता पडताळणीसाठी अलीकडील वीज देयकाच्या (लाईट बिलाच्या) दोन स्वसाक्षरीत छायांकित प्रती.

इतर कागदपत्रे :

सर्व सभासदांचे पासपोर्ट आकाराचे फोटो

सर्व सभासदांचे ईमेल आयडी, मोबाईल क्रमांक, पण क्रमांक.

स्वयंसेवी संस्था नोंदणी करण्यासाठी संस्था नोंदणी करू इच्छिणाऱ्या व्यक्तीला धर्मादाय आयुक्तालयात सहाय्यक संस्था निबंधकाकडे अर्ज प्रस्ताव करावा लागतो. यामध्ये परिशिष्ट 'अ' (अग्रेषण पत्र) , परिशिष्ट 'ब' (ज्ञापन), परिशिष्ट 'क' (नियम आणि नियमावली) , परिशिष्ट 'ड' (संमतीपत्र), परिशिष्ट 'ई' (अधिकारपत्र) , प्रपत्र 'अ'(स्वयंघोषणा पत्र) , परिशिष्ट- एक , परिशिष्ट – दोन व परिशिष्ट- सहा, ठरावाची प्रत , संस्थेच्या कार्यालयाच्या पत्त्याबाबत ना हरकत प्रमाणपत्र, कार्यालयाच्या पत्त्याबाबत पुरावा आणि संस्थेच्या सर्व सदस्यांचे ओळखपत्र या कागदपत्रांचा समावेश होतो.

१८ वर्षावरील कोणत्याही सात किंवा त्याहून अधिक व्यक्ती एकत्र येऊन स्वयंसेवी संस्था स्थापन करू शकतात.स्वयंसेवी संस्थेमधील कार्यकारी मंडळामध्ये अध्यक्ष, सचिव व खजिनदार ही पदे आवश्यक असतात. संस्थेमध्ये सामाविष्ट सदस्यांची ओळख सिद्ध करण्यासाठी खालील कागदपत्रांची आवश्यकता असते .

- सर्व सदस्यांचे ओळख पत्र .
- आधार कार्ड
- पॅन कार्ड .
- मतदार ओळख पत्र
- जेष्ठ नागरिक ओळखपत्र.
- पासपोर्ट.
- वाहन चालविण्याचा परवाना .
- उपरोक्त नमूद कागदपत्रातील कोणत्याही एका कागदपत्राच्या दोन स्वस्वाक्षरीत छायांकित प्रती आवश्यक आहेत.

स्वयंसेवी क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या किंवा कार्य करू इच्छिणाऱ्या व्यक्तींना सुचना :

१. संस्थेत आणि संस्थेच्या कामात राजकारण आणू नका .

२. संस्थेचे विश्वस्त पदाधिकारी आणि सभासद यांच्यात मतभेद नको.

३. पदाधिकाऱ्यांनी किंवा सभासदांनी स्वत:च्या फायद्यासाठी अथवा आपल्या नातेवाईकांच्या फायद्यासाठी योजना राबवू नये.

४. लोकांमध्ये संस्थेची पर्तीमा मलीन होणार नाही किंवा संस्थेच्या प्रतिष्ठेला बाधा येणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे.

५. संस्थेचे आर्थिक संतुलन सांभाळणे आवश्यक आहे.

६. व्यवस्थापन . कर्मचारी व संबंधित कार्यकर्ते यांच्यात सुसंवाद हवा .

७. एखाद्या विभागात एखादी संस्था कार्यरत असेल तर त्या विभागात त्याच स्वरूपाचे कार्यक्रम घेऊ नका .

८. संस्थेचे हिशेब आणि हिशेबाचे पुस्तके अद्ययावत ठेवा.

९. अंदाज पत्रक आणि प्रत्यक्ष जमा – खर्च यांचे ठराविक कालावधीत तुलना करून ठेवा. तीन/ सहा महिन्यांनी कामाचे, कार्यकर्त्यांचे मुल्यांकन करून चुका शोधा , उपाय शोधून दुरुस्त्या करा.

१०. सुरवातीला स्वयंसेवी संस्थेमध्ये निधीची कमतरता असते, परिणामात: संस्थेमध्ये कार्यकर्ते अतिशय तुटपुंज्या पगारावर काम करत असतात अशावेळेस कमी वेतनाची

भर कार्यकर्त्यांना इतर फायदे देऊन जसे की रजा,कामाचे कमी तास, पी.एफ भरून काढता येते.

११. कर्मचाऱ्यांचे – कार्यकर्त्यांचे ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी कार्यकर्त्यांना वेळोवेळी प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.,

१२. आपल्याकडे असलेल्या मनुष्यबळाचा व इतर साहित्यांचा अधिकाधिक योग्य रीतीने वापर करावा.

## ८.३ सारांश

ग्रामीण व शहरी भागात सध्या अनेक स्वयंसेवी संस्था, बहुउद्देशीय संस्था, फाउंडेशन अशा अनेक प्रकारच्या संस्था कार्यरत असतात. एखादी आपत्ती आल्यानंतर मदतीसाठी संस्था पुढाकार घेतात. गणेशोत्सव, नवरात्रोत्सवासह रक्तदान शिबिर, क्रीडा स्पर्धा, प्रशिक्षण देणे, वाचनालये असे अनेक उपक्रम राबविण्यासाठी संस्था पुढे येतात. अशा संस्थेला कायदेशीररीत्या धर्मादाय आयुक्त कार्यालयात नोंदणी करणे आवश्यक असते.

## ८.४ स्वाध्याय

१. स्वयंसेवी संस्था नोंदणीची प्रक्रिया सविस्तर सांगा

२. स्वयंसेवी संस्था नोंदणीसाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रां ची माहीती द्या.

३. स्वयंसेवी संस्था नोंदणीसाठी प्रस्ताव तयार करण्याची प्रक्रिया स्पष्ट करा

## ८.५ संदर्भ सूची

१. सेवाभावी व स्वयंसेवी संस्थासाठी अर्थसहाय्याच्या ३०० योजना, लेखक- मोहन वैद्य, प्रकाशन विश्व, सी- २ हर्षदा गर्दन, महागणेश कॉलोनी, पुणे.

२. खरीखुरी टीम इंडिया युनिक फीचर्स, सुहास कुलकर्णी, श्याम देशपांडे समकालीन प्रकाशन, ८. अमित कोम्पलेस, सदाशिव पेठ, पुणे.

३. कोकणातील अरीस्थावर उपाय स्थानिकांच्या नजरेतून, संसाधने व उपजीविका गट प्रयास, मंगेश पुष्प,१३ स्वामी विवेकानंद सोसायटी, पुणे.

४. महिला स्वयंसहाय्य्यता बचत गट, प्रा. एम. यू. मुलाणी, डायमंड प्रकाशन, १६९२, सदाशिव पेठ, पुणे.

५. विकासाच्या वाटा महाराष्ट्रांच्या अनुभवातून, सु. गो. तपस्वी, ग्रंथाली प्रकाशन, इंडियन एज्यु. सोसा. महात्मा फुले कन्याशाळा गोखले रोड दादर, मुंबई.

❖❖❖❖

# ९

# स्वयंसेवी संस्थाचे व्यवहार

**घटक रचना :**

९.० पाठाची उद्दिष्टे

९.१ प्रस्तावना

९.२ स्वयंसेवी संस्थांच्या उत्पन्नाच्या बाबी

९.३ स्वयंसेवी संस्थांच्या खर्चाच्या बाबी

९.४ पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आर्थिक व्यवस्थापनाबाबत घ्यावयाची काळजी व जबाबदारी

९.५ सारांश

९.६ स्वाध्याय

९.७ संदर्भ सूची

## ९.० पाठाची उद्दिष्टे

१. स्वयंसेवी संस्थांच्या उत्पन्नाचे मार्ग अभ्यासणे.

२. स्वयंसेवी संस्थांच्या खर्चाच्या बाबी समजून घेणे.

३. स्वयंसेवी संस्थांच्या आर्थिक व्यवस्थापनाबाबत पदाधिकारी व कार्यकर्ते यांची जबाबदारी व भूमिका यांचा अभ्यास करणे.




https://mr.quora.com

## ९.१ प्रस्तावना

यापूर्वीच्या प्रकरणात आपण स्वयंसेवी संस्थेची व्याख्या, वैशिष्ट्ये, स्वयंसेवी संस्थांच्या व्यवस्थापनाची तत्वे अभ्यासली आहेत. प्रस्तुत प्रकरणात आपण स्वयंसेवी संस्थेची नोंदणी करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांविषयी माहिती घेणार आहोत. स्वयंसेवी संस्थांची किंवा अशासकीय संस्थांची नोंदणी करण्यासाठी स्वयंसेवी किंवा अशासकीय संस्थांची नोंदणी करू इच्छिणाऱ्या व्यक्तींना ज्या कायद्याअंतर्गत त्यांना संस्था नोंदणी करायची आहे त्या कायद्यांतर्गत धर्मादाय कार्यालयात सहाय्यक संस्था निबंधक यांना अर्ज करावा लागतो. या अर्जामध्ये अनेक परिशिष्टांचा समावेश आहे.या परिशिष्टांचा समावेश असल्याने अनेकांना ही संस्था नोंदणीची प्रक्रिया क्लिष्ट व गुंतागुंतीची वाटते. परिणामत: या नोंदणीच्या प्रक्रियेमध्ये अनेक मध्यस्थांचा समावेश झाला आहे. या मध्यस्थांमार्फत नोंदणीसाठी पैशाची आकारणी मोठ्या प्रमाणावर केली जाते त्यामुळे अल्प खर्चिक असलेली ही संस्था नोंदणीची प्रक्रिया खर्चिक स्वरूपाची होऊन जाते.तसेच मध्यस्थांमार्फत संस्था नोंदणी केली जात असताना संबंधित संस्थेची उद्दिष्टे ही मध्यस्थांमार्फतच निश्चित केली जात असल्याने संस्था नोंदणी करणारया व्यक्तीं या संस्थेच्या उद्दिष्टांबाबत अनभिज्ञ  असतात. या बाबीमुळे संस्थेचे कार्य हे यशस्वीरीत्या पार पाडण्यात अनेक अडथळे निर्माण होतात. या सर्वांचा परिणाम एकत्रितपणे संस्थेच्या कार्यक्षमतेवर होतो.

ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत कार्य करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना अधिक प्रभावीपणे कार्य करता यावे याकरीता त्यांना स्वयंसेवी संस्था नोंदणीची प्रक्रिया समजावी या उद्देशाने आपण या प्रकरणात आपण स्वयंसेवी संस्था नोंदणी अधिनियम १८६० अंतर्गत स्वयंसेवी संस्था नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रांची माहिती घेणार आहोत.

स्वयंसेवी संस्था या लोकांसाठी लोकांमार्फत कार्य करत असतात. स्वयंसेवी संस्थांना आपले कार्य पार पाडण्यासाठी भक्कम अशा स्वरूपाच्या आर्थिक पाठबळाची आवश्यकता असते. बऱ्याचदा स्वयंसेवी संस्था या आर्थिकदृष्ट्या कमकुवत असतात. निधी संकलनाचे योग्य मार्ग माहीत नसल्यामुळे स्वयंसेवी संस्थांचे कार्य आर्थिक निधी अभावी चाचपडताना दिसते. अनेक स्वयंसेवी संस्था या निधी संकलनासाठी राजकीय पक्षांचा आधार घेतात. राजकीय पक्षाचा स्वयंसेवी संस्थेच्या कार्यात हस्तक्षेप वाढल्याने स्वयंसेवी संस्था या राजकीय पक्षांच्या मांडलिक होतात व त्यांच्या कामाचे स्वरूप हे एका विशिष्ट पक्षाच्या प्रचाराचे होऊन जाते. परिणामत: लोककल्याण, समाजसेवक या संस्थेच्या उद्देशालाच हरताळ फासली जाते.

आर्थिक निधीच्या म्हणजेच उत्पन्नाच्या अभावामुळे स्वयंसेवी संस्थेच्या कार्यावर व कार्यक्षेत्रावर मोठ्या प्रमाणावर मर्यादा येतात. भारतातील अनेक स्वयंसेवी संस्थाचे कार्य हे निधीच्या अभावामुळे थांबलेले दिसते. आर्थिक निधीच्या कमतरतेमुळे स्वयंसेवी संस्था या प्रभावहीन होऊ लागले आहेत. या आर्थिक समस्येमुळेच भारतात स्वयंसेवी  संस्थांची संख्यात्मक वाढ झालेली दिसते. पण गुणात्मक वाढ खुंटलेली दिसते.

सदर प्रकरणात आपण स्वयंसेवी संस्थांना उपलब्ध असणारे उत्पन्नाचे मार्ग, स्वयंसेवी संस्थांना करावा लागणारा खर्च तसेच पदाधिकारी व सभासद यांची संस्थेच्या आर्थिक व्यवस्थापनात भूमिका अभ्यासणार आहोत.

## ९.२ स्वयंसेवी संस्थांच्या उत्पन्नाच्या बाबी

स्वयंसेवी संस्थांना उत्पन्नाचे अनेक मार्ग उपलब्ध आहेत. उत्पन्नाचे प्रमुख मार्ग म्हणजे सभासद वर्गणी,  लोकवर्गणी आणि शासकीय अनुदान होय. यासोबतच इतर संस्थाकडून प्राप्त होणारी मदत, परदेशातील संस्थाकडून मिळणारा परकीय निधी व कार्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी हे संस्थेच्या उत्पन्नाचे इतर मार्ग आहेत. स्वयंसेवी संस्थांच्या उत्पन्नाचे मार्ग पुढीलप्रमाणे आहेत.

**सभासद वर्गणी -**

स्वयंसेवी संस्थांची नोंदणी करताना संस्थेचे नियम आणि नियमावली मध्ये संस्थेच्या सभासदांसाठी एक वर्गणी निर्धारित केलेले असते. स्वयंसेवी संस्थेचा सभासद होण्यासाठी व्यक्तीला संस्थेकडे रीतसर अर्ज सादर करावा लागतो. या अर्जाला कार्यकारी मंडळाने मंजुरी दिल्यावर सभासदत्वाची निर्धारित वर्गणी संस्थेत जमा केल्यावर व्यक्तीला संस्थेचे सभासदत्व प्राप्त होते. सभासदांचे देखील आजीव सभासद व साधारण सभासद असे दोन प्रकार पडतात. आजीव सभासदांना निर्धारित केलेल्या वर्गणीची रक्कम ही साधारण सभासदांच्या वर्गणीच्या रक्कमेपेक्षा जास्त असते. कोणत्याही संस्थेचा उत्पन्नाचा हक्काचा व प्राथमिक मार्ग म्हणजे सभासद वर्गणी होय. परंतु सभासदांची जमा होणारी वर्गणी ही अल्प स्वरूपाची असल्यामुळे कोणत्याही मोठ्या कामासाठी या रकमेचा प्रभावीपणे विनियोग करता येत नाही.

**लोकवर्गणी व देणगी -**

लोकवर्गणी किंवा लोकांची स्वेच्छा देणगी हा स्वयंसेवी संस्थेच्या उत्पन्नाचा महत्त्वाचा भाग आहे. स्वयंसेवी संस्था या लोककल्याणाचे कार्य लोकांमार्फत करत असतात म्हणून स्वयंसेवी संस्थांच्या कार्यातील लोकसहभागाचे प्रमाण मोठे असते. स्वयंसेवी संस्थाचे सदस्य हे तळागाळात काम करत असल्याने त्यांचे लोकांशी संबंध हे प्राथमिक स्वरूपाची व जिव्हाळ्याचे असतात. स्वयंसेवी संस्थांचे कार्य खरोखरच चांगल्या स्वरूपाचे असेल तर संस्थांना लोकांचा पाठिंबा मोठ्या प्रमाणावर मिळतो. अनेक जण सेवाभावी वृत्तीने सढळ हस्ते स्वयंसेवी संस्थांना मदत करत असतात. लोकवर्गणी हा स्वयंसेवी संस्थांच्या उत्पन्नाचा महत्त्वाचा मार्ग आहे. लोक जरी संस्थेच्या कार्याला मदत म्हणून वर्गणी अथवा देणगी देत असले तरी मिळालेल्या वर्गणीचा व त्या वर्गणीच्या केलेल्या वापराचा अहवाल लोकांना सादर करणे आवश्यक असते. जर मिळालेल्या वर्गणीचा विनियोग योग्य प्रकारे होत नाही असे निदर्शनास आल्यास संस्थेची प्रतिष्ठा व नावलौकिक जातो. व पुढे देणगी व अनुदान मिळेपर्यंत कठीण होऊन जाते.

**शासकीय अनुदान -**

स्वयंसेवी संस्था या शासनाचे विस्तारक घटक म्हणून काम करत असतात. शासनाच्या कल्याणकारी राज्याच्या भूमिकेस पूरक अशी स्वयंसेवी संस्थांची भूमिका असल्याने स्वयंसेवी संस्थांच्या कार्यास शासनाचा मोठ्या प्रमाणावर पाठिंबा मिळतो. एखादी स्वयंसेवी संस्था सलग तीन वर्ष यशस्वीरीत्या कार्य करत असून त्या संस्थेचा तीन वर्षाचा ऑडिट रिपोर्ट असेल तर अशा संस्था या शासकीय अनुदान प्राप्त होतात.

**कार्पोरेट सोशल रेस्पोंसिबिलिटी -**

कार्पोरेट सोशल रेस्पोंसिबिलिटी फंड हा देखील स्वयंसेवी संस्थांच्या उत्पन्नाचा महत्त्वाचा मार्ग आहे. कार्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी अंतर्गत स्वयंसेवी अथवा अशासकीय संस्थांना निधी तसेच अनुदान यासारखी आर्थिक मदत व इतर सहाय्य प्राप्त होते. कंपनी कायदा २०१३ नुसार कंपनीला आपला एकूण सरासरी नफ्याच्या २% रक्कम सामाजिक दायित्व म्हणून वापरावे लागते. कंपनी कायद्यानुसार सीएसआर ची तरतूद ही ज्या कंपनीची एकूण किंमत ही ५०० कोटी किंवा त्यापेक्षा जास्त आहे. अशा कंपनीला किंवा ज्या कंपनीचा टर्न ओव्हर १००० कोटी किंवा त्यापेक्षा जास्त आहे. किंवा कंपनीला एखाद्या आर्थिक वर्षात पाच कोटीपेक्षा निव्वळ नफा प्राप्त झाला आहे. अशा कंपनीला लागू पडतो. सीएसआर अंतर्गत सामाजिक विकासासाठी तसेच लोकांचा आर्थिकदृष्ट्या गरिबांचा राहणीमानाचा दर्जा सुधारण्यासाठी व त्यांच्या राहणीमानाची पातळी उंचावण्यासाठी निधीचा पुरवठा केला जातो. सीएसआर अंतर्गत शिक्षणाचा प्रसार, आरोग्य, पर्यावरण, रोजगार निर्मिती, बालकल्याण, महिला कल्याण यासारखी समाज कल्याणची कार्य पार पाडली जातात.

**परकीय मदत -**

अनेक स्वयंसेवी संस्थांना परदेशातील व्यक्ती अथवा संस्थेकडून मदत प्राप्त होते. परदेशातून मिळालेल्या देणगीचा उपयोग व्हावा व त्याचा गैरवापर होऊ नये या हेतूने भारतात सरकारने १९७६ मध्ये एफ. सी. आर. ए. (फोरेन कंत्रिबशन रेगुलेशन ॲक्ट) हा कायदा संमत करून घेतला. कोणत्याही चलनात (परदेशी किंवा भारतीय) मिळालेल्या देणग्या, वस्तुरूप देणग्या, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष अथवा परदेशी संस्था किंवा व्यक्तींच्या एजंट संस्था याद्वारा मिळालेली मदत म्हणजेच परकीय मदत होय. राजकीय पक्षांना व संस्थांना परदेशी मदत मिळवण्यासाठी भारतात सरकारची पूर्वपरवानगी असणे आवश्यक आहे.

**इतर स्वयंसेवी संस्था -**

अनेक स्वयंसेवी संस्था या इतर लहान संस्थांना देणगी अथवा अनुदानाच्या स्वरूपात मदत करत असतात. त्यामुळे इतर स्वयंसेवी संस्थांकडून मिळणारी मदत ही देखील स्वयंसेवी संस्थांच्या उत्पन्नाचा महत्त्वाचा मार्ग आहे.

**संस्थेचे स्वतःच्या उत्पन्नाचे स्त्रोत -**

वर नमूद केलेले संस्थेचे उत्पन्नाचे स्त्रोत हे तात्पुरत्या स्वरूपाची असतात तसेच संस्थेला सुरुवातीच्या काळात मिळणारे असतात. परंतु नंतर संस्थेला आपले कार्य प्रभावीपणे करावयाचे असेल तर संस्थेला स्वतःच्या उत्पन्नाचे स्त्रोत उभारणे आवश्यक आहे. संस्थेचे उत्पन्नाचे स्वतःचे स्त्रोत असतील तर संस्थेचे इतरांवरील अवलंबत्व कमी होते व संस्थेचे काम परिणामकारक होते. पनवेल येथील युसुफ मेहेर अली सेंटर, तारा या स्वयंसेवी संस्थेने अनेक ग्रामोद्योग व लघुउद्योग यांच्या माध्यमातून संस्थेसाठी उत्पन्नाचे स्त्रोत उभे केले आहेत. अशा प्रकारे उपयुक्त मार्ग हे संस्थेचे उत्पन्नाचे प्रमुख सुरू आहेत.

## ९.३ स्वयंसेवी संस्थांच्या खर्चाच्या बाबी

स्वयंसेवी संस्था या लोककल्याणासाठी कार्यरत असतात. समाजकार्य करीत असताना संस्थांना अनेक प्रकारच्या खर्चांना सामोरे जावे लागते. यामध्ये प्रामुख्याने संस्थेच्या नोंदणीचा खर्च, स्टेशनरीचा खर्च, संस्थेचे कार्यालय जर भाड्याच्या जागेत असेल तर जागेच्या भाड्याचा खर्च, लाईट बिल, कर्मचारी वर्ग यांचा पगार यासारख्या बाबींचा समावेश होतो.

**संस्थेच्या नोंदणीचा खर्च -**

संस्था नोंदणीकृत करीत असताना बऱ्याचवेळा संस्थेचे ज्ञापन, संस्थेचे नियम आणि नियमावली यांसारखी कागदपत्र तयार करावी लागतात. ही कागदपत्र तयार करण्यासाठी स्वयंसेवी संस्थेला खर्च करावा लागतो. स्वयंसेवी संस्थेच्या नोंदणीचा खर्च हा पहिल्या कार्यकारी मंडळाच्या सभासदाच्या वर्गणीतून केला जातो.

**स्टेशनरीचा खर्च -**

संस्था नोंदणीकृत झाल्यानंतर संस्थेचे लेटरहेड, शिक्का, प्रसिद्धीपत्रके यांसारख्या बाबींवर तसेच संस्थेच्या कामासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टीवरस्वयंसेवी संस्थांना खर्च करावा लागतो.

**संस्थेच्या कार्यालयाचे भाडे -**

सुरुवातीच्या काळात अनेक संस्थाचे कार्यालय हे भाड्याच्या जागेतअसते. त्यामुळे संस्थेच्या कार्यालयाच्या जागेचे भाडे दरमहा जागेच्या मालकाला द्यावे लागते.

**कर्मचारी वर्गांचा पगार -**

संस्थेमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना मासिक वेतन देणे आवश्यक असते. त्यामुळे संस्थांना कर्मचारी वर्गांच्या पगारावर देखील खर्च करावा लागतो.

## ९.४ पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आर्थिक व्यवस्थापनाबाबत घ्यावयाची काळजी व जबाबदारी

१. हिशेबाची पुस्तके वेळच्या वेळी लिहावीत.

२. पुस्तकांमध्ये खाडाखोड करू नये.

३. पुस्तके काळजीपूर्वक व सुवाच्य अक्षरात लिहावे.

४. पावती किंवा व्हाउचर वर खाडाखोड नसावी.

५. देणगीदारांना वेळच्यावेळी पावत्या पाठवून आभाराचे पत्र पाठवावे, तसेच देणगीदारांना संस्थेच्या कार्याची मधून मधून माहिती कळवत जाणे की, जेणेकरून त्यांचे संस्थेबद्दल मत चांगले होऊन संस्थेशी भविष्यकाळात देणग्या मिळण्याची शक्यता असते.

६. पावती पुस्तकातून अधिकृत व्यक्तींनाच पावती देणे.

७. संस्थेच्या एकंदर रोख व्यवहाराची गरज लक्षात घेता कमीत कमी व्यवहार रोखीने करावे आवश्यक तेवढेच कॅश हातात असावी. कमीत कमी खर्च रोखीने व मोठे खर्च चेकने करावे.

८. बँकेचे व्यवहार एकाच व्यक्तीच्या स्वाक्षरीने करण्यात येऊ नयेत ते कमीत कमी दोन व्यक्तींच्या संयुक्त सह्यांनी करण्यात यावे.

९. कार्यालयातील टेलीफोन रजिस्टर, प्रवास रजिस्टर, टपाल रजिस्टर, मेंटेनेस रजिस्टर, भाडे रजिस्टर, चाल व अचल मालमत्ता रजिस्टर, सभासद फी रजिस्टर इत्यादींमध्ये वेळच्यावेळी नोंदी करून अद्यावत ठेवणे.

१०. लेखा पुस्तके, व्हाउचर, पासबुक, चेक बुक, स्लीप बुक, गुंतवणूक पत्रके, संस्था नोंदणीची कागदपत्रे किंवा अशा प्रकारची महत्त्वाची कागदपत्रे सुरक्षित ठिकाणी ठेवावीत.

११. येणे रक्कामासाठी स्मरणपत्रे पाठवावे.

१२. देणी वेळच्यावेळी दिल्याने संस्थेची पत चांगली राहते.

१३. कर्मचाऱ्यांना पगार वेळच्या वेळी द्यावा.

१४. कार्यकर्त्याकडे कार्यक्रमासाठी रक्कम दिल्यानंतर त्याचा हिशोब नियोजित वेळी सदर करणे आवश्यक तो प्रलंबित होता कामा नये.

१५. अंदाजपत्रक तयार करून त्याप्रमाणे खर्च होत आहे ना याची खबरदारी घ्यावी.

१६. तिमाही अंदाजपत्रक तयार करून आवश्यक तेवढी रक्कम काढून बाकीची रक्कम बँकेत ठेवावी.

१७. वर्षभर बरीच कामे करावयाची असतात परंतु सर्व कामांचे तारीखवार महिन्याप्रमाणे अगोदर वेळापत्रक तयार करून ठेवावे.

## ९.५ सारांश

स्वयंसेवी संस्था ही लोकांसाठी काम करत असतात. कार्य व्यवस्थितरीत्या पार पाडण्यासाठी स्वयंसेवी संस्था ही निधी संकलनाने योग्यरित्या वापर करून संस्थेच्या खर्चाचा, व्यवस्थापन, उत्पन्नाचे स्त्रोत याविषयी योग्य काळजी व जबाबदारी घेतात.

सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय, बौद्धिक इ. क्षेत्रांत लोककल्याणार्थ कार्यरत असलेल्या सेवाभावी संस्था. या संस्थांची संघटना एका विशिष्ट हेतूने व उद्दिष्टासाठी केलेली असते आणि त्यांत काम करणारे स्वयंसेवक स्वेच्छेने व निःस्वार्थीपणे कोणतेही काम व मदत करण्यास तत्पर असतात. या संघटना प्रामुख्याने नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तींत सापडलेल्यांना साहाय्य करतात; प्रसंगोपात्त आर्थिक मदतही देतात. यांशिवाय लोकांना मूलभूत हक्कांची जाणीव करून देणे, नागरी सुविधांबद्दल जागरूक करणे, बेरोजगारांना रोजगार मिळवून देण्यास साहाय्य करणे तसेच अन्य अनेक समस्यांची सोडवणूक करण्यासाठी सहकार्य करण्याचे काम त्या करतात. या संघटना स्वायत्त असून त्यांची स्वनिर्मित घटना व आचारसंहिता असते. या नियमावलीत त्या वावरत असतात. त्यांची नोंदणी 'इंडियन सोसायटीज रजिस्ट्रेशन अॅट', १८६०; मुंबई सार्वजनिक न्याय अधिनियम, १९५० च्या कायद्याने होणे आवश्यक असते. यांचा राज्यसंस्थेशी दूरान्वयाने संबंध येतो.

## ९.६ स्वाध्याय

१. स्वयंसेवी संस्थांच्या उत्पन्नाच्या बाबी याविषयी थोडक्यात चर्चा करा.

२. स्वयंसेवी संस्थांच्या उत्पन्नाचे मार्ग सांगून स्वयंसेवी संस्थेच्या खर्चाच्या बाबी याविषयी माहिती सांगा.

३. स्वयंसेवी संस्थांच्या आर्थिक व्यवस्थापनाबाबत पदाधिकारी व कार्यकर्ते यांची भूमिका स्पष्ट करा.

## ९.७ संदर्भ सूची

१. *Strategic management and policy issues of NGO's O.P.GoelIsha Books D-43,prithwira road Aadarsh Nagar, Delhi-110033*

२. *The dynamics of NGO's Robin lall Dominant publisher and distributers 116-A, south anarkali, Delhi 110051 Ph:22415687*

३. *Administration and Management of NGO's text and case studies S.L.goelR.kumar Deep and deep publication private ltd F-159 Rajouri garden, New delhi-110027.*

४. *Rural empowerment through self help groups (SHG's) non-govtorganization(NGO' s) and panchayati raj institutions*

*S.B.vermaY.T.Pawar Deep and deep publication private ltd F-159 Rajouri garden, New delhi-110027*

५. *Human right activism and role of NGO's Ashish Chandra Rajat publication 4675/12,ansarroad,daryaganj, Delhi 110002*

६. *NGO's and rural poverty M.L.narayn Discovery publishing house new Delhi 483/24, Prahlas street, anasari road, daryagunj, New Delhi 110002*

७. *NGO's and Development B.K.PrasadAmol Publication pvt.ltd 4374/4B Ansari road, Darya gunj, New Delhi110002*

८. *NGO's and child labour M.L.Naraslah Discovery Publishing House 4831/24, Prahlad street, Ansari road, Dayraganj, New Delhi 11002 Ph:2327924*

९. *NGO's for Rural Development Rajib Lochan Danigrahy Mohit publication 4675/21, Ansari road, Darya ganj, New Delhi.110002.*

१०. *Handbook for NGO's an encyclopedia for non- govt organisation's and voluntary agencies Incorporating project proposal and implementation funding agencies, day work and all govt. aid schemes and facilities Abhnav publication V.K.Puri Managing editor Nabhi publication p.o.box.no.37 New Delhi-1100*

११. सेवाभावी व स्वयंसेवी संस्थासाठी अर्थसहाय्याच्या ३०० योजना, लेखक- मोहन वैद्य, प्रकाशन विश्व, सी- १२, हर्षदा गर्दन, महागणेश कॉलोनी, पुणे.

१२. कोकणातील अरीस्थावर उपाय स्थानिकांच्या नजरेतून, संसाधने व उपजीविका गट प्रयास, मंगेश पुष्प,१३३ स्वामी विवेकानंद सोसायटी, पुणे.

१३. खरीखुरी टीम इंडिया युनिक फीचर्स, सुहास कुलकर्णी, श्याम देशपांडे समकालीन प्रकाशन, ८. अमित कोम्पलेस, सदाशिव पेठ, पुणे.

१४. महिला स्वयंसहाय्यता बचत गट, प्रा. एम. यू. मुलाणी, डायमंड प्रकाशन, १६९२, सदाशिव पेठ, पुणे.

१५. विकासाच्या वाटा महाराष्ट्रांच्या अनुभवातून, सु. गो. तपस्वी, ग्रंथाली प्रकाशन, इंडियन एज्यु. सोसा. महात्मा फुले कन्याशाळा गोखले रोड दादर, मुंबई.

❖❖❖❖